• पुणे, शनिवार, १९ जुलै २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 231 • वर्ष ४ थे, अंक २३१ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



विमानतळावर बिबट्यांची 'जंगल सवारी'..!

P३



१२

पंतने चौथ्या कसोटीत खेळूच नये!

## At a Glance

### इंडिया आघाडीतून 'आम आदमी पक्ष' बाहेर

**नवी दिल्ली :** आम आदमी पक्षाने (आप) विरोधी पक्षांच्या आघाडी इंडिया ब्लॉकच्या पुढील महत्त्वाच्या बैठकीपासून स्वतःला दूर ठेवले आहे. पक्षाने या बैठकीत सहभागी होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. पक्षाने इंडिया अलायन्सपासून स्वतःला दूर केले आहे. आम आदमी पक्षाचे (आप) खासदार संजय सिंह यांनी स्पष्ट केले आहे की त्यांचा पक्ष इंडिया ब्लॉकमधून बाहेर पडला आहे. एका हिंदी वृत्तवाहिनीशी बोलताना संजय सिंह यांनी,"इंडिया ब्लॉक लोकसभा निवडणुकीसाठी होता. लोकसभा निवडणुकीनंतर आम्ही हरियाणा आणि दिल्ली विधानसभा निवडणुका एकट्याने लढवल्या. याशिवाय, आम्ही पंजाब आणि गुजरातमधील पोटनिवडणुकाही एकट्याने लढवल्या. 'आप' आता इंडिया ब्लॉकचा भाग नाही. आमचा पक्ष आणि अरविंद केजरीवाल यांनी स्पष्ट केले आहे की आम्ही इंडिया ब्लॉकमधून बाहेर आहोत." असे म्हणत आघाडीतून त्यांचा पक्ष बाहेर पडला असल्याची घोषणा केली.

# अभूतपूर्व गोंधळ

## विधिमंडळातील हाणामारीचे राज्यभरात पडसाद



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधिमंडळ परिसरात आमदार जितेंद्र आव्हाड आणि आमदार गोपीचंद पडळकर यांच्या समर्थकांमध्ये काल हाणामारी झाली. त्यानंतर जितेंद्र आव्हाड रात्री दोन वाजेपर्यंत विधिमंडळ परिसरात थांबून आंदोलनाच्या भूमिकेत होते.

पोलिसांच्या वतीने मार खाणार्‍याला अटक केली जात असून त्याला मारहाण करणारे पाच जणांची पाठराखण केली जात असल्याचा आरोप यावेळी जितेंद्र आव्हाड यांनी केला. या प्रकरणातील गोपीचंद पडळकर यांच्या समर्थक असलेल्या पाचही आरोपींना पोलिस वडापाव आणि तंबाखू मळून देत असल्याचा आरोप देखील आव्हाड यांनी केला आहे. या सर्व गोंधळाचे चित्रीकरण कॅमे-यात कैद झाले असून या प्रकरणाचे आता राजकीय पडसाद उमटत आहेत. एकूणच विधान भवनाच्या परिसरामध्ये दोन नेत्यांच्या कार्यकर्त्यांनी मध्ये झालेली तुंबळ हाणामारी आणि शिविगाळ यामुळे राज्याच्या राजकारणाचा दर्जा आता किती ढासळला? याबाबत चर्चा सुरू झाल्या आहेत.

विधान भवन परिसरात झालेल्या हाणामारीनंतर पोलिसांनी बाळाचा वापर करत धरपकड सुरू केली. मात्र, आव्हाड यांनी थेट पोलिसांच्या गाडी समोर ठिय्या आंदोलन करत गाडी रोखून धरली. पोलिसांना आव्हाड यांना फरफटत बाहेर काढावे लागले. त्यानंतर पोलिसांनी मोठा फौजफाटा बोलावून सर्व कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. जितेंद्र आव्हाड यांच्या सोबत यावेळी आमदार रोहित पवार हे देखील नंतर हजर झाले होते.

गेल्या दहा दिवसांपासून भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर, शरद पवार राष्ट्रवादी गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यात शरद पवारांवरील टीकेमुळे वाद धुमसत होता. या वादाने गुरुवारी सायंकाळी मर्यादा ओलांडली. विधिमंडळाच्या लॉबीत, पाय-यांजवळ पडळकरांचे कार्यकर्ते ऋषिकेश

» पान ७ वर

### जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात गुन्हा दाखल

● दरम्यान, या प्रकरणामध्ये पोलिसांनी आमदार जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. कार्यकर्ते नितीन देशमुख यांना पोलिस ताब्यात घेण्यासाठी आले असताना पोलिसांचे वाहन अडवल्याने जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा मरिन ड्राईव्ह पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. जितेंद्र आव्हाड आणि गोपिचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांमध्ये विधिमंडळ परिसरामध्येच धक्काबुक्की झाली. या धक्काबुक्कीमध्ये सहभागी असलेले जितेंद्र आव्हाडांचे कार्यकर्ते नितीन देशमुख यांना ताब्यात घेण्यासाठी पोलिस आले असताना आव्हाड यांनी पोलिसांच्या कारसमोर झोकून देत अटकेला विरोध केला होता. त्यानंतर पोलिसांनी जितेंद्र आव्हाड यांना उचलून तिथून बाजूला केले होते. तसेच नितीन देशमुख यांला पोलीस ठाण्यात नेले होते. आव्हाड यांच्याविरोधात सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तू साधा पीएसआय... आवाज खाली करायचा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** विधानसभेचे पावसाळी अधिवेशन सध्या वादग्रस्त ठरले असून, गुरुवारी विधानभवन परिसरात आमदार जितेंद्र आव्हाड आणि आमदार गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांमधील हाणामारीने गंभीर स्वरूप धारण केले. या घटनेनंतर रात्री उशिरा पोलिसांनी आव्हाड यांचे कार्यकर्ते नितीन देशमुख यांना अटक केली, यामुळे वाद आणखी चिघळला. या प्रकरणात शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांचा आझाद मैदान पोलीस ठाण्यात एका पोलीस अधिकाऱ्याशी झालेल्या बाचाबाचीचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हिडीओत रोहित पवार पोलिसांना "तू एक साधा पीएसआय..." असे म्हणत आक्रमकपणे बोलताना दिसत आहेत. या प्रकारामुळे राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे.

१७ जुलै रोजी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी नितीन देशमुख यांना विधानभवन परिसरात अटक केली. ही माहिती समजताच जितेंद्र आव्हाड तातडीने विधानभवनात पोहोचले आणि कार्यकर्त्यांसह पोलिसांच्या गाडीसमोर ठिय्या आंदोलन केले. यावेळी त्यांनी पोलिसांची गाडी अडवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्यावर सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी मरिन ड्राइव्ह पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिसांनी आव्हाड यांना खेचून गाडीला रस्ता मोकळा करून दिला. यानंतर, नितीन देशमुख यांना कोणत्या पोलीस ठाण्यात नेले आहे, याची माहिती घेण्यासाठी आव्हाड आणि रोहित पवार आझाद मैदान पोलीस ठाण्यात पोहोचले. मात्र, पोलिसांनी त्यांना योग्य माहिती न दिल्याने आणि एका पोलिस अधिकाऱ्याने हातवारे करत बोलण्याचा प्रयत्न

» पान ७ वर

# दोन्ही भाऊ एकत्र येणार का?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या एकत्र येण्याबाबत सध्या राजकीय वर्तुळात चर्चा सुरु आहे. मनसेकडून उद्धव ठाकरे यांच्यासोबत युती करण्याबाबत कोणतंही अधिकृत वक्तव्य अद्याप करण्यात आलेलं नाही. पण उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून राज ठाकरे यांनी एकत्र यावेत यासाठी प्रयत्न केले जात आहेत. पण त्यांना तसा प्रतिसाद मनसेकडून मिळताना दिसत नाही. याबाबत उद्धव ठाकरे यांना आज पत्रकार परिषदेत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर उद्धव ठाकरे यांनी आपली सविस्तर प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी विविध मुद्द्यांवर भूमिका मांडली.

"आम्ही २० वर्षांनी एका व्यासपीठावर एकत्र आलो. आम्ही पहिल्यांदा मराठी भाषेच्या विषयावर एकत्र आलेलो आहोत. मी तेव्हाच सांगितलं होतं की, आम्ही एकत्र आलो आहोत ते एकत्र राहण्यासाठी. आम्ही मराठीच्या विषयावर एकत्रच राहणार आहोत. मुद्दा येतो तो पुढे राजकारणाचा. आज कोणतीही निवडणूक जाहीर झालेली नाहीय. ज्यावेळेला ती निवडणूक जाहीर होईल त्यावेळेला आम्ही चर्चा करु शकतो", अशी महत्त्वाची प्रतिक्रिया उद्धव ठाकरे यांनी दिली. "राज्याच्या विकासाऐवजी स्वत:चा विकास करतोय, असं ज्यांना वाटत असेल त्यांना वाटू द्या. मी माझ्या भूमिकेवर कायम आहे. आम्ही कोणत्या भाषेला विरोध करत नाहीत. पण सक्ती लागू करु देणार नाहीत", असे देखील ते म्हणाले.

» पान ७ वर

### राज यांची भूमिका गुलदस्त्यात

● विधानसभा निवडणुकीत दोन्ही ठाकरेंच्या पक्षांना जोरदार दणका बसला. उद्धव ठाकरेंच्या पक्षाला केवळ २० जागांवर यश मिळालं. तर राज ठाकरेंच्या मनसेला भोपळाही फोडता आला नाही. राज यांचे चिरंजीव अमित



ठाकरेदेखील पराभूत झाले. त्यानंतर ठाकरे ब्रँड संकटात सापडल्याची चर्चा सुरु झाली. ठाकरेंच्या मनोमिलनाच्या चर्चा सुरु असताना उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे ५ जुलैला मुंबईत विजयी मेळाव्यात एकत्र आले. उद्धव ठाकरेंनी राज यांच्यासोबत युती करण्याची तयारी जाहीरपणे दर्शवलेली आहे. पण राज यांची भूमिका गुलदस्त्यात आहे. राज ठाकरेंच्या मनसे सोबत युती करुन मुंबई महापालिकेतील सत्ता कायम राखण्याच्या प्रयत्नात उद्धवसेना आहे. या संदर्भात उद्धवसेनेकडून एक सर्वेक्षण करण्यात आलं आहे. दोन्ही ठाकरे सोबत आल्यास मुंबई महापालिकेत काय चित्र असू शकेल, याचा अंदाज उद्धवसेनेकडून घेण्यात आलेला आहे. त्यानुसार ठाकरे बंधूंची युती झाल्यास त्यांना १०० पेक्षा अधिक जागा मिळतील. विशेष म्हणजे मनसेला २५ हून अधिक जागांवर विजय मिळेल. २०१७ मध्ये मनसेला ७ जागा मिळाल्या होत्या. त्याआधी २०१२ मध्ये मनसेनं २८ जागा जिंकल्या होत्या. मुंबईत हीच मनसेची सर्वोत्तम कामगिरी आहे. युती झाल्यास राज ठाकरे सर्वोच्च कामगिरी पुन्हा नोंदवू शकतात.

### अमेरिकन जनता ट्रम्पविरोधात रस्त्यावर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या वादग्रस्त धोरणांविरुद्ध गुरुवारी मोठ्या प्रमाणात निदर्शने झाली. स्थलांतरितांना हद्दपार करणे आणि गरिबांसाठी मेडिकेड सुविधा कमी करणे याविरोधात १६०० हून अधिक ठिकाणी निदर्शने करण्यात आली. या निदर्शनांना 'गुड ट्रबल लाईव्हज ऑन' असे नाव देण्यात आले आहे. राष्ट्रीय कृती दिन, जो दिवंगत खासदार आणि मानवाधिकार कार्यकर्ते जॉन लुईस यांना समर्पित आहे. आयोजकांनी लोकांना निदर्शने शांततेत ठेवण्याचे आवाहन केले. शिकागो हे या निदर्शनांचे मुख्य केंद्र होते. दुपारी शहरातील मध्यभागी निदर्शक जमले. शिकागोमध्ये आयोजित रॅलीत मेणबत्ती मार्च काढण्यात आला.

पब्लिक सिटीझन ग्रुपच्या सह-अध्यक्षा लिसा गिल्बर्ट यांनी सांगितले की, आपण आपल्या देशाच्या इतिहासातील

» पान ७ वर

# उद्धव ठाकरेंचा केमिकल लोचा झालाय; शिंदे यांचा थेट प्रहार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** पावसाळी अधिवेशनात पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे आणि शिंदे गटातील नेत्यांची राजकीय फटकेबाजी पाहायला मिळाली. त्यामध्ये, थेट पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील शाब्दिक युद्धही पाहायला मिळालं. विधानसभा अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशीही एकनाथ शिंदेंनी पुन्हा एकदा उद्धव ठाकरेंवर थेट प्रहार केलाय. ३ वर्षांपासून माझ्या नावाने फक्त शिव्या-शाप सुरू आहेत. सभागृहात दोन दिवस चर्चा झाली, मी अंबादास यांचं कौतुक करता होतो, कोणाला काय इतकं लागण्याच कारण नव्हतं. पावसाळ्यात छत्र्या उगवतात की बेडूक, परंतु एवढ्या लवकर रंग बदलणारा सरडा महाराष्ट्राने पहिला नाही, असे म्हणत एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंना लक्ष्य केलं.

ज्यांना संपलेला बोलले, त्यांच्याच सोबत आता रोज जात आहेत. चल मेरे भाई हात जोडता हूँ.. या गाण्याची आठवण होत आहे, असे म्हणत एकनाथ शिंदेंनी शिवसेना-मनसे युतीच्या चर्चेवरुन टोला लगावला. देवेंद्रजी यांना किती शिव्या दिल्या याचे साक्षीदार आम्ही आहोत. जनतेने शिवसेना भाजपला मतदान केलं होतं. आम्ही ताटात माती कशी कालवली? माती तर तुम्ही केली, देवेंद्रजींच्या पाठीत खंजीर खूपसला. निकालानंतर देवेंद्रजी यांनी अनेक फोन केले, पण फोन उचलला नाही, केलेलं इथंच फेडावं लागतं. मुंबईचं

» पान ७ वर

### आम्ही कुणाचं ताट घेणारे नाहीत

● मी सोन्याचा चमचा कुणाला उद्देशून बोललो नव्हतो, यांना बोललो नव्हतो. आम्ही एक भाकर चार जणात वाटून खाणारे आहोत. आम्ही कुणाचं ताट घेणारे लोक नाहीत, आम्ही सत्ता सोडून गेलेले लोकं आहोत. आम्ही देणारे आहोत घेणारे नाही, कोव्हिड रुग्णांचे घास काढले यांनी काढले असे म्हणत एकनाथ शिंदेंनी नाव न घेता थेट उद्धव ठाकरेंना लक्ष्य केलं.



### अनिल परब यांचा योगेश कदम यांच्यावर आरोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी शुक्रवारी ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या आई ज्योती कदम यांच्या नावे कांदिवलीतील सावली डान्सबार असल्याचा आरोप त्यांनी केलाय. पोलिसांनी या बारवर धाड टाकून २२ बारबाला ताब्यात घेतल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. "डान्सबारवर बंदी असतानाही हा बार कसा सुरू आहे?" असा सवाल देखील अनिल परब यांनी उपस्थित केलाय.

अंतिम आठवडा प्रस्तावावर अनिल परब यांनी विधानसभेत हा आरोप केला. अनिल परब म्हणाले की, कांदिवली येथे

» पान ७ वर

मुख्यमंत्री फडणवीस यांचा दावा

# हिंदी सक्तीचा निर्णय उद्धव ठाकरेंचा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीवेळी उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्र्यांना हिंदीसक्ती हवीच कशाला? असं पुस्तक भेट दिली. या पुस्तकाचा उल्लेख देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेच्या सभागृहात केला. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी हिंदी सक्तीचा निर्णय उद्धव ठाकरे यांच्या सरकारमध्येच घेण्यात आल्याचा दावा केला. त्यावर आमदार आदित्य ठाकरे यांनी जीआर कोणत्या सरकारने काढला? असा प्रश्न केला. त्यावर देखील देवेंद्र फडणवीस यांनी भूमिका मांडली.



"मला काल हिंदीसक्ती हवीच कशाला? असा एक वृत्तपत्रीय लेखाचा संग्रह प्राप्त झाला आहे. फक्त हा संग्रह प्राप्त झाला आहे तो देणाऱ्यांना माझी विनंती आहे की, त्यामध्ये अजून कात्रण लावण्याची आवश्यकता आहे, ज्या कात्रणांमध्ये हा जो काही अहवाल, शासनाने तयार केलेल्या कमिटीचा अहवाल असला पाहिजे", असा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला.

"समितीने अहवालात सल्ला दिला होता की, पहिले ते बारावी हिंदी सक्ती करावी. तो अहवाल तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळासमोर आला. त्यावेळी भाषेच्या उपसमितीत फक्त तज्ज्ञ नेते नव्हते तर शिवसेनेचे बडे नेते होते. त्यांनी पहिली ते बारावी हिंदी भाषा ही सक्तीची करावी, असा सल्ला दिला. तो अहवाल मंत्रिमंडळाने स्वीकारला. त्यानंतर एक आठवड्याने उद्धव ठाकरेंनी त्यावर स्वाक्षरी केली", असा दावा मुख्यमंत्र्यांनी केली. त्यावर जीआर कोणी काढला? असा सवाल आदित्य ठाकरेंनी केला. त्यावर फडणवीसांनी प्रत्युत्तर दिलं.

"एकदा मंत्रिमंडळाने स्वीकारलं तर जीआर त्याचं प्रतिफळ असतं. मी त्यावर आक्षेपच घेत नाही. मी एवढंच म्हणतोय, मला उद्धव ठाकरे

» पान ७ वर

### जनशताब्दी एक्सप्रेसची हत्तींच्या कळपाला धडक

**झारग्राम :** पश्चिम बंगालच्या झारग्राम जिल्ह्यात शनिवारी पहाटे जनशताब्दी एक्सप्रेसची धडक बसून मादी हत्ती, तिचं पिलू आणि एक प्रौढ हत्ती यांचा मृत्यू झाला. ही दुर्घटना बांसटला रेल्वे स्थानकाजवळ रात्री १.४५ च्या सुमारास घडली. हत्तींचा कळप ट्रॅक ओलांडत असताना ही धडक झाली. राज्य वन विभागाच्या मदतीने 'हुला पार्टी' या स्थानिक तरुणांच्या पथकाद्वारे हत्तींचा कळप मानववस्तीबाहेर काढण्याचे काम सुरू असताना हा अपघात घडला.

राज्याच्या वनमंत्री बिरबाहा हांसदा यांनी सांगितले की, रात्री ११ वाजता रेल्वेला हत्तींच्या हालचालीबाबत माहिती देण्यात आली होती. तरीही दुर्घटना घडल्याचे दुर्दैव आहे. याप्रकरणी चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

# सीमा सुरक्षा दलाची उल्लेखनीय कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सीमा सुरक्षा दल सतर्क जवानांनी गुरुवारी रात्री एक उल्लेखनीय कामगिरी केली. अमृतसरच्या सीमावर्ती भागात अनेक घटनांमध्ये ६ पाकिस्तानी नार्को ड्रोन त्यांनी पाडले. यावेळी शेतात पडलेले हेरॉइनची चार पॅकेटसदेखील जप्त करण्यात आली आहेत.

बीएसएफच्या मते, १७ जुलैच्या रात्री, कर्तव्यावर तैनात असलेल्या सतर्क जवानांनी अमृतसर सीमेवर सतत ड्रोन घुसखोरी रोखली. जवानांनी त्वरित प्रतिसाद दिला आणि सीमेवर तैनात केलेल्या तांत्रिक प्रतिउत्तरात्मक उपाययोजना सक्रिय केल्या. त्यांच्या मदतीने, पाकिस्तानकडून येणारा प्रत्येक नार्को ड्रोन निष्क्रिय करण्यात आला. त्यानंतर, बीएसएफने केलेल्या शोध मोहिमेत, पुलमोरन गावाजवळील शेतातून ४ डीजेआय मॅविक ३ क्लासिक ड्रोन आणि ३ पॅकेट संशयित हेरॉइन (एकूण वजन- १.७४४ किलो) जप्त करण्यात आले.

रात्री रोरानवाला खुर्द गावाजवळही हेरॉइनचे एक पॅकेट (एकूण वजन- ५९६ ग्रॅम) आणि डीजेआय मॅविक ३ क्लासिक ड्रोन जप्त केले. दहशतवादविरोधी उपाययोजनांमध्ये तांत्रिक हस्तक्षेप झाल्यामुळे हे ड्रोन क्रॅश झाले. शुक्रवारी सकाळी, धानोई कलान गावाच्या परिसरात तांत्रिक दहशतवादविरोधी उपाययोजना सक्रिय केल्यावर आणखी एक डीजेआय मॅविक ३ क्लासिक ड्रोन अडवण्यात आला. जवानांनी तोही पाडला. काही तासांच्या कालावधीत बीएसएफने

» पान ७ वर

# मुंबईकरांसाठी गुड न्यूज; लोकलचे सर्व डबे होणार एसी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांकडूनन मांडण्यात आलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर दिलं आहे. देवेंद्र फडणवीस मुंबईतील लोकलनं प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दिलासा देणारी माहिती दिली आहे. मुंबईतील धावणाऱ्या लोकलला एसीचे डबे लावण्यात येतील, लोकलच्या प्रवास तिकिटात एका रुपयाची वाढ करण्यात येण्यात नाही, असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. याला रेल्वे मंत्र्यांनी देखील ते सकारात्मक असल्याचं सांगितलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात बोलताना म्हटलं की, अध्यक्ष महोदय मध्यंतरीच्या काळात उपनगरीय रेल्वेची एक दुर्घटना झाली.



सातत्यानं उपनगरीय रेल्वेला दरवाजे नसल्यानं अपघात झालेले पाहतो. अतिशय वाईट परिस्थिती लोक प्रवास करतात. आज दोन क्लास आपण तयार केले आहेत. एकीकडे मेट्रो आहे, ती पूर्णपणे एसी आहे, जिचे दरवाजे बंद होतात, ज्याच्यामध्ये प्रवासाची इज आहे ती ही मुंबईकरांना आहे. दुसरीकडे उपनगरीय रेल्वे आहे, ज्याच्यात लोक अतिशय दाटीवाटीत लोकं

» पान ७ वर

# पंढरपुरात समितीच्या गोशाळेत गोवंशाची हत्या?

गोरक्षा

**अनेक कारणांवरून अप्रतिष्ठित झालेली ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या सहअध्यक्ष पदाच्या नेतृत्वाखालील विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती आज एका धक्कादायक प्रकारामुळे चर्चेत आली आहे. मंदिर समितीच्या गोशाळेमध्ये एका वासराची बळजबरीने दूध पाजून हत्या केल्याची घटना समोर येत आहे.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** याबाबत एक सीसीटीव्ही फुटेज सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणामध्ये व्हायरल होत आहे. हा सीसीटीव्ही कॅमेरा विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या गोशाळेतील आहे.

यामध्ये मंदिर समितीचे दोन कर्मचारी दिसत आहेत. हे कर्मचारी बादली मध्ये ठेवलेल्या दुधामध्ये एका वासराचे तोंड दाबून त्याला दूध पाजत असल्याचे दृश्य दिसत आहे.

वासरू दूध पिण्यास तयार नसताना त्याला पायामध्ये घट्ट दाबून त्याचे तोंड बळजबळने दुधाच्या बादलीमध्ये दाबून ठेवण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसते.



काही क्षणात वासराला सोडल्यानंतर ते वासरू तेथेच खाली कलंडले असल्याचेही दिसते आहे. अर्धमेले अवस्थेमध्ये थोडीशी हालचाल करत त्या वासराने तेथे तात्काळ प्राण सोडला.

गोमातेने आपल्या वासराचा जीव जात असताना समोरच पाहिले. तोंडाने त्या वासराला हलवण्याचा प्रयत्न केला. परंतु ते वासरू अखेर उठले नसल्याचे दिसते.

या कर्मचाऱ्यांनी हा प्रकार जाणून-बुजून केला की बळजबरीच्या प्रयत्नामध्ये दुधामध्ये श्वास कोंडून त्या वासराचा जीव गेला हे कळायला मार्ग नाही. परंतु या प्रकाराची चौकशी होऊन कर्मचाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल झाला पाहिजे अशी मागणी समाज माध्यमातून व्यक्त होत आहे. याबाबत काहींनी मंदिर समिती संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता कुठल्याही पदाधिकाऱ्याने जबाबदारीने याचे उत्तर देण्याचे टाळले. गेल्या दोन वर्षात मंदिर समितीचे अनेक काळे कारनामे बाहेर आले. म आषाढी पूर्व झालेल्या मंत्रालयात बैठकीत देखील ह भ प औसेकर यांच्यासह काही सदस्य आणि कार्यकारी अधिकारी, व्यवस्थापक यांच्या नावानिशी झालेल्या तक्रारीवर चर्चा झाली. या प्रशासकीय बैठकीत स्वतः मुख्यमंत्री फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केली होती. परंतु यात्रेच्या धामधुमित आता या कारवाईची विषय नको म्हणत तो विषय बाजूला ठेवला गेला.

आज मात्र कर्मचाऱ्यांच्या या प्रकारामुळे संपूर्ण हिंदुस्थानात ही मंदिर समिती बदनाम होण्याची शक्यता आहे. हिंदू संरक्षक म्हणून घेणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी हे पाप अंगावर घेऊ नये अशा प्रकारच्या प्रक्षुब्ध प्रतिक्रिया समाज माध्यमांवर व्यक्त होत आहेत.

#रा

# सन्मान लोककलावंतांचा...!



पुणे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या ५६ व्या स्मृति दिनाच्या निमित्ताने श्रमिक पत्रकार भवन, येथील सभागृहात झोपडपट्टी सुरक्षा दल व महाराष्ट्र कामगार सुरक्षा दल यांच्या वतीने "क्रांतीपुत्र अण्णा भाऊ साहित्यिकांचा साहित्यिक" या विषयावर महाचर्चा करण्यात आली.



## नेपाळच्या महापौरांची महापालिकेला सदिच्छा भेट

**पुणे :** नेपाळ देशातील विविध नगरपालिकांचे महापौर आणि वरिष्ठ अधिकारी यांनी आज पुणे महानगरपालिकेला सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान दोन्ही देशांतील नागरी प्रशासन, स्वच्छता व्यवस्थापन, मलनिसारण, वाहतूक आणि इतर नागरी सेवा याविषयी उपयुक्त माहितीची देवाणघेवाण झाली. पुणे महापालिकेच्या अति. महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी गुलाबपुष्प देऊन पाहुण्यांचे स्वागत केले. त्यांनी पुणे शहराचा विकास, नागरी सेवा, स्मार्ट सिटी प्रकल्प, कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा, मलनिसारण व्यवस्था आदी विषयांवर सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती दिली. या वेळी पुणे महानगरपालिकेच्या वतीने जयंत भोसेकर (उपआयुक्त, मोटार वाहन विभाग), संदीप कदम (उपआयुक्त, घनकचरा व्यवस्थापन), योगिता भोसले (नगरसचिव), राहुल जगताप (संगणक प्रोग्रामर) तसेच अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. हा दौरा पुणे महापालिकेच्या कार्यपद्धती व नागरी व्यवस्थापनातील चांगले उपक्रम इतर देशांपर्यंत पोहोचविणारा व आंतरराष्ट्रीय संबंध दृढ करणारा ठरला.

## हातगाडीधारकांच्या मागण्यांसाठी बैठक

**पुणे :** राज्यातील फेरीवाले, हातगाडीधारक, पथारीधारक आणि स्टॉलधारक यांच्या विविध मागण्यांवर निर्णय घेण्यासाठी लवकरच उपमुख्यमंत्री व नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक आयोजित केली जाणार आहे. ही माहिती हॉकर्स जॉइंट ॲक्शन कमिटी महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष संजय शंके यांनी दिली.

राज्यभरातील लाखो फेरीवाल्यांना भेडसावणाऱ्या समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हॉकर्स जॉइंट ॲक्शन कमिटीच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला मराठी भाषा व उद्योगमंत्री उदय सामंत यांनी अलीकडेच आझाद मैदानावर भेट देत पाठिंबा दर्शविला. त्यांनी शिष्टमंडळाशी संवाद साधत, उपमुख्यमंत्र्यांसमवेत बैठक घेऊन सर्व मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्याचे आश्वासन दिले.त्यानुसार, हॉकर्स जॉइंट ॲक्शन कमिटी आणि इतर सहयोगी संघटनांसोबत प्रारंभिक चर्चा पार पडली असून, लवकरच अंतिम बैठक निश्चित करण्यात येईल, असेही शंके यांनी सांगितले.या आंदोलनात जाणीव महिला संघटनाच्या अध्यक्षा श्वेता ओतारी यांच्यासह मारुती खुटवड, संदीप यादव, अभिजित हत्ते आणि अनेक कार्यकर्ते सक्रिय सहभाग घेत आहेत.

## नाभिक एकता संघाच्या अध्यक्षपदी मनोज अहिरराव

**पुणे :** संत सेना महाराज नाभिक एकता संघाची नुकतीच वार्षिक बैठक पार पडली त्यात मनोज



अहिरराव यांचीअध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात निवड करण्यात आली. त्यांची निवड ही सन २०२५ ते सन २०२७ या दोन वर्ष कालावधीसाठी असेल, असे आजीव विश्वस्त रामदास सैंदाणे यांनी जाहीर केले.

अन्य कार्यकारिणी पुढीलप्रमाणे:
उपाध्यक्ष : योगेश फुलपगार, पंडित निंबा निकम
सचिव : कमलेश वेळीस
खजिनदार : समाधान निकम
सह -खजिनदार : कैलास नेरपगार
कार्याध्यक्ष : योगेश पगारे
सह कार्याध्यक्ष : विकी ठाकरे
उत्सव समितीप्रमुख : मंगेश विळसकर

सदर कार्यकारिणी दोन वर्षांची असेल. यावेळी नवनिर्वाचित कार्यकारिणीचा सौंदाणे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

## सोयाबीनचा साठा घटणार; पुरवठा कमी

**पुणे :** देशातील सोयाबीन उद्योगासमोर आगामी हंगामात पुरवठ्याच्या मर्यादा निर्माण होण्याची शक्यता आहे. ऑक्टोबर २०२५ पासून सुरू होणाऱ्या नवीन हंगामात देशात फक्त ६.८६ लाख टन सोयाबीन शिल्लक राहील, असा अंदाज सोयाबीन प्रोसेसर्स असोसिएशन ऑफ इंडिया (सोपा) ने व्यक्त केला आहे. मागील हंगामाच्या तुलनेत हा साठा २३ टक्क्यांनी घटणार आहे. खरीप हंगाम २०२४ मध्ये देशात १२६ लाख टन सोयाबीनचे उत्पादन झाले, जे मागील वर्षीच्या ११९ लाख टनांपेक्षा अधिक आहे. मात्र, मागील वर्षीचा कमी साठा आणि आयात जवळपास नगण्य असल्यामुळे यंदा पुरवठा कमी जाणवतो आहे.

## लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे मानवतेचे प्रतीक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या ५६ व्या स्मृति दिनाच्या निमित्ताने श्रमिक पत्रकार भवन, येथील सभागृहात झोपडपट्टी सुरक्षा दल व महाराष्ट्र कामगार सुरक्षा दल यांच्या वतीने "क्रांतीपुत्र अण्णा भाऊ साहित्यिकांचा साहित्यिक" या विषयावर महाचर्चा करण्यात आली. या प्रसंगी महाचर्चेचे उद्घाटन मा. आमदार लहू कानडे यांनी केले तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक रतनलाल सोनग्रा होते. या महाचर्चात जेष्ठ विचारवंत सुरेश दाभाडे, बजरंग कोरडे, अशोक घायाळे यांनी विचार मांडले. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष भगवानराव वैराट हे होते. तसेच या कार्यक्रमात अण्णा भाऊंचे स्मरण ठेवून महाराष्ट्राचे लोक कलावंत सिनेपार्श्वगायक शाहीर नंदेश उमाप तसेच "देवमाणूस" या लोकप्रिय मालिकेतील अभिनेत्री, रुक्मिणी सुतार, प्राणी मित्र धर्मेंद्र पाटील, दलित चळवळीतील अभ्यासू विचारवंत प्राचार्य अरुण गाडे, पुण्याचे ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक अविनाश गोडबोले यांना अण्णा भाऊ साठे स्मृती पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते.

# खटल्यांचा 'निक्काल' च 'लाखमोलाचा'...!

## राज्यात न्यायप्रक्रियेचा 'रोधक':५७ लाखांहून अधिक दावे प्रलंबित

शहाण्या माणसाने कोर्टाची पायरी चढू नये अशी जुन्या जाणत्या माणसांची म्हण आहे आणि ही म्हण युगानुयुगे खरीच होत आली आहे. त्याला कारणेही तशीच घडत आहेत; एकदा का कोर्टाची पायरी चढली तर संबधित दावेदार हा खटला आणि वकिलाच्या भोवती इतका गुरफटत जातो की त्याला बाकी काहीच कामधंदा सुचत नाही. त्यातच न्यायालयीन कर्मचारी आणि खुद्द न्यायाधीशांची संख्याच सध्याच्या लोकसंख्येच्या आणि दाव्यांच्या तुलनेत खूपच तोकडी आहे; त्यामुळे या दाव्यांचा निकाल लागण्यास काही वर्षांची वाट पाहावी लागते. त्यातच वरच्या कोर्टात अपील करण्याची 'गोंडस' सोय आपल्या कायद्यात आहे; त्यातूनच सर्वसामान्य नागरिकांची गळचेपी होत असून आहे त्या संपत्तीची अक्षरश: वाट लागत आहे.

"सरकारी वकिलांची सातत्याने होणारी बदली, साक्षीदार हजर न होणे, आरोपी फरार होणे आणि हवालदार व कोर्ट पेरवीच्या कमतरतेमुळे न्यायालयात प्रकरणे वेळेत चालू शकत नाहीत. परिणामी, प्रलंबित फौजदारी दाव्यांची संख्या सातत्याने वाढत आहे."
**— ॲड. राकेश सोनार,** फौजदारी वकील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील न्यायालयांमध्ये प्रलंबित दाव्यांची संख्या दिवसेंदिवस झपाट्याने वाढत असून, ही एक गंभीर आणि चिंताजनक बाब ठरत आहे. राज्यातील सत्र, जिल्हा आणि कनिष्ठ न्यायालयांमध्ये सध्या एकूण ५७ लाख ६४ हजार १०७ दावे प्रलंबित आहेत. यात ४० लाख १६ हजार १८५ फौजदारी तर १७ लाख ५३ हजार ९२ दिवाणी प्रकरणांचा समावेश आहे.



या प्रलंबित दाव्यांची संख्या वाढण्यामागे अनेक कारणे आहेत. त्यात सरकारी वकिलांची तीन वर्षांनी होणारी बदली, कोर्ट पेरवी व हवालदारांचे अपुरे मनुष्यबळ, आरोपी फरार असणे, कागदपत्रांची प्रतीक्षा, साक्षीदार फितूर होणे तसेच प्रकरणांची सातत्याने स्थगिती ही महत्त्वाची कारणे ठरतात.

पुणे जिल्ह्यात एकूण ७ लाख ७७ हजार ५९७ दावे प्रलंबित आहेत. त्यापैकी ५ लाख ९१ हजार २६० फौजदारी दावे आणि १ लाख ८६ हजार २३७ दिवाणी दावे आहेत. विशेष म्हणजे, प्रलंबित दाव्यांपैकी ८५ टक्के दावे फौजदारी स्वरूपाचे आहेत.

गेल्या एका महिन्यात जिल्ह्यात नव्याने ३४,१३५ दावे दाखल झाले असून, त्यातील ३१,९६५ फौजदारी आणि २,१७० दिवाणी दावे आहेत. मात्र, त्याच कालावधीत केवळ ५,७५२ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे. राज्यातील न्यायव्यवस्थेवरचा ताण दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. दाव्यांची वाढती संख्या, मनुष्यबळ व सुविधा यांचा अभाव, आणि कार्यप्रणालीतील ढिसाळपणा यामुळे सामान्य नागरिक न्यायापासून दूर राहत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे. न्यायालयीन व्यवस्थेत मूलभूत सुधारणा आवश्यक असल्याचे संकेत ही स्थिती देते.

**प्रलंबित फौजदारी दावे -**

- आरोपी फरार २,२४,४७०
- कागदपत्रांची प्रतीक्षा ५१,८२८
- काही कारणांसाठी स्थगिती ५१,१९४
- साक्षीदार अनुपस्थित किंवा फितूर ४,०९५
- रेकॉर्ड अनुपलब्ध ३,०३०
- उच्च न्यायालयात स्थगिती ८,९३१
- जिल्हा न्यायालयात स्थगिती १,३९३

**'फास्ट ट्रॅक' फक्त घोषणापुरतेच**

- महिला व बालकांवरील अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये न्यायप्रक्रिया गतीने पार पाडावी यासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट्स स्थापन करण्याची राज्य सरकारची वारंवार घोषणा करण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात अजूनही अनेक जिल्ह्यांमध्ये अशी न्यायालये कार्यान्वित झालेली नाहीत. त्यामुळे संबंधित पीडितांना न्याय मिळण्यास विलंब होत आहे. राज्यातील न्यायालयांना आवश्यक सुविधा, मनुष्यबळ व साधने मिळावीत, न्यायप्रक्रियेतील गती वाढवावी यासाठी काही सामाजिक कार्यकर्त्यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केल्या आहेत. मात्र, त्या याचिकाही अद्याप प्रलंबितच आहेत.

# बंदी असूनही अवजड वाहनांचा 'विळखा'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील महत्त्वाच्या आणि दाट लोकवस्ती असलेल्या परिसरांत बंदीच्या आदेशाला धाब्यावर बसवत अवजड वाहनांची वाहतूक सुरू असल्याचे वास्तव समोर आले आहे. मुंढवा-मांजरी, वाघोली-मांजरी, कोलवडी, महादेवनगर, सोलापूर रस्ता, सासवड रस्ता, महंमदवाडी आणि खराडी या मार्गांवर दररोज ट्रेलर, डंपर, मिक्सर आणि कंटेनर यांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ सुरू असून, यामुळे नागरिकांचे जीवन धोक्यात आले आहे.

शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक विभागाने अवजड वाहनांवर वेळोवेळी निर्बंध लागू केले आहेत. त्यानुसार, रात्री ११ ते सकाळी ६ या वेळेतच सर्व प्रकारच्या अवजड वाहनांना प्रवेश परवानगी आहे. मिक्सर वाहने सकाळी ११ ते संध्याकाळी ५, तर डंपर वाहनांना दुपारी १२ ते संध्याकाळी ४ या वेळेतच वाहतूक करण्याची मुभा आहे. अत्यावश्यक सेवेसाठी विशिष्ट मार्ग निश्चित करण्यात आले आहेत.

मात्र, प्रत्यक्षात हे नियम धाब्यावर बसवले जात असून, बंदीच्या वेळेतही अवजड वाहने उपनगरातून शहरात सर्रासपणे प्रवेश करत आहेत. या वाहनांचा वेग अधिक असल्याने अपघातांची शक्यता वाढली आहे. काही ठिकाणी अपघात झाल्याचीही नोंद आहे.

अवजड वाहनांमुळे शहरातील अनेक मुख्य रस्त्यांवर वाहतूक कोंडीचे चित्र दिसत आहे. या वाहनांमधून रस्त्यावर पडणारे वाळू, खडी व सिमेंट यामुळे दुचाकीस्वार, विद्यार्थी आणि पादचाऱ्यांना अपघाताचा धोका निर्माण होत आहे. शाळा सुरू होण्याच्या वेळेत पालक आणि विद्यार्थी यांना या धोकादायक वाहनांमुळे जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या परिस्थितीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक, स्थानिक प्रतिनिधी यांनी वाहतूक विभागाकडे वारंवार तक्रारी करत कठोर कारवाईची मागणी केली आहे. अनेक ठिकाणी होणारे अपघात, प्रदूषण आणि गोंधळामुळे लोकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.

"शहरात बंदीच्या काळात येणाऱ्या अवजड वाहनांवर नियमित कारवाई केली जात आहे. मनुष्यबळाच्या मर्यादा असल्या तरी आम्ही मार्शलच्या मदतीने विविध ठिकाणी गस्त वाढवली आहे. पुढील काळात ही कारवाई अधिक कडक केली जाईल.
**-राजेंद्र करणकोट;**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाहतूक शाखा, हडपसर

# वाचनाने मिळते विद्यार्थ्यांतील एकाग्रता वाढण्यास चालना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेस कॉलेज ऑफ फिजिओथेरपीमध्ये 'नाईन अवर्स सायलेंट रीडॅथॉन २०२५: मॅनेजिंग थ्रू इंडियन विस्डम' अर्थात सलग नऊ तास मौन वाचन महोत्सव: भारतीय तत्वज्ञानातून व्यवस्थापनाचा मार्ग दाखवणाऱ्या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले होते. 'सूर्यदत्त'च्या बावधन कॅम्पसमधील बन्सी-रत्न सभागृहात हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला. 'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या नेतृत्वात 'सूर्यदत्त'च्या उपाध्यक्षा व सचिव सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा आणि कॉलेजच्या प्राचार्या डॉ. सिमी रेठरेकर यांच्या मार्गदर्शनात न्युरोफिजियोथेरपीच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. हर्षदा कुंभार यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले.

ही अनोखी शैक्षणिक संकल्पना तब्बल २०० हून अधिक फिजिओथेरपी विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना एकत्र आणणारी ठरली. त्यांनी मोबाईल फोन आणि लॅपटॉपपासून दूर राहत सलग ९ तास पूर्ण शांतता पाळली. या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तके, स्व-सहाय्यता, व्यक्तिमत्त्व विकास विषयक पुस्तके, जर्नल्स, संशोधन प्रबंध, अभ्यास साहित्य आणि अन्य शैक्षणिक स्रोतांचे वाचन केले. डॉ. हर्षदा कुंभार आभार मानले. डॉ. सीमि रेठरेकर यांनी आशावादी भविष्याच्या प्रार्थनेने समारोप केला.



पुणे सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेस कॉलेज ऑफ फिजिओथेरपीमध्ये 'नाईन अवर्स सायलेंट रीडॅथॉन २०२५: मॅनेजिंग थ्रू इंडियन विस्डम' अर्थात सलग नऊ तास मौन वाचन महोत्सव: भारतीय तत्वज्ञानातून व्यवस्थापनाचा मार्ग दाखवणाऱ्या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले होते.

# विद्यार्थ्यांच्या 'अनमोल' त्रिसूत्रीतून समाजासमोर आदर्शाचा उत्तम 'खजिना'...!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ज्ञान आणि संस्कार हे उपजतच असावे लागतात; त्याला योग्य मार्गदर्शनाची जोड मिळाल्यास जीवन जगण्याला एक वेगळीच उर्जा प्राप्त होते. विशेष म्हणजे ज्ञान, संस्कार आणि मार्गदर्शन या त्रिसूत्रीच्या माध्यमातून उत्तम सांगड घातली आहे ती खराडी येथील सुंदरबाई मराठे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी. स्वत:चा वाढदिवस साजरा न करता या चिमुरड्यांनी आपल्या सहकारी असलेल्या गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी त्या वाचविलेल्या खर्चातून त्यांच्यासाठी चक्क शालेय गणवेश भेट देत त्यांच्या शालेय फी भरण्यासाठीही मोलाची साथ



दिली आहे. त्यांच्या या अनमोल भेटीने गोरगरीब विद्यार्थी चांगलेच भारावले होते. या 'अनमोल' अशा त्रिसूत्रीतून या चिमुरड्यांनी समाजातील इतरांसमोर आदर्शाचा एक उत्तम 'खजिना' सादर केला आहे. शालेय जीवन म्हटले तर तसे खेळण्या बागडण्याचे आणि मौजमज्जा करण्याचे वय. या वयातील वाढदिवस तसा अनमोल असाच दिवस समजला जातो; या दिवशी मित्रमैत्रीणीकडून होत असलेला शुभेच्छांचा वर्षाव हा सर्वांसाठीच हर्षोल्हसित करणारा एक भावनिक असा क्षण असतो. संध्याकाळी कापण्यात येणारा केक तर सर्वांसाठी अप्रुप अशीच बाब असते; परंतु या खर्चाला फाटा देऊन हाच पैसा समाजाच्या उपयोगासाठी देण्याची अनोखी हिम्मत या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दाखविली आहे. त्यासाठी त्यांच्यात दिलदारपणा आला आहे तो शिक्षकांनी दिलेले ज्ञान, संस्कार आणि मार्गदर्शन या त्रिसूत्रीच्या माध्यमातून. विशेष म्हणजे शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याने ही त्रिसूत्री तंतोतंत जोपासली असून त्याचे काटेकोरपणे पालन केले जात आहे. त्यांच्या या अभिनव उपक्रमाला हातभार लावण्यासाठी या शाळेत शिक्षण घेत असलेल्या गोरगरीब, चंदननगर येथील आनंद क्लॉथ सेंटर चे मालक अजित सिंगवी,आकाश सिंगवी यांनी संपूर्ण शालेय गणवेश भेट दिला.

**समीक्षाने दाखविला समाजकार्याचा नवा 'मार्ग'**



या वर्षी शाळेतील इयत्ता दहावीची विद्यार्थिनी कुमारी समीक्षा सिंगवी या विद्यार्थिनीने आपला वाढदिवस घरी साध्या स्वरूपात साजरा करून, पालकांकडे स्वतः कसला ही हट्ट न करता आपल्याच शाळेतील इयत्ता पाचवी ते दहावी वर्गातील ४५ मुलां मुलींना संपूर्ण शालेय गणवेश भेट देऊन एक वेगळा आदर्श शाळेसमोर ठेवला. या वेळी गरजू मुले व मुली भावुक झाली होती. या बद्दल तिचे आणि तिच्या पालकांचे संस्थेचे अध्यक्ष रामभाऊ मोझे ,उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मोझे शाळा समिती अध्यक्षा अलका पाटील, मुख्याध्यापक संजय सोमवंशी, पर्यवेक्षक सुनील वळसे,वर्गशिक्षक रोहित डामरे,विद्या कव्हेकर,संजय हुंबे,यांनी कौतुक केले.



विद्यार्थ्यांना अभ्यासासह समाजसेवेचेही ज्ञान मिळाले तर त्यांच्या ज्ञानात अधिकच भर पडत असते; याच भावनेतून आपल्यासारखेच अन्य गोरगरीब विद्यार्थ्यांनाही शिक्षण घेता यावे यासाठी त्यांना मदत करण्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये खोलवर रुजविण्यात आम्हाला अपेक्षित यश मिळाले आहे. त्यामुळे त्यांनाही एक वेगळाच आनंद मिळत आहे.
**-विद्या कव्हेकर,** वरिष्ठ शिक्षिका, सुंदरबाई मराठे विद्यालय;

# विमानतळावर बिबट्यांची 'जंगल सवारी'...!

## मार्ग बंद तरीही मुक्त संचार : वीस कॅमेरे तरीही ट्रॅप निष्फळ; अन्य प्राण्यांचाही वावर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**पुणे :** पुणे विमानतळ परिसरात असलेल्या बिबट्यांच्या बंदोबस्तासाठी वन विभाग व रेस्क्यू संस्थेच्या वतीने युद्धपातळीवर काम सुरू आहे. आतापर्यंत बिबट्याच्या प्रवेशाचे ३० मार्ग बंद केले आहेत. मात्र, तरीदेखील बिबट्याचा धावपट्टी जवळचा वावर अद्यापही आहे. बिबट्यावर बारीक लक्ष ठेवण्यासाठी २० कॅमेरा ट्रॅप लावण्यात आला आहे. यात एकपेक्षा अधिक बिबटे आढळून आल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. शिवाय येथे रानमांजर, ससे हेदेखील आढळून आले आहेत.

पुणे विमानतळावर सर्वांत प्रथम २८ एप्रिलला बिबट्याचे दर्शन झाले. मात्र येथे गेल्या काही वर्षांपासून बिबट्याचा वावर असल्याचे सामाजिक संस्थेचे म्हणणे आहे. धावपट्टीच्या जवळच बिबट्या आढळून आल्याने प्रवाशांसह यंत्रणांनी चिंता व्यक्त केली. धावपट्टी व टॅक्सी मार्गाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात भूमिगत सांडपाण्याच्या वाहिन्या आहेत. या ठिकाणीच कुत्रे व ससे असल्याने बिबट्याचादेखील येथे मुक्काम आहे. मात्र येथे वाहिन्यांचे मोठ्या प्रमाणात जाळे आहे. बिबट्याचे ठसे आढळून आलेल्या सुमारे ३० वाहिन्या जाळी लावून बंद करण्यात आल्या आहेत. असे असले तरीही काही दिवसांपूर्वीच हवाई दलाच्या अधिकाऱ्यांना विमानतळाच्या आतील परिसरात बिबट्या आढळून आला आहे.





बिबट्या काही दिवसांपूर्वी सीसीटीव्हीत दिसला. बिबट्याला लपण्यासाठी असलेल्या पावसाळी वाहिन्यांना जाळ्या लावून बंद केल्या आहेत. वन विभाग व विमानतळ प्राधिकरण त्यावर बारकाईने लक्ष ठेवून आहे. जाळ्या, पिंजरे लावण्यात आले आहेत.
**-मुरलीधर मोहोळ,** नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री



आम्ही बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवून आहोत. त्याचा विमानाला व प्रवाशांना धोका पोहोचू नये, म्हणून आम्ही आवश्यक त्या उपाययोजनांवर भर देत आहोत. त्याचे खाद्य कमी झाल्यावर त्याचा वावर या भागात राहणार नाही.
**- नेहा पंचमीया,** संस्थापक व अध्यक्ष रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट,

### का बनले विमानतळ बिबट्याचे 'टेरेन'

- पुणे विमानतळाच्या आतील भागात सुमारे २९०० एकर एवढी मोठी जागा आहे.
- माणसांचा वावर अत्यंत कमी
- कुत्रे, ससे यासारखे खाद्य मुबलक प्रमाणात उपलब्ध.
- पाण्याचीदेखील मुबलकता
- धावपट्टी व टॅक्सी मार्गाच्या खाली वाहिन्यांमध्ये लपण्यासाठी मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध



### बिबट्याला पकडण्यासाठी काय केले ?

- आतापर्यंत ६ ठिकाणी पिंजरा लावण्यात आला.
- बिबिट्या पिंजऱ्याच्या जवळून गेला; पण अडकला नाही.
- २० ठिकाणी कॅमेरा ट्रॅप लावण्यात आला.
- 'स्निफर डॉग्स' या प्रशिक्षित कुत्र्याकडूनदेखील बिबट्याचा शोध घेण्याचा प्रयत्न.
- एका वाहिनीजवळ 'वॉकिंग ट्रॅप' लावण्यात आला
- एवढे करूनदेखील आतापर्यंत एकही बिबट्या पकडला गेलेला नाही

# 'नाईटशिफ्ट'च्या 'झाडाझडती'चे 'थोतांड'...!

## दीड हजार कर्मचारी अन सुसज्ज यंत्रणा : सकाळी ढीगच ढीग

ऐतिहासिक आणि अनेक बिरुदे मिरवित असलेल्या पुणे शहराच्या वैभवात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे; स्वछतेच्या बाबतीत पुणे देशात आठव्या क्रमांकाचे शहर असल्याचे अधोरेखित झाले असून त्यासंदर्भात नुकतीच अधिकृत घोषणा झाली आहे. त्यासाठी महापालिका प्रशासनाने आपली यंत्रणा कार्यान्वित केली आहे, विशेष म्हणजे यांत्रिकीकरणासह तब्बल दीड हजार कामगार साफसफाईसाठी जुंपले आहेत. या कामाचा वाहतूकीवर विपरीत परिणाम होउ नये यासाठी 'नाईटशिफ्ट' करून शहराची स्वच्छता करण्यात येत आहे; परंतु रात्री करण्यात आलेली ही 'झाडाझडती' केवळ नावापुरतीच राहात असल्याचे स्पष्ट झाले असून ते केवळ 'थोतांड' ठरत आहे.

स्वच्छता विभागाचे उपायुक्त संदीप कदम यांनी सांगितले की, "शहरातील सर्व भाग स्वच्छ ठेवण्यासाठी कर्मचारी तैनात आहेत. पहाटेपर्यंत एक शिफ्ट तर दुपारी दुसरी शिफ्ट काम करते. उपनगर व समाविष्ट गावांपर्यंत ही सेवा पोहोचावी यासाठी वॉर्डस्तरावर सूचनाही देण्यात आल्या आहेत. त्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत; त्याशिवाय या उपक्रमात सातत्य ठेवण्यास प्रशासनाच्या वतीने प्राधान्य देण्यात येणार आहे.
**-संदीप कदम,** उपायुक्त, घनकचरा विभाग,पुणे मनपा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्याच्या उद्देशाने महापालिका प्रशासनाने रात्रीच्या वेळेत विशेष स्वच्छता मोहीम सुरू केली आहे. महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांच्या आदेशानुसार रात्री दहा ते पहाटे सहा या वेळेत शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठा, वसाहती आणि अंतर्गत भागांची झाडलोट करण्यात येत आहे. यासाठी 1490 कर्मचारी तैनात करण्यात आले असून, आधुनिक यंत्रणांचा वापर केला जात आहे.स्वच्छतेसाठीचा प्रशासनाचा हा उपक्रम निश्चितच स्वागतार्ह असला, तरी प्रत्यक्षात त्याचे परिणाम फारसे समाधानकारक दिसत नाहीत. शहरातील काही निवडक भागांतच नियमित स्वच्छता होत असून, बहुतांश परिसर अजूनही कचऱ्याच्या समस्येने त्रस्त आहे. विशेषतः उपनगर आणि समाविष्ट गावांमध्ये कचरा न उचलता रस्त्यावरच पडून असल्याचे चित्र आहे.

दररोज २०० ते २४० मेट्रिक टन कचरा संकलित केला जातो, असा दावा महापालिकेचा असला, तरीही अनेक भागांत कचऱ्याचे ढीग तसेच पडलेले दिसत आहेत. स्वच्छतेच्या कामात व्यावसायिक आणि प्रमुख भागांनाच अधिक प्राधान्य दिले जात असल्याने, रहिवासी आणि उपेक्षित परिसरांमध्ये अस्वच्छता कायम आहे.

शहर स्वच्छतेबाबत प्रशासनाकडून प्रयत्न सुरू असले तरी, काही भागांत कर्मचारीच फिरकत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

"रात्री स्वच्छतेचा उपक्रम सुरू आहे हे खरं, पण प्रत्यक्षात तो फारच मर्यादित भागांपुरता आहे. अनेक ठिकाणी कचरा पडूनच राहतो. ही मोहीम केवळ कागदावरच आहे की काय, अशी शंका येते.

### कधी बदलणार नागरिकांची मानसिकता ?

- कचरा उघड्यावर टाकला गेल्याने गेल्या काही वर्षांच्या कालावधीत शहराला साथीच्या रोगांनी अक्षरश: विळखा घातला आहे, त्याशिवाय डासांच्या प्रमाणातही वाढ झाली आहे. त्याबाबत अनेक नागरिकांनी प्रशासनावर टीकेची झोड उठविली होती. त्याची गंभीर दखल घेऊन प्रशासनाने गेल्या काही दिवसांच्या कालावधीत स्वच्छतेवर सर्वाधिक भर दिला आहे, परंतु नागरिकांची मानसिकता अद्याप बदललेली नाही. नागरिक उघड्यावरच कचरा टाकत असल्याने या घाणीमध्ये आणखीनच भर पडत आहे; त्यामुळे प्रशासनावर टीका करण्याच्या आधी स्वत:ची मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे.

# 'लालपरी'तून घडणार धार्मिक पर्यटनाची 'वारी'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जर तुम्ही धार्मिक स्थळांना भेट देण्याची इच्छा बाळगणारे पर्यटनप्रेमी असाल, तर ही बातमी तुमच्यासाठी विशेष आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी महामंडळ) पुणे विभागातील स्वारगेट आगाराने यात्रेकरूंना आणि पर्यटकांना लक्षात घेऊन धार्मिक पर्यटनासाठी विशेष बस सेवा सुरू करण्याचे नियोजन केले आहे.

या उपक्रमामुळे प्रवाशांना महाराष्ट्रातील चार प्रमुख धार्मिक स्थळांची यात्रा एका ठिकाणी सुरक्षित आणि सोयीस्कर पद्धतीने करता येणार आहे. ही सेवा जुलै महिन्यात विविध तारखांना निमआराम बसगाड्यांमधून उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### प्रस्तावित धार्मिक पर्यटन योजना

**पाच ज्योतिर्लिंग दर्शन यात्रा**

स्थळे : भीमाशंकर, घृष्णेश्वर, त्र्यंबकेश्वर, परळी वैजनाथ, औंढा नागनाथ

- **कालावधी : १९ ते २१ जुलै (३ दिवसांची सहल)**
- **बस प्रकार : निमआराम**
- **गाणगापूर - अक्कलकोट - तुळजापूर यात्रा**
- **कालावधी : २२ ते २३ जुलै (२ दिवसांची सहल)**
- **बस प्रकार : निमआराम**
- **अष्टविनायक दर्शन यात्रा**
- **कालावधी : २५ ते २६ जुलै (२ दिवसांची सहल)**
- **बस प्रकार : निमआराम**
- **रायगड किल्ला दर्शन यात्रा**
- **दिनांक : ३० जुलै (१ दिवसाची सहल)**
- **बस प्रकार : निमआराम**

"या विशेष पर्यटन बससेवेमुळे प्रवाशांना एसटी महामंडळाच्या माध्यमातून सुरक्षित, सोयीस्कर आणि परवडणाऱ्या दरात महाराष्ट्रातील महत्त्वाच्या धार्मिक स्थळांना भेट देता येणार आहे. पुणेकरांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा.ही सेवा केवळ प्रवाशांच्या धार्मिक श्रद्धेला अधोरेखित करत नाही, तर महाराष्ट्रातील ऐतिहासिक आणि धार्मिक वारशाचा अनुभव घेण्याची संधीही पुरवते. इच्छुक प्रवाशांनी लवकरात लवकर जवळच्या एसटी आगाराशी संपर्क साधावा व आपल्या सहलीचे आरक्षण निश्चित करावे.
**-पल्लवी पाटील;** आगार व्यवस्थापक, स्वारगेट, एसटी महामंडळ

# 'फर्ग्युसन'मध्ये वृक्ष लागवडीच्या मोहिमेला प्रारंभ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'च्या फर्ग्युसन महाविद्यालयात एक हजार देशी वृक्ष लागवडीच्या मोहिमेचा शुभारंभ फुलगाव येथील श्री श्रुतीसागर आश्रमाचे संस्थापक स्वामी स्वरूपानंद सरस्वती यांच्या हस्ते आज करण्यात आला.रा. स्व. संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक नानासाहेब जाधव यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. सोसायटीच्या नियामक मंडळ आणि परिषदेचे अध्यक्ष प्रमोद रावत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. उपाध्यक्ष ॲड. अशोक पलांडे, कार्यवाह डॉ. आनंद काटीकर, पर्यावरण समितीचे अध्यक्ष विवेक मठकरी, प्राचार्य डॉ. श्याम मुडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाला संस्थेचे सर्व विश्वस्त, संचालक,प्राचार्य, बँकांचे अधिकारी अधिकारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

नानासाहेब जाधव म्हणाले, "पर्यावरणाचे असंतुलन व्हायला आपण सर्वजण जबाबदार आहोत. आपण ती जबाबदारी स्वीकारली पाहिजे. विकासाच्या चुकीच्या धारणा आणि आपली दोषयुक्त जीवनशैली पर्यावरणाचा ऱ्हास व्हायला कारणीभूत आहेत.स्वामी स्वरूपानंद सरस्वती म्हणाले, " विकासाच्या नावावर आपण अहोरात्र काम करत आहोत. परंतु काय विकास झाला आणि किती विकास झाला हा प्रश्न आहे. सर्व जण विकासाची भाषा बाह्य अंगानेच वापरतात. हा परिसर अधिक जैववैविध्य संपन्न करण्याच्या उद्देशाने आज शंभर प्रजातींचे एक हजार वृक्षांच्या लागवडीचा शुभारंभ केल्याची माहिती पर्यावरण समितीचे अध्यक्ष विवेक मठकरी यांनी प्रास्ताविक भाषणात दिली.



**पुणे** 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'च्या फर्ग्युसन महाविद्यालयात एक हजार देशी वृक्ष लागवडीच्या मोहिमेचा शुभारंभ फुलगाव येथील श्री श्रुतीसागर आश्रमाचे संस्थापक स्वामी स्वरूपानंद सरस्वती यांच्या हस्ते आज करण्यात आला.

# राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धेत शिवाजी मित्र मंडळ प्रथम




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे आयोजित राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धा २०२४ मध्ये पुणे शहर महापालिका क्षेत्र विभागात भोसले मार्ग भवानी पेठेतील शिवाजी मित्र मंडळाने प्रथम क्रमांक पटकाविला आहे. तर, एरंडवण्यातील श्री शनि मारुती बाल गणेश मंडळाने द्वितीय, नाना पेठेतील पोटसुळ्या मारुती मंडळाने तृतीय, नवी खडकी येरवडा येथील नवज्योत मित्र मंडळ ट्रस्टने चौथे तर भांडारकर रस्त्यावरील विनायक नवयुग मित्र मंडळाने पाचव्या क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले आहे. स्पर्धेत सहभागी झालेल्या १९४ मंडळे व शाळांपैकी १०६ मंडळे व शाळांनी पारितोषिके मिळविली असून एकूण १४ लाख ९५ हजार रुपयांची बक्षिसे देण्यात येणार असल्याची घोषणा ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी आणि सरचिटणीस व आमदार हेमंत रासने यांनी पत्रकार परिषदेत केली.

पत्रकार परिषदेला ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे यांसह सुवर्णयुग तरुण मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धेत शिवाजी मित्र मंडळाच्या नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनावर आधारित सजीव देखाव्याला ५१ हजार रुपयांचे, श्री शनि मारुती बाल गणेश मंडळाच्या दुधाची भेसळ या देखाव्याला ४५ हजारांचे, पोटसुळ्या मारुती मंडळाच्या व्यसनमुक्ती या सजीव देखाव्यास ४० हजारांचे, नवज्योत मित्र मंडळ ट्रस्टच्या नको व्यसन नशेचे तर असावे खेळाचे आणि विनायक नवयुग मित्र मंडळाच्या मी पुस्तक बोलतोय या देखाव्याला ३० हजार रुपयांचे बक्षिस जाहीर करण्यात आले.

### रविवारी पारितोषिक वितरण

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ रविवार, दिनांक २० जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता गणेश कला क्रीडा मंच, स्वारगेट येथे होणार आहे. पारितोषिक वितरण महसूलमंत्री चंद्रशेखर बानवकुळे यांच्या हस्ते होणार असून पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. याशिवाय जगद्गुरु कृपांकित डॉ. चेतनानंद महाराज पुणेकर, माजी आमदार उल्हास पवार, माजी महापौर अंकुश काकडे, अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात, श्री कसबा गणपती मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत शेटे आदी उपस्थित राहणार आहेत.



## प्रभात रोडवर कपडे संकलन साठी बॉक्सची सोय

**पुणे :** गुडविल इंडिया तर्फे हिरवाई गार्डन (प्रभात रोड) याठिकाणी मस्त ग्रुपचे बाळासाहेब गांजवे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कपडे संकलनसाठी बॉक्स ठेवण्यात आला. याचे उदघाटन पुण्यातील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक ईश्वरशेठ गोयल यांचे हस्ते करण्यात आले.

त्याचप्रमाणे मस्त ग्रुपचे बाळासाहेब गांजवे, ईश्वरसेठ गोयल, शिवप्रसाद चरखा, हेमंत डोंबे व सुधीर चौधरी यांच्या सहकार्याने पाच गरजु नववधूंना संपूर्ण भांड्यांचा संच, साडी व चप्पल भेट देण्यात आली. याप्रसंगी नववधू गौरी सुरवसे, राधा काळे, दिव्या मोरे, प्रियांका जाधव, मयुरी लोखंडे यांना आशीर्वाद देताना बाळासाहेब गांजवे म्हणाले "गुडविलच्या कन्यारत्न योजनेचा लाभ ज्या मुलींना मिळाला आहे त्यांनी उद्या त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर पुढील गरजू मुलींना जरूर आर्थिक मदत करून गुडविलचे हे कार्य खऱ्या अर्थाने पूर्णत्वास नेण्याची काळाची गरज आहे." यावेळी गुडविलचे कालिदास मोरे यांनी गुडविलच्या निरनिराळ्या उपक्रमाची सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी मस्त ग्रुपचे सर्व सदस्य व गुडविलच्या संपदा अलाटे उपस्थित होत्या.



## अण्णाभाऊ साठे शोषित पिढीचे प्रेरणास्रोत : डंबाळे

**पुणे :** लोकशाहीर आण्णाभाऊ साठे हे शोषित पीडित जनतेचे प्रेरणास्त्रोत असून त्यांच्या साहित्यातून व सामाजिक चळवळीच्या कार्यातून नाही रे वर्गाला संघटित होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर चालण्याचे बळ प्राप्त झाले असल्याचे मत रिपब्लिकन युवा मोर्चाचे नेते राहुल डंबाळे यांनी व्यक्त केले. साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने सारसबाग येथील पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन सभेचे आयोजित करण्यात आली होते यावेळी डंबाळे यांनी वरील मत व्यक्त केले. याप्रसंगी आंबेडकरी चळवळीतील नागेश भोसले , सत्यवान गायकवाड, सागर धाडवे , आनंद घरात, रवीभाऊ आरडे, प्रकाश वैराळ यांच्यासह पुणे शहर मातंग समाजाचे सचिव दीपक कसबे व जयंती महोत्सव समितीच्या स्वागताध्यक्ष लक्ष्मीताई पवार आदी मान्यवर उपस्थित होते.



## वाडेबोल्हाई येथे बिबट्याचे वास्तव्य; मेंढीवर हल्ला

**वाघोली :** मागील काही महिन्यांपूर्वीच वाडेबोल्हाई येथे मेंढपाळ यांच्या बिबट्याने ८ शेळी ठार केल्याची घटना ताजी असतानाच वाडेबोल्हाई(ता.हवेली) येथे भोरवस्ती व मुळा मुठा नदीच्या काठावर असलेल्या घनदाट उसाच्या शेती परिसर व गावात गेले आठवडा झाला बिबट्या वास्तव्य करीत आहे.बिबट्याने इंगळे मळ्यात मेंढीवर हल्ला करीत गळ्याचा लचका तोडल्याने मेंढी जखमी झाली असल्याचे युवराज इंगळे यांनी सांगितले. वाडेबोल्हाई गावामध्ये दोन बिबट्यांचे वास्तव्य असल्याचे माजी उपसरपंच शिवाजी भोर,युवा कार्यकर्ते राहुल शिंदे,कृषी उद्योजक नितीन गावडे,वायरमन अमोल पायगुडे,राहुल इंगळे यांनी माहिती देताना सांगितले.भोर वस्तीत नवनाथ भोर यांच्या शेतातील बिबट्या आढळला आहे.तर पटेल तलावाच्या परिसरात बिबट्याला पाहिल्याचे अनिल उर्फ अण्णासाहेब वारघडे यांनी सांगितले.तसेच गावामध्ये विविध ठिकाणी रात्रीच्या वेळी जाऊन हा बिबट्या शिकारीसाठी वास्तव्य करीत असल्याचे माहिती देताना पै.मारुती ठवरे यांनी सांगितले. वाडेबोल्हाई येथे बिबट्याचे वास्तव्य असल्याचे समजताच पूर्व हवेली परिसरामध्ये शेतकरी वर्ग व नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे.

## पुण्यात आज तत्काळ पासपोर्ट मोहीम

**पुणे :** परराष्ट्र मंत्रालयाच्या पुढाकाराने पुणे प्रादेशिक पासपोर्ट कार्यालयाच्या वतीने येत्या शनिवारी, १९ जुलै रोजी 'तत्काळ विशेष पासपोर्ट मोहीम' राबविण्यात येणार आहे. ही मोहीम पुण्यातील पासपोर्ट सेवा केंद्रात आयोजित केली असून, तत्काळ श्रेणीत अपॉइंटमेंट लवकर मिळावी यासाठी ही विशेष कार्यवाही करण्यात आली आहे.

अनेक अर्जदार अपूर्ण किंवा चुकीच्या माहितीमुळे अर्ज सादर करताना अपयशी ठरतात. त्यामुळे अपॉइंटमेंट मिळूनही पासपोर्ट प्रक्रियेत अडथळा येतो. याच पार्श्वभूमीवर, अर्जदारांना पूर्ण व अचूक माहिती मिळावी आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करता यावी यासाठी ही विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे, असे प्रादेशिक पासपोर्ट कार्यालयाने स्पष्ट केले आहे. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन पासपोर्ट कार्यालयाने केले आहे.



## कोंढव्यातील भाजी विक्रेत्यांना जागा देण्यात यश

**पुणे :** कोंढवा येथील भाजी विक्रेते, पथारी व्यावसायिक यांना जागा मिळवून देण्यात इनक्रेडिबल समाजसेवक ग्रुप चे संस्थापक असलम बागवान यांच्या सत्याग्रहला, प्रयत्नाला यश आले आहे.त्यांच्या समवेत भाजी विक्रेते,पथारी व्यावसायिक ,सामाजिक संघटना सहभागी झाले.शीतल पंपामागील जागा, कुमार पृथ्वी सोसायटी समोरील ओटा मार्केट ची जागा भाजी विक्रेते, पथारी विक्रेते यांना पालिकेकडून उपलब्ध करण्यात आली आहे. या मुद्द्यावरून गेले २६ दिवस संघर्ष,वाद आणि तक्रारी सुरु होत्या.

असलम बागवान यांच्या सत्याग्रही प्रयत्नांना या नीलम अय्यर , महाराष्ट्र फेरीवाला क्रांती महासंघचे काशीनाथ नखाते यांनी विशेष सहकार्य केले तसेच मासूम संस्था,जन आंदोलनाची राष्ट्रीय समन्वयक समिती यांनी पाठिंबा दिला तसेच भारतीय काँग्रेस पार्टी,शिवसेना उद्धव गट तसेच राष्ट्रवादी शरद पवार गट, जनशक्ती पार्टी लोकसेना पार्टि भारतीय रिपब्लिकन पार्टी च्या कार्यकर्त्यांनी तसेच स्थानिक नागरीकांनी या सत्याग्रहास पाठिंबा दिला.

## परिचारिकांचे राज्यव्यापी कामबंद आंदोलन सुरू

**पुणे :** सातव्या वेतन आयोगातील वेतन त्रुटींचे निवारण आणि कंत्राटी भरतीचा निषेध करण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेने राज्यभरात कामबंद आंदोलन छेडले आहे. १७ जुलैपासून सुरु झालेल्या या आंदोलनात ससून सर्वोपचार रुग्णालयातील ३४५ परिचारिकांनी संप पुकारला आहे.

संघटनेकडून स्पष्ट करण्यात आले की, मागण्या पूर्ण होईपर्यंत हा संप बेमुदत चालणार आहे. ससून रुग्णालयात सध्या तीन शिफ्टमध्ये एकूण ९३९ परिचारिका कार्यरत आहेत. यातील सुमारे निम्म्या परिचारिका संपात सहभागी झाल्याने रुग्णसेवेवर काही प्रमाणात परिणाम झाला आहे. तथापि, उर्वरित परिचारिका कामावर असल्याने सेवा पूर्णतः कोलमडलेली नाही, अशी माहिती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार यांनी दिली.या आंदोलनाचे नेतृत्व लातूर येथील संघटनेच्या मुख्यालयातून करण्यात येत असून, पुणे शाखेच्या अध्यक्षा आरिफा शेख, सचिव विनय देसाई आणि इतर पदाधिकाऱ्यांनी आंदोलनाची माहिती दिली.संघटनेने इशारा दिला आहे की, जर शासनाने मागण्यांकडे तात्काळ लक्ष दिले नाही, तर १८ जुलैपासून अधिक तीव्र स्वरूपाचे बेमुदत कामबंद आंदोलन हाती घेतले जाईल.

## महाविद्यालयांतील टाय-अपवर सरकारचा दणका

**पुणे :** राज्यातील अनेक कनिष्ठ महाविद्यालये आणि खासगी शिकवणी वर्ग यांच्यातील आघाडीमुळे शिक्षणव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या टाय-अपमुळे विद्यार्थी केवळ नोंदणीसाठी महाविद्यालयात दाखल होत असून, प्रत्यक्ष शिक्षण मात्र शिकवणी वर्गांमध्ये घेत असल्याचे मोठ्या प्रमाणावर समोर येत आहे. या प्रकाराला आळा घालण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली असून, खासगी शिकवणी वर्गांचे नियमन करण्यासाठी स्वतंत्र अधिनियम तयार करण्याची कार्यवाही सुरू असल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विधानसभेत दिली.

विधानसभेच्या चालू अधिवेशनात आमदार हिरामण खोसकर यांनी या विषयावर तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना भुसे म्हणाले, "राज्यातील अनेक खासगी क्लासेसनी महाविद्यालयांशी करार करून विद्यार्थ्यांना केवळ नोंदणीसाठीच महाविद्यालयात दाखल करून घेतले आहे. प्रत्यक्षात हे विद्यार्थी संपूर्ण वेळ खासगी शिकवणी वर्गांमध्ये शिक्षण घेतात. या पद्धतीमुळे महाविद्यालये केवळ 'शेल संस्था' बनल्या आहेत."

विशेष म्हणजे, दहावीला ९० टक्केहून अधिक गुण मिळवणारे विद्यार्थीही नामांकित महाविद्यालयांऐवजी नीट, जेईई, सीईटी अशा स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी शिकवणी वर्गांशी करार असलेल्या महाविद्यालयात प्रवेश घेतात. परिणामी, काही अल्पपरिचित महाविद्यालयांचा कट-ऑफ अनाठायी वाढतो, तर दर्जेदार संस्थांना अपेक्षित विद्यार्थी मिळत नाहीत.

## समूह शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षण शिबिरे घ्या

**पुणे :** जिल्ह्यात क्लस्टर पद्धतीने निश्चित केलेल्या फळपिके व इतर महत्त्वाच्या पिकांच्या लागवडीसाठी शेतकऱ्यांना व्यापक प्रशिक्षण देणे गरजेचे असून, त्यासाठी संबंधित भागात मोठ्या प्रमाणावर शिबिरे आयोजित करावीत, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.

"प्रशिक्षित मास्टर ट्रेनर्स इतर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतील, त्यामुळे लागवड क्षेत्र वाढीस हातभार लागेल," असेही ते म्हणाले.

'दिशा कृषी उन्नतीची – २०२९' या पंचवार्षिक अभियान आणि 'ॲग्री हॅकॅथॉन' या उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत डुडी बोलत होते. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे, 'आत्मा'चे प्रकल्प संचालक सूरज मडके, कृषी विज्ञान केंद्रांचे प्रतिनिधी, सर्व तालुक्यांचे कृषी अधिकारी आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांचे पदाधिकारी उपस्थित होते.जिल्हाधिकारी डुडी म्हणाले, "दिशा अभियानांतर्गत निश्चित केलेल्या पिकांच्या उत्पादन लक्ष्यांपर्यंत पोहोचण्यासाठी नियोजनबद्ध अंमलबजावणी, प्रशिक्षणाद्वारे जनजागृती आणि शेतकऱ्यांचा व्यापक सहभाग आवश्यक आहे. त्याचप्रमाणे प्रक्रिया उद्योगांची उभारणी करून शेतकऱ्यांना हमी बाजारपेठ व योग्य भाव मिळेल.

# बेशिस्त वाहतुकीतून वाहनचालकांचा 'आहेर'...!

## साडेसत्तावीस लाख वाहने 'आईटीएमएस'च्या 'जाळ्यात': ४७० कोटींचा दंड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील वाढते अपघात रोखण्यासाठी परिणामकारक उपाययोजना म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने महामार्गावर इंटेलिजंट ट्रॅफिक मॉनिटरिंग सिस्टीम (आईटीएमएस) यंत्रणा बसविली. त्यास आज (शुक्रवारी) एक वर्ष झाले. या कालावधीत बेदरकार चालकांनी वाहतूक नियमांचे केल्याबद्दल २७ लाख ७६ हजार वाहनांवर दंडात्मक कारवाई झाली. त्यातून ४७० कोटींचा दंड ठोठावण्यात आला. यापैकी ५१ कोटी ३२ लाखांचा दंड वसूल झाला.

सहापदरी द्रुतगती मार्ग ९४.५ किलोमीटर लांबीचा आहे. मुंबई-पुण्याशिवाय साताऱ्यापासून कोकणात आणि पुढे बंगळूरला जाण्यासाठी हा मार्ग वापरला जातो. यावरून दररोज एक लाखांहून जास्त वाहने प्रवास करतात. वाढते अपघात रोखण्यासाठी ही यंत्रणा बसविण्यात आली. मार्गावरील महत्त्वाच्या तसेच अपघातप्रवण असलेल्या ५२ ठिकाणी कृत्रिम प्रज्ञेवर (एआय) आधारित यंत्रणा बसविण्यात आली. यात अत्याधुनिक ३३७ कॅमेरे







आणि रडारचा समावेश आहे. याशिवाय 'वेट इन मोशन' यंत्रणाही याचा एक भाग आहे. यात वाहन रस्त्यावरून धावत असले तरी त्यात भरलेल्या मालाचे वजन मोजता येते. त्यामुळे वाहनात क्षमतेपेक्षा जास्त वजनाचा माल असल्याचे स्पष्ट होते.

वाहनांवर निगराणीसाठी लोणावळा येथील कुसगावमध्ये 'कमांड कंट्रोल सेंटर' उभारण्यात आले आहे. यात सार्वजनिक बांधकाम विभाग आणि 'आरटीओ'चे अधिकारी तसेच पोलिस कर्मचारी तैनात आहेत. पिंपरी-चिंचवड, पुणे आणि पनवेल येथील मोटर वाहन निरीक्षकांमार्फत १८ नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात येते.

### सहा महिन्यांत १०० अपघात

अद्ययावत यंत्रणा कार्यान्वित होऊनही अपघातांची संख्या कमी होत नाही. यावर्षी जानेवारी ते जून सहा महिन्यांतच १०० अपघात झालेत. यात ३० नागरिकांचा मृत्यू झाला, तर ६२ जण गंभीर आणि ५३ जण किरकोळ जखमी झाले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत अपघातांची संख्या घटली असली तरी अजूनही अपघातांचे प्रमाण मात्र जास्तच असल्याचे दिसून येते.

### वाहन भरधाव चालविणे

- मार्गिका अचानक बदलणे
- 'सीटबेल्ट' न लावणे
- नो-पार्किंग
- चुकीच्या मार्गिकेतून प्रवेश
- वाहन चुकीच्या बाजूने चालवणे
- बोगद्यात वाहन थांबविणे
- वाहनात क्षमतेपेक्षा जास्त माल भरणे
- अवजड वाहन उजव्या मार्गिकेतून चालविणे

### नियमांच्या उल्लंघनाचे प्रकार

- वेगात वाहन चालविणे - १२.२१
- 'सीटबेल्ट' न लावणे (प्रवासी) - ६.६२
- 'सीटबेल्ट' न लावणे (चालक) - २.६३
- चुकीची मार्गिका - ४.९

# 'लगीनघाईने' रुग्णालयालयालाच 'डोस'

### मान्यताच रद्द होण्याची भीती : प्रशासनाला अखेर जाग

पुणे महापालिकेने घाई गडबडीत भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय सुरु केले. पण तीन वर्षानंतर त्याचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत. राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने (एनएमसी) सुधारणेसाठी अखेरच्या चार महिन्यांची मुदत दिली आहे, अन्यथा मान्यता रद्द होणार आहे. त्यामुळे आज तातडीने कमला नेहरू रुग्णालयात ४३० खाटांचे रुग्णालय सुरु करण्याचा निर्णय आयुक्त नवल किशोर राम यांनी घेतला आहे.त्यामुळे पुढील चार महिन्यात ४३० खाटांचे रुग्णालय कमला नेहरू रुग्णालयात उभारले जाईल. नायडू रुग्णालयाच्या जागेत महाविद्यालयाची इमारत उभारली जात असली तरी तेथील अतिक्रमण झाल्याने अडचणी आहे. त्याठिकाणी २८० खाटांचे रुग्णालय उभारले जाणार आहे.



> 'वैद्यकीय महाविद्यालय सुरु करताना व्यवस्थित नियोजन न केल्याने असा ही परिस्थिती निर्माण झाली आहे. वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या इमारतीचे काम पूर्ण होण्यास किमान एका वर्ष लागणार आहे.
> **-नवलकिशोर राम,** आयुक्त, पुणे महापालिका



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेने २०२२ मध्ये मंगळवार पेठेत वैद्यकीय महाविद्यालय सुरु केले. त्यानंतर महाविद्यालय व वसतिगृहाची उभारणी, पदभरती, रुग्णालय सुरु करणे याकडे दुर्लक्ष केले गेले. राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने महापालिकेच्या या कामावर ताशेरे ओढून सुधारणा करण्यासाठी नोटीस बजावली. पण प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले.त्यानंतर वर्षभराने दुसरी नोटीस महापालिकेला बजावून मान्यता रद्द का करून असे असा प्रश्न विचारला आहे. दरम्यान, आयुक्त नवल किशोर राम यांनी सुधारणा करण्यासाठी चार बैठक घेतली. पुढील चार महिने हे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

वैद्यकीय महाविद्यालय सुरु करताना त्यासाठी मनुष्यबळ असणे आवश्यक आहे, त्यासाठी ९८० जणांच्या भरतीला आज मान्यता दि ली आहे. तसेच सध्याचे कंत्राटी डॉक्टर, नर्स, तंत्रज्ञ आदी कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या कराराला मुदतवाढ दिली आहे. पुढील काही दिवसात नव्याने पदभरती केली जाईल असे नवल किशोर राम यांनी सांगितले.

### ७०० कोटी रुपयांची मागणी

- भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याचे काम महापालिकेने सुरु केले आहे. यासाठी तीन विभागात बांधकाम सुरु असून, त्याचे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यासाठी ७०० कोटी रुपये खर्च येणार आहे. त्याची तरतूद महापालिकेने केली आहे.पण या वैद्यकीय महाविद्यालयासाठी रुग्णालय उभा करणे आवश्यक असून, त्यासाठी ७०० कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. यासाठीच निधी महापालिकेकडे उपलब्ध नसल्याने यासाठी राज्य सरकारकडे मागणी केली जाणार आहे, असे आयुक्तांनी सांगितले.

# 'एमएसएमई' परिषदेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी बोराटे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बावधन :** भारत सरकारच्या सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योग परिषदेच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष पदी अक्षय बोराटे यांची निवड करण्यात आली. भारत सरकारच्या 'हर घर रोजगार,हर हात को काम' या संकल्पपूर्तीसाठी परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप मिश्रा यांनी बोराटे यांची निवड केली आहे.

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग 'एमएसएमई' हे भारत सरकारचे मंत्रालय आहे. जितन राम मांझी हे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री आहेत. भारतातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांशी संबंधित नियम, नियम आणि कायदे तयार करण्यासाठी आणि प्रशासनासाठी ही सर्वोच्च कार्यकारी संस्था आहे. ही परिषद भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या व्यापक चौकटी अंतर्गत काम करते आणि धोरणे तयार करण्यात, वकिली करण्यात आणि एमएसएमई क्षेत्राच्या वाढीस आणि शाश्वततेला प्रोत्साहन देण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने 'एमएसएमई' च्या माध्यमातून 'हर घर रोजगार,हर हात को काम' असा संकल्प सोडला आहे.त्यानुसार राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप मिश्रा यांनी देशभरात योजना राबवित आहेत.महाराष्ट्र राज्यामध्ये या



योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अक्षय बोराटे यांच्यावर उपाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. अक्षय बोराटे हे पुणे जिल्ह्यातील एका छोट्याशा गावातील रहिवासी असून गेली अनेक वर्षे उद्योग, व्यवसाय वृद्धीसाठी समाजकारणात सक्रिय आहेत. गेल्या १० वर्षांपासून 'निर्मिक कॉर्प प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीच्या माध्यमातून यशस्वी उद्योजक म्हणून नावलौकिक कमावून आहेत.

बोराटे म्हणाले, मी स्वतः ग्रामीण भागातील असल्याने मला ग्रामीण भागातील तरुणांच्या व्यथा माहिती आहेत. या तरुणांमध्ये प्रचंड क्षमता असून देखील योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने त्यांनी शहरी भागात जाऊन तुटपुंज्या पगाराची नोकरी करून गुजराण करावी लागते. ग्रामीण भागात काम करण्यासाठी प्रचंड मोठी जैवविविधता आहे.

# आण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न द्यावा : यादव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आपल्या शाहिरीतून आणि आपल्या लेखणीतून आपले विचार महाराष्ट्र बाहेर पोहोचवणारे थोर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारत सरकारने त्वरित भारत रत्न किताब देऊन त्यांच्या साहित्याचा गौरव करावा अशी मागणी पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभाग येरवडा ब्लॉक च्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमाप्रसंगी सुजित यादव यांच्या व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अनुसूचित विभागाच्या उपाध्यक्ष प्रियंका रणपिसे यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी रावसाहेब खंडाळे,महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित विभागाच्या उपाध्यक्ष प्रियंका रणपिसे,युवानेते विशाल मलके युवानेते, विल्सन चंदेवाल,ब्युवा नेते सचिन भोसले,लॉक अध्यक्ष हेमंत राजबोज,संतोष पाटोळे, विशाल जाधव, अक्षय माने,राजेंद्र भुतडा,त्याचप्रमाणे सनी राव,नंदु राक्षे,उमेश मोरे,योगेश शिर्के,अमित कांबळे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते कार्यक्रमाचे आयोजन येरवडा ब्लॉक काँग्रेस कमिटी अनुसूचित विभागाचे पुणे शहर उपाध्यक्ष सुनील काळोखे, अमर मंडलिक, ईश्वर गायकवाड, राज सकट, दयानंद तानावडे, संतोष हंगर्गी संदीप कांबळे यांनी केले.



**पुणे** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृती दिनानिमित्त महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अनुसूचित विभागाच्या उपाध्यक्ष प्रियांका रणपिसे यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार करणे अर्पण करण्यात आला. यावेळी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषदे' चे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ एज्युकेशन, पुणे' व 'एमआयटी-राष्ट्रीय सरपंच संसद' यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवशीय 'महाराष्ट्र वारकरी कीर्तनकार गोलमेज परिषद'१९ व २० जुलै रोजी हनुमानवाडी आळंदी (देवाची) येथील डॉ. विश्वनाथ कराड वर्ल्ड पीस स्कूल येथे आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेत संपूर्ण महाराष्ट्रातील ६० कीर्तनकार आणि १५० सरपंच सहभागी होणार आहेत. अशी माहिती परिषदेचे प्रमुख समन्वयक योगेश पाटील, हभप यशोधन महाराज साखरे आणि एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांच्या संकल्पनेतून ही गोलमेज परिषद होत आहे.

या परिषदेचा शुभारंभ शनिवार, १९ जुलै रोजी दुपारी ३.०० वा. होणार आहे. या समारंभासाठी राज्याचे अन्न व औषधे प्रशासन विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच या सत्रात विधान परिषदेचे सदस्य श्री. श्रीकांत भारतीय, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, खांडबहाले डॉट कॉमचे निर्माते डॉ. सुनिल खांडबहाले हे सन्माननीय वक्ते म्हणून उपस्थित राहतील. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील. तसेच एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल कराड यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. तसेच २० जुलै रोजी होणाऱ्या वारकरी संप्रदायाच्या सामाजिक प्रबोधनाची वाटचाल या विषयावर सकाळी ९.३० वा. होणाऱ्या तृतीय सत्रामध्ये राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सामाजिक कार्य मंत्री आशिष शेलार हे प्रमुख पाहुणे व उद्घाटक म्हणून उपस्थित राहतील. या वेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे सल्लागार वैभव डांगे व अभय टिळक उपस्थित राहणार आहेत.

### मौलिक विचारांचे होणार आदान प्रदान

- उद्घाटनानंतर दोन दिवसात एकूण चार सत्रात ही परिषद संपन्न होईल. '२१ व्या शतकातील प्रमुख सामाजिक समस्यांचे स्वरूप व आव्हाने', 'वारकरी संप्रदायाच्या सामाजिक प्रबोधनाची लोककल्याणकारी वाटचाल', 'वारकरी संप्रदाय-२१व्या शतकातील प्रबोधनाचे स्वरूप, समस्या व आव्हाने' 'वारकरी संप्रदायाच्या सामाजिक प्रबोधनातील आव्हाने व समस्या निराकरणाची संभाव्य उपाययोजना' या विषयावर सत्रे होतील.



## परतीची पालखी शनिवारी पिंपरी चिंचवड शहरात

**पिंपरी :** आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपूरच्या विठ्ठलाचे दर्शन घेऊन जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांची पालखी परतीच्या प्रवासाला निघाली असून या पालखीचे आगमन पिंपरी चिंचवड शहरात शनिवारी (१९ जुलै) रोजी दुपारी होत आहे.पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपरी येथील महात्मा फुले महाविद्यालयाजवळील चौकात पालखीचे स्वागत करण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी संबंधित विभागप्रमुखांसोबत बैठक घेऊन तयारीचा सविस्तर आढावा घेतला. जगतगुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचा शनिवारी (१९ जुलै) रोजी पिंपरी गांव येथील भैरवनाथ मंदिर येथे मुक्काम असणार आहे.त्या अनुषंगाने पालखी मार्गावर स्वच्छता, विद्युत व्यवस्था, वैद्यकीय मदत केंद्रे, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, वाहतूक व्यवस्थापन, रस्त्यांची दुरुस्ती तातडीने करावी,आरोग्य,वैद्यकीय, पाणीपुरवठा, विद्युत, उद्यान अधिकाऱ्यांनी आपापसात समन्वय साधून नियोजनबद्ध काम करावे अशा सूचना बैठकीत दिल्या.



## श्रीमन्नृप शिवछत्रपती पालखीचे स्वागत

**चिंचवड :** श्रीमन्नृप शिवछत्रपती पालखीची परंपरा पूर्वापर चालत आलेली आहे. आषाढी वारीत पायी चालण्याची परंपरा कोरोना काळातही अखंडितपणे जपलेला जगातील एकमेव ऐतिहासिक सोहळा आहे. श्रीशिवजन्मभूमी श्रीशिवनेरी ते शक्तीपंढरी दुर्गदुर्गेश्वर श्रीरायगड ते भक्तीपंढरी भूवैकुंठ श्रीपंढरपूर ते श्रीपावनखिंड ते श्रीशिवाई मंदिर श्रीशिवनेरी धारकरी – वारकरी पायी पालखी सोहळा श्रीराजाभिषेक शक 352 चे आगमन श्री महिंद गुरुजी यांचे मार्गदर्शनाखाली शुक्रवारी नगरसेविका अश्विनी गजानन चिंचवडे – पाटील यांनी जनसंपर्क कार्यालय श्री मोरया गोसावी समाधी मंदिर रोड येथे उत्साहात पालखीचे स्वागत झाले. या प्रसंगी नगरसेवक सुरेश भोईर, चिंचवड काळेवाडी मंडलाध्यक्ष हर्षल नढे, प्रदेश सचिव युवा मोर्चा अजित कुलथे, वि.हि.प जिल्हा मंत्री पिंपरी – चिंचवड धनंजय गावडे, रवींद्र प्रभुणे, प्रदीप सायकर, केशव नेर्लेकर, सौ दिपाली कलापुरे, सौ अंतरा देशपांडे, सुनीता शहाणे, भाग्यश्री देशमुख, भाग्यश्री पास्ते, चाचरताई, पाटीलताई सानेताई व चिंचवडगावातील शिव-शंभूभक्त बहुसंख्येने यावेळी उपस्थित होते.



## स्पाईनरोड खड्डयांमध्ये वृक्षारोपण

**पिंपरी :** कीर्ती मारुती जाधव युथ फाऊंडेशनच्या वतीने प्रशासनाचा निषेध म्हणून स्पाईन रोड वरील खड्ड्यांमध्ये केले वृक्षारोपण करण्यात आले. प्रभाग क्रमांक ११ कृष्णा नगर मधील स्पाईन रोडवर धोकादायक खड्डे, उघडलेले रस्ते अपघातासाठी निमंत्रण ठरत आहेत. या खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्त, वाहतूक कोंडी आणि अपघातांचा धोका वाढला आहे. त्यातच पडलेल्या खड्ड्यांमुळे नागरिकांचे हाल होत आहेत. शहरातील अनेक भागांमध्ये खड्डे पडल्याने वाहतूक कोंडीची समस्या वाढली आहे. तसेच खड्ड्यांमुळे अपघातांचा धोकाही वाढला आहे. हे खड्डे मोठे आणि खोल असल्याने वाहनचालकांना वाहन चालवताना अडचणी येत आहेत. लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना खड्ड्यांमुळे जास्त त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येवर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अनेक नागरिकांनी सांगितले की, "खड्ड्यांमुळे गाडी चालवणे खूप कठीण झाले आहे. कधीही अपघात होण्याची भीती वाटते." एका नागरिकांनी सांगितले की, "खड्ड्यांमुळे माझ्या गाडीचे नुकसान झाले आहे." प्रशासनाने यावर उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिक करत आहेत. प्रशासनाने लवकरात लवकर खड्डे बुजवून रस्त्यांची दुरुस्ती करावी, अशी अपेक्षा आहे. यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

## दहा दिवसात कामगारांचा भविष्य निर्वाह निधी भरा

**पिंपरी:** येत्या दहा दिवसात कामगारांचा भविष्य निर्वाह निधी भरला नाही, तर आंदोलन करण्यात येईल असा इशारा पिंपरी -चिंचवड युवासेनेकडून देण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड महापालिका आरोग्य प्रमुख सचिन पवार यांना युवासेना शहर संघटक निलेश हाके यांच्या वतीने याबाबतचे निवेदन देण्यात आले आहे. अनेक वर्षापासून कामगारांचा भविष्य निर्वाह निधी (PF) भरला नाही. कष्टाळू, गोरगरीब हातावर पोट असलेल्या कर्मचाऱ्यांना याबाबत उडवाउडवीची उत्तरे देत मे. सिंग कंपनीकडून फसवणूक केली जात आहे. कंपनीच्या अनामत ठेव रकमेतून त्या कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाहनिधी (PF) देण्यात यावे. येत्या दहा दिवसात कामगारांचा भविष्य निर्वाह निधी भरला नाही, तर आंदोलन करण्यात येईल असा इशारा युवासेनेकडून देण्यात आला आहे.

# पवना नदीसुधार प्रकल्पाबाबत निषेध



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** स्थानिक तरुण आणि रहिवाशांसह सुमारे ८० नागरिकांनी एका पवना नदीसुधार प्रकल्पाचा निषेध म्हणून पथनाट्ये, गाणी सादर केली आणि फलक दाखवत लक्ष वेधून घेतले. रस्त्यावरून जाणारे लोक हे संदेश वाचण्यासाठी, गाणी ऐकण्यासाठी आणि नदीच्या स्थितीबद्दल प्रश्न विचारण्यासाठी आवर्जून थांबत होते. नदीच्या आरोग्याबद्दल आणि नागरी सहभागाबद्दल जागरूकता निर्माण करण्यात या कार्यक्रमाला यश आले.

गेल्या आठवड्यात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला १,५०० कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी पवना नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी पर्यावरणीय मंजुरी मिळाली. ह्यात पिंपरी-चिंचवडमध्ये पवनेच्या किनारी सुमारे २४.४ किमी बांधकाम होणार आहे. नदीकाठचे नियोजित तटबंध आणि बांधकाम यामुळे पवनेच्या काठावरील समृद्ध जैवविविधता नष्ट होणार आहे. स्थानिक पक्षी, सरपटणारे प्राणी, कासवे आणि झाडे यांचा विनाश होणार आहे. चिंचवड या ऐतिहासिक स्थानाला नद्यांना जोडणारा नैसर्गिक वारसा नष्ट होण्याची भीती नागरिकांना वाटत आहे. हा प्रकल्प नदी स्वच्छतेसाठी नाही. या प्रकल्पाचे सुमारे ८०% बजेट हे बांधकाम उपक्रमांसाठी आहे.

### दिवसेंदिवस नागरिकांचा वाढता सहभाग

नागरिकांना वाटते, की नदी पुनरुज्जीवनात जैवविविधता, स्थानिक वनस्पतींचे जतन आणि प्रदूषण नियंत्रणाला प्राधान्य दिले पाहिजे. नदीकिनारी सुशोभीकरण आणि जॉगिंग ट्रॅक नको आहे. कलेच्या माध्यमातून नदी आणि झाडांचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवण्याचा आणि प्रशासनाला प्रश्न विचारण्याचा हा एक आगळावेगळा प्रयोग होता. मुळा, पवना आणि इंद्रायणी नद्यांचे जतन करण्यासाठी नागरिकांचा सहभाग दिवसेंदिवस वाढत आहे.

# तीन लाख नागरिकांनी भरला ऑनलाइन कर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मालमत्ता कर वसुली मोहिमे अंतर्गत शहरातील नागरिक मोठ्या प्रमाणात ऑनलाइन पद्धतीने मालमत्ता कर भरताना दिसत आहेत. १ एप्रिल ते १६ जुलै या कालावधीत तब्बल ४ लाख २८ हजार मालमत्ताधारकांनी मिळून एकूण ५४४ कोटी रुपयांचा कर भरणा केला आहे.

महापालिकेच्या वतीने १ एप्रिल ते ३० जून २०२५ या कालावधीत ऑनलाइन कर भरणाऱ्यांना १० टक्के सवलतीची सुविधा देण्यात आली होती. या सवलतीचा लाभ ३ लाख २३ हजार २३९ मालमत्ताधारकांनी घेतला. तसेच ज्या मालमत्ताधारकांना यावेळी सवलत घेता आली नाही, त्यांच्या सोयीसाठी महापालिकेने १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत ऑनलाइन कर भरणाऱ्यांना ४ टक्के सवलत जाहीर केली आहे. नागरिक विविध पर्यायांचा वापर करून कर भरणा करत आहेत. ऑनलाइन प्रणाली, कॅश काऊंटर, ईडीसी, आरटीजीएस, डिमांड ड्राफ्ट, BBPS अशा माध्यमातून कर भरणा सुरू आहे.

संकलनासाठी महापालिकेच्या १८ विभागीय कार्यालयांमार्फत विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. आर्थिक वर्ष २०२५-२६ वसुली मोहीम हाती घेण्यात आली असून, नागरिकांना कर भरण्यासाठी सुलभ सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. चौकट- धनादेश अनादर झाल्यास कारवाई दरम्यान, अनेक मालमत्ताधारकांनी धनादेशाद्वारे कर भरणा केला असला तरी काही धनादेश वटले नसल्याचे निदर्शनास आले आहे. अशा प्रकरणांमध्ये महापालिकेने कारवाईला सुरुवात केली असून संबंधित मालमत्ताधारकांची मालमत्ता सील करणे, नळजोड तोडणे आदी कठोर पावले उचलली जात आहेत.

१८ विभागीय कार्यालयांमार्फत लिपिक, गट लिपिक, सहायक मंडलाधिकारी आणि इतर एकूण २० कर्मचाऱ्यांची टीम टेलिकॉलिंगच्या माध्यमातून थेट नागरिकांशी संवाद साधत आहे. या संवादातून नागरिकांना मालमत्ता कर सवलतीची माहिती दिली जात असून, वेळेत कर भरण्याचे आवाहन केले जात आहे.


अनेक करदात्यांनी महापालिकेकडे धनादेशाद्वारे मिळकतकर भरला आहे. मात्र, अनेकांचे धनादेश वटलेले नाहीत. त्यांच्यावर मिळकती सील करणे, नळजोड तोडणे अशा स्वरूपाची कारवाई महापालिकेने सुरू केली आहे.

यामुळेच ऑनलाइन कर भरणा मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. आम्ही नागरिकांना अधिकाधिक सवलतीसह ऑनलाइन कर भरण्यासाठी प्रोत्साहन देत राहू. तीन लाखांपेक्षा जास्त नागरिकांनी ऑनलाइन कर भरला आहे. महापालिकेच्या ऑनलाइन सेवेमुळे नागरिकांना घरबसल्या कर भरण्याची सुविधा मिळते, असे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी सांगितले.

> ऑनलाइन कर भरणा मोहिमेला नागरिकांचा जो उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे, तो खरोखरच प्रशंसनीय आहे. आम्ही नागरिकांना अधिकाधिक सवलतीसह ऑनलाइन कर भरण्यासाठी प्रोत्साहन देत राहू. तीन लाख पेक्षा जास्त नागरिकांनी ऑनलाइन कर भरला आहे हे अत्यंत समाधानकारक आहे. महापालिकेच्या ऑनलाइन सेवेमुळे नागरिकांना घरबसल्या कर भरण्याची सुविधा मिळते. यापुढेही आम्ही अशा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत राहू.
>
> **– प्रदीप जांभळे पाटील,** अतिरिक्त

> आयुक्त धनादेश अनादर झाल्यास कठोर कारवाई करण्याचा निर्णय घेतलाआहे.थकबाकीदारांविरोधात मालमत्ता जप्ती,नळकनेक्शन खंडित करणे अशी कटू कारवाई करत आहेत. अशी कटू कारवाई टाळून नागरिकांनी वेळेत कर भरावा
>
> **– अविनाश शिंदे,** सहायक आयुक्त,






- ■ - ऑनलाइन : ३९४ कोटी ३३ लाख
- ■ - रोख रक्कम : ३२ कोटी ७० लाख ८० हजार
- ■ - धनादेश : २५ कोटी ६१ लाख २३ हजार
- ■ - ईडीसी : ६ लाख ६ हजार
- ■ - आरटीजीएस : २४ कोटी ६२ लाख ८५ हजार
- ■ - डीडी : ७४ लाख ३२ हजार
- ■ BBPS : १७ लाख ८३ हजार मालमत्ता कर

# गोवंश हत्या कायदा अधिक कडक करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** गोमातेला "राजमाते"चा दर्जा देत महाराष्ट्रात लागू असलेल्या गोवंश हत्या बंदी कायद्याची अधिक प्रभावी अंमलबजावणी व्हावी, तसेच या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना पाच वर्षांपर्यंत कठोर शिक्षा व एक लाख रुपये दंडाची तरतूद करण्यात यावी, अशी ठाम मागणी आ. शंकर जगताप यांनी महाराष्ट्र विधानसभेत औचित्याच्या मुद्द्याद्वारे केली.

शंकर जगताप यांनी स्पष्टपणे नमूद केले की, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ व त्यातील १९९५ आणि २०१५ मधील सुधारणा कायद्यानुसार संपूर्ण राज्यात गोवंश हत्या, वाहतूक, विक्री आणि अवैध व्यापारावर बंदी आहे. तरीही अनेक ठिकाणी या कायद्याचे सर्रास उल्लंघन होत असून, घरांमध्ये अथवा गुप्त ठिकाणी बेकायदेशीर गोवंश कत्तल सुरू आहे.

### कठोर शिक्षा व प्रभावी अंमलबजावणीची गरज

जगताप यांनी अधोरेखित केले की, दोषींवर फक्त कायदेशीर कारवाई पुरेशी नाही, तर पाच वर्षे सक्तमजुरीची शिक्षा आणि एक लाख रुपये दंड अशी कठोर शिक्षा ठोठावणारा कायदा व्हावा. यासाठी कलम ५अ, ५ब, ५क आणि ५ड अंतर्गत स्पष्ट तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी गरजेची आहे.

### गोरक्षकांना संरक्षण आणि पोलिसांना विशेष अधिकारांची मागणी

गोरक्षकांना त्यांच्या सुरक्षेची गरज असल्याचे सांगत जगताप यांनी या कार्यात अडथळा आणणाऱ्यांवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३५३ अंतर्गत गुन्हे दाखल करण्याचा विशेष अधिकार पोलिस आणि पशुसंवर्धन विभागाला द्यावा, अशी मागणी केली. या अवैध कारवायांवर लगाम हवा.

- **राज्याच्या सीमा, महामार्ग व अंतर्गत मार्गांवर वाहन तपासणी केंद्र**
- **पोलिस आणि पशुसंवर्धन विभागाची नियमित गस्त आणि गुप्त तपासणी**
- **गावपातळीवर जनतेचा सहभाग असलेली समिती स्थापन**
- **अवैध कत्तल किंवा व्यापाराची माहिती देणाऱ्यांसाठी बक्षीस योजना**

### गोवंश रक्षणासाठी समर्पित भूमिका

"गोमाता केवळ धार्मिक श्रद्धेचा विषय नसून, तिचे रक्षण सामाजिक जबाबदारी आहे. त्यामुळे गोवंश हत्या प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी ही केवळ कागदापुरती न राहता, प्रत्यक्षात प्रभावी व्हावी," असे ठाम मत आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केले.

# रस्त्याच्या डांबरीकरणासाठी चिखलात बसून आंदोलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**किवळे :** कस्तुरी होम सोसायटी ते रूणाल गेटवे सोसायटी पर्यंतच्या १८ मीटर रस्त्याच्या डांबरीकरणासाठी युवासेना जिल्हाध्यक्ष राजेंद्र तरस यांनी चिखलात बसून आंदोलन करत प्रशासनाचे लक्ष वेधले. राजेंद्र तरस यांनी म्हटले आहे की, किवळे सर्व्हे नंबर ९६ या ठिकाणी अनेक वर्षापासून रुणाल गेटवे, GT प्राईड, कस्तुरी होम, मारवल, आर्यमन, जीके, मंगलम यासह अनेक सोसायटी या भागात असून महानगरपालिकेने 18 मीटर डीपी रोड मंजूर करून अनेक वेळा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, स्थानिक आमदार यांच्या हस्ते उद्घाटन होऊनही हा रोड विकसित केलेला नाही. सध्याच्या परिस्थितीत पाऊस असल्याने नागरिकांना चिखल तुडवत सोसायटीत स्वतःच्या फ्लॅटमध्ये जावे यावे लागते. त्यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले सर्वांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. गेले अनेक दिवस पालिकेच्या स्थापत्य विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संपर्कात राहून या रोड करण्यासंदर्भात अनेकवेळा राजेंद्र तरस यांनी वेळोवेळी संपर्क साधून सदर परिस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून दिली. वेळा पत्र देऊनही त्यांनी पत्राची दखल घेतली नाही.



# घरकुलवासियांची घरपट्टी माफ करा!

- **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी**
- **भाजपा आमदार महेश लांडगे यांचे निवेदन**




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिखली :** जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरूत्थान अभियानांतर्गत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने राबवलेल्या आर्थिक दुर्बल घटकांसाठी घरकुल योजनेतील ३६.७७ चौ.मी. असलेल्या गरिबांच्या घरांसाठी पालिकेची कर आकारणी (घरपट्टी) रद्द करावी, अशी मागणी आ. महेश लांडगे यांनी केली. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे.

त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने 'जेएनएनयुआरएम' या योजनेंतर्गत चिखली येथे शहर परिसरात वास्तव्य करीत असलेल्या आर्थिक दुर्बल घटकांतील नागरिकांसाठी गृहयोजना प्रकल्प आहे. सदर ठिकाणी १६० इमारती असून, एकूण ६ हजार ७२० कुटुंबांना येथे निवारा मिळाला. या घरकूलमध्ये राहत असलेली सर्व कुटुंबे ही आर्थिक दुर्बल घटकातून आलेली असल्याने रोजंदारीवर काम करुन पोट भरणारा जनसमुदाय येथे वास्तव्यास आहे. या सर्वांचे जीवनमान हे अत्यंत दुबळे व दारिद्र पद्धतीचे आहे. ही सर्व कुटुंबे कोणत्या ना कोणत्या झोपडपट्टीत राहणारी आहेत. तसेच, मुलांचे शिक्षण, घराचे बँकेचे हप्ते यामुळे सदर कुटुंबियांची परिस्थिती नाजूक आहे. मुंबई महापालिका अधिनियम कलम १४० मधील उप कलम (1) नुसार निवासी इमारती किंवा निवासी सदनिका चटई क्षेत्र ४६.४५ चौ. मीटर (५०० चौ. फूट) किंवा त्यापेक्षा कमी क्षेत्र असलेल्या निवासी इमारती किंवा निवासी सदनिका यांना कर आकारणी करण्यात येवू नये. या नियमानुसार, आर्थिक दुर्बल घटकांतील कुटुंबियांना दिलेल्या घरकूल योजनेतील सदनिका या ३६.७७ चौ. मीटर (395.65 चौ. फूट) आहे. त्यानुसार कर आकारणीतून कायमस्वरुपी मुक्तता मिळावी, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी आहे.

> आर्थिक दुर्बल घटकांसाठी उभारण्यात आलेले घरकूलमध्ये गोरगरिब- कष्टकरी नागरिक वास्तव्य करतात. मुंबई महानगरपालिका नियमानुसार, ५०० चौ.फूटापेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या सदनिकाधारकांना मिळकतकर आकारणी करीत नाही. त्याच धर्तीवर चिखली घरकुलमधील सदनिकाधारकांना पालिकेकडून आकारण्यात येणारा घरपट्टी (मिळकत कर) रद्द करावा, अशी मागणी केली आहे. त्यासाठी पाठपुरावा करणार आहोत.
>
> **- महेश लांडगे, आमदार**

संपादकीय विशेष

# नेमके कारण का गवसेना...

अहमदाबाद विमान अपघातामागील कारणे शोधताना वैमानिकांच्या संवादाचा आधार घेऊन विमानाच्या इंजिनला इंधन पुरवठा करणारे स्विच बंद केल्याने हा अपघात झाला असल्याचे म्हटले गेल्यानंतर वैमानिकांवर खापर फोडण्याचा प्रयत्न झाला. या निमित्ताने देशातील तसेच देशाबाहेरील अनेक वैमानिकांनी अन्यायाचा सूर आळवला. त्यानंतर आता अनेक अपघातामागील शक्यतांची चर्चा सुरु आहे. मात्र या निमित्ताने अपघातासंदर्भातील काही तथ्ये पुढे आली आहेत. या विमानाचे दोन्ही वैमानिक अनुभवी होते. त्यांच्याकडून अशी चूक होणे संभवत नाही. 'एएआयबी' (एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्यूरो)ने हा अहवाल प्रसिद्ध केला आहे. अपघातग्रस्त विमान हे बोईंग 787-8 ड्रीमलाइनर विमान होते.अपघातापुर्वी एका वैमानिकाने 'तू स्विच बंद केले का' अशी विचारणा केली, तर दुसऱ्याने 'नाही' असे उत्तर दिले. दोघांपैकी कुणी कुणाला स्विचबाबत विचारले, याचा उलगडा या अहवालातून होत नाही. या अहवालावर वैमानिक संघटनेने संताप व्यक्त केला आहे. समितीत एकही वैमानिक नव्हता आणि त्यांना विश्वासात न घेता आणि तज्ज्ञ वैमानिकाचे म्हणणे न नोंदवताच अहवालात ठपका ठेवण्यात आल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली. वैमानिकांची कुटुंबे तसेच अन्य प्रवाशांच्या कुटुंबीयांनीही या अहवालावर नाराजी व्यक्त केली. स्विच कधी बंद करायचा, कधी सुरू करायचा आणि स्विच बंद केला की काय होते याचा परिणाम माहीत असलेले वैमानिक स्वतःसह शेकडो प्रवाशांचा जीव कशाला धोक्यात घालतील, हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

अहवालात इंधन 'कटऑफ स्विच' रनवरून 'कटऑफ' मध्ये गेला होता. हा स्विच एका सेकंदात बदलण्यात आला असे म्हटले आहे. दोन्ही इंजिन्सना इंधनपुरवठा थांबला होता. त्यामुळे इंजिनची पॉवर बंद पडली, तेव्हा पंख्यासारखे एक लहान उपकरण आपोआप उघडले. याला 'राम एअर टर्बाइन' (रॅट) म्हणतात. ते आपत्कालीन परिस्थितीत 'हायड्रॉलिक पॉवर' देते. वैमानिकांनी इंजिन पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न केला; परंतु कोसळण्यापूर्वी ते सुरू होऊ शकले नाही. धावपट्टीपासून 0.9 नॉटिकल मैल अंतरावर ते एका वसतिगृहावर कोसळले. 'एएआयबी'च्या अहवालात म्हटले आहे की वैमानिकांची पात्रता शंकेच्या पलिकडे होती आणि दोघेही निरोगी आणि पूर्णपणे तंदुरुस्त होते आणि त्यांना पुरेसा अनुभव होता. इंधन भरण्याच्या स्त्रोतांमध्येही कोणतीही भेसळ आढळली नाही. हवामान पूर्णपणे स्वच्छ होते. विमान उड्डाण करण्यासाठी फ्लॅप सेटिंग (5 अंश) आणि गियर सामान्य होते. आकाशात पक्षी नव्हते. वाराही हलका होता. दृश्यमानता चांगली होती. कोणत्याही प्रकारची कोणतीही अडचण नव्हती. वजनदेखील संतुलित होते, तरीही अपघात झाला.

इंधन स्विचमध्ये संभाव्य बिघाडाबद्दल 'एफएए'कडून एक सल्ला देण्यात आला होता; परंतु सात वर्षांपूर्वीचा हा सल्ला 'एअर इंडिया'ने विचारात घेतला नाही. त्या वेळी ही कंपनी भारत सरकारच्या मालकीची होती. अहमदाबाद-लंडन विमान अपघाताच्या प्राथमिक अहवालानंतर फेडरल एविएशन ॲडमिनिस्ट्रेशन आणि बोईंगने अधिसूचना जारी केली. त्यात इंजिन इंधन कटऑफ स्विचवर प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. 'एअर इंडिया'ने 2019 मध्ये 'बोईंग'च्या सूचनांनुसार अहमदाबाद-लंडन बोईंग 787-8 उड्डाणाचे थ्रॉटल कंट्रोल मॉड्यूल (टीसीएम) गेल्या सहा वर्षांमध्ये दोनदा बदलले आहे. प्राथमिक अहवालात कोणताही अंतिम निष्कर्ष काढण्यात आलेला नाही. अंतिम अहवाल एक किंवा दोन वर्षांनी येईल. त्यात या अपघातामागील खरे कारण कळू शकेल. इंजिन बिघाड झाल्यास इंजिन मॅन्युअली रीस्टार्ट करण्यासाठी आणि बंद करण्यासाठी चर्चीत स्विचचा वापर केला जाऊ शकतो. सोप्या भाषेत सांगायचे तर विमानाचे इंजिन चालू ठेवण्यासाठी स्विच चालू असतो आणि ते बंद ठेवण्यासाठी कटऑफवर नेला जातो.

'एआय 171' हे बोईंगचे 787-8 ड्रीमलाइनर विमान होते. यामध्ये दोन्ही इंधन स्विच थ्रस्ट लीव्हरच्या अगदी खाली बसवलेले असतात; परंतु येथे एक गोष्ट समजून घेणे महत्त्वाचे आहे की, हे स्विच घरात बसवलेल्या स्विचसारखे नसतात. विमानाची इंधन स्विच सिस्टीम फेल-प्रूफ बनवली जाते. त्याला चालण्यासाठी किंवा कट ऑफ करण्यासाठी एक प्रक्रिया आवश्यक असते. हे इंधन स्विच स्प्रिंग लोड केलेले असतात. इंधन स्विच 'कट ऑफ'मधून सुरु करण्यासाठी आणायचा असेल, तर स्विच थोड्या जोराने बाहेर खेचून नंतर रन मोडमध्ये आणता येतो. त्याचप्रमाणे, रन मोडमधून कटऑफ मोडमध्ये जाण्यासाठी, स्विच बाहेर काढता येतो आणि नंतर कटऑफ मोडमध्ये आणता येतो. सोप्या भाषेत सांगायचे तर, स्विचच्या खाली असलेल्या स्प्रिंग्ज चुकून मोड बदलण्यापासून रोखण्यासाठी असतात आणि मानवी चुकीची शक्यता नगण्य असते.

'फेल-प्रूफ सिस्टीम'मुळे तज्ज्ञ इंधन स्विच चुकून बंद होण्याची शक्यता नाकारत आहेत. विमान वाहतूकतज्ज्ञांच्या मते आतापर्यंतच्या तपासात समोर आलेल्या तथ्यांवरून असे म्हटले आहे की इंजिनचा इंधन स्विच बंद होता. इंधन स्विच स्वतः बंद करणे शक्य नाही. दोन्ही इंजिनचे इंधन स्विच वेगळे आहेत आणि स्विच झाकलेला आहे. अशा परिस्थितीत, ज्याने स्विच बंद केला तो विमानाशी परिचित होता. कॉकपिटमध्ये किती लोक होते किंवा ज्याने स्विच बंद केला, तो कोण होता हा सर्व अजूनही तपासाचा विषय आहे. हे विमान जास्त उंचीवर असते तर वाचले असते. पायलटला स्विच चालू करण्यासाठी आणि सिस्टीम रीबूट करण्यासाठी 30 ते 40 सेकंद लागतात. ज्याने स्विच बंद केला त्यालादेखील हे माहित होते. येत्या काळात तपासात आणखी काही गोष्टींवर प्रकाश पडू शकतो. तपासात आतापर्यंत इतर सर्व शक्यता नाकारल्या गेल्या आहेत. स्विच कसे बंद झाले? तांत्रिक बिघाडामुळे की मानवी हस्तक्षेपामुळे? कारण विमानाची रचना अशी आहे, की हे स्विच आपोआप चालू किंवा बंद होऊ शकत नाहीत. खरे कारण काळानुरुप समोर येईल. यात काही दुय्यम कारणेदेखील असू शकतात. कारण अपघात अनेकदा अनेक कारणांच्या एकत्रिकरणामुळे होतात. म्हणून, खूप सखोल चौकशीची आवश्यकता आहे. आता हे स्विचेस कटऑफ मोडमध्ये कसे आले आणि त्यामागील सिस्टीममध्ये काही यांत्रिक बिघाड, अनवधानाने मानवी चूक किंवा इतर कोणतीही समस्या होती का, याचा तपास केला जात आहे. हे कोडे उलगडेल तव्हाच एखाद्या निष्कर्षाप्रत पोहोचणे शक्य होईल.

# अधिकारांचा मर्यादाभंग

**अलिकडे दोन चित्रपटांच्या निमित्ताने समाजात वाद रंगला. त्यात चित्रपट परीनिरीक्षण मंडळ तसेच इतर संस्था मर्यादाभंग करत असून अभिव्यक्तीस्वातंत्र्य संकुचित करत आहेत. चित्रपटाला 'जानकी' हे नाव दिल्याने धर्माचा अवमान कसा होतो, असा सवाल न्यायालयानेही केला. 'उदयपूर फाईल्स' चित्रपटाच्या बाबतीतही असेच होत आहे. वस्तुत: समाजाने कलाकृती आणि वास्तवातील फरक समजून घ्यायला हवा.**

(विश्लेषण)
राही भिडे
ज्येष्ठ पत्रकार

चित्रपट तसेच कलाकृतीतील रचनात्मकता, आशय नेहमी लक्षात घेतला पाहिजे. चित्रपट किंवा अन्य कलाकृतीकडे केवळ मनोरंजन म्हणून पाहिले पाहिजे. अर्थात ऐतिहासिक कथानकांचा त्याला अपवाद करावा लागेल. 'जानकी व्हर्सेस केरळ' आणि 'उदयपूर फाईल्स' या चित्रपटांच्या बाबतीत अलिकडे उद्भवलेला वाद चुकीचा आहे. एखाद्या पात्राचे नाव देव, देवतासारखे असले म्हणजे लगेच त्याचा संबंध संबंधित देवतांशी, देवाशी जोडणे चुकीचे आहे. पात्राचे नाव काय यापेक्षा त्याच्या वाट्याला काय भूमिका आली आणि त्याने ती कशी साकारली, याला महत्त्व देण्याऐवजी नावावरून वाद घालायचा, एखाद्या वाक्याला आक्षेप घ्यायचा हे चुकीचे आहे. कमल हसन यांच्या चित्रपटाबाबत सर्वोच्च न्यायालयाने भाषिक आणि अन्य वाद तसेच चित्रपटाला बंदी घालण्यावरून चांगलीच कानउघडणी केली होती, तरीही न्यायालये सर्वोच्च न्यायालयाच्या विपरीत भाष्य करतात. राज्यघटनेने मूलभूत स्वातंत्र्य दिले आहे. अभिव्यक्तीस्वातंत्र्याला महत्त्व दिले आहे; परंतु आता सरकारच्या यंत्रणाच अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करत आहेत. चित्रपट परीनिरीक्षण मंडळासारा संस्थांना मर्यादांचे भान राहिलेले नाही. चित्रपटात काही अश्लील आहे की नाही, हे पाहून तेवढा भाग वगळण्यास सांगणे समजण्यासारखे आहे; परंतु कार्यकारण भाव माहीत नसताना, कारण माहीत नसताना आणि कायदा आणि सुव्यवस्था राखणे ही सरकारची जबाबदारी असताना धोक्यात येण्याचे कारण दाखवून एखाद्या चित्रपटाला परवानगी नाकारणे, त्यात 96 कट सुचवणे हा मर्यादाभंग आहे.

अलिकडेच चित्रपट परीनिरीक्षण मंडळाने 'जानकी' या चित्रपटामध्ये 96 दृश्ये कपात करण्याची सूचना केल्यानंतर संबंधित निर्मात्याने काय दाखवायचे, हा प्रश्न पडला. उच्च न्यायालयाने कानउघाडणी केल्यानंतर आता चित्रपट परीनिरीक्षण मंडळाने फक्त दोन किरकोळ बदलांसह चित्रपटाला मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे. काही मुद्दे चुकीचे आहेत, असे केवळ वाटल्याने चित्रपटाची परवानगी रोखून धरणेच चुकीचे आहे. या चित्रपटाच्या नावाबाबत 'जानकी' असे नाव असण्यावर सर्वात मोठा वाद होता. यापूर्वी अनेक चित्रपटांमध्ये जानकी, सीता, राम, तसेच अनेक देवतांची नावे सामान्य पात्रांना देण्यात आली होती. त्यावर यापूर्वी वाद, दंगली असे काही घडले नाही. मग आताच असे होण्याचा धाक का बाळगायचा, असा साधा प्रश्न चित्रपट परीनिरीक्षण मंडळाला पडला नाही. त्यातच चित्रपट मान्यतेशी संबंधित दोन वेगवेगळ्या संस्थांनी याबाबत दोन वेगवेगळे निर्णय दिल्यामुळे संदिग्धता वाढली.

'जानकी' चित्रपटातील पात्राचे नाव रामायणातील सीतेच्या नावाशी जोडलेले आहे. लैंगिक छळाला सामोरे जाणाऱ्या महिलेच्या व्यक्तिरेखेसाठी 'जानकी' हे नाव वापरणे अयोग्य आहे, असा आक्षेप चित्रपट परीनिरीक्षण मंडळाने घेतला आहे. हे प्रकरण केरळ उच्च न्यायालयात पोहोचले. केरळ उच्च न्यायालयात सुनावणीदरम्यान चित्रपट परीनिरीक्षण मंडळाच्या वतीने उपस्थित असलेल्या वकिलाने सांगितले की आता हा चित्रपट फक्त दोन बदलांसह मंजूर केला जाईल. पहिला बदल म्हणजे चित्रपटाचे शीर्षक थोडे बदलले जाईल. आता चित्रपटाचे नाव जानकी व्ही विरुद्ध केरळ राज्य किंवा व्ही जानकी विरुद्ध केरळ राज्य असे असेल. यामुळे हे स्पष्ट होईल की जानकी हे नाव देवीशी संबंधित नाही, तर मुख्य पात्र जानकी विद्याधरनशी संबंधित आहे. दुसरा बदल न्यायालयीन कक्षात सुरू असलेल्या उलटतपासणीच्या दृश्याशी संबंधित आहे, त्यात नायिकेचे नाव म्यूट करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. यावर न्यायालयाने चित्रपट निर्मात्यांकडून उत्तर मागितले. मुंबई विभागाने चित्रपटाला आक्षेप घेतला असला, तरी केरळ विभागाने कोणताही बदल न करता चित्रपट मंजूर केला. यामुळे हे स्पष्ट होते की देशाच्या वेगवेगळ्या भागात सेन्सॉरशिपचे नियम वेगवेगळ्या प्रकारे लागू केले जातात. ते चित्रपट निर्मात्यांसाठी एक मोठे आव्हान बनत आहे.

'जानकी व्ही विरुद्ध केरळ राज्य' मध्ये केंद्रीय पेट्रोलियम राज्यमंत्री सुरेश गोपी आणि अनुपमा परमेश्वरन मुख्य भूमिकेत आहेत. या चित्रपटावरून एवढा वाद होऊनही गोपी यांनी त्याबाबत मौन बाळगले. वास्तविक, अभिव्यक्ती स्वातंत्र्याबाबत गेल्या महिन्यात आणीबाणीचे उदाहरण देऊन भाजपने मोठा आवाज उठवला होता. आता भाजप सत्तेत असताना आपल्याच मंत्र्यांच्या चित्रपटाबाबत होत असलेल्या अभिव्यक्तीस्वातंत्र्याच्या गळचेपीबाबत काहीच बोलायला तयार नाही. हा चित्रपट यापूर्वी 20 जून रोजी प्रदर्शित होणार होता; परंतु सेन्सॉरच्या वादामुळे पुढे ढकलण्यात आला. आता सेन्सॉर बोर्डाने आपली भूमिका मऊ केली आहे. त्यामुळे हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल अशी अपेक्षा आहे. चित्रपटाच्या निर्मिती कंपनीने केरळ उच्च न्यायालयात धाव घेतली आणि केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाच्या (सीबीएफसी) निर्णयाला आव्हान दिले.

'सीबीएफसी'ने असा आक्षेप घेतल्याबद्दल उच्च न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले. धार्मिक संवेदनशीलतेचा हवाला देत 'सीबीएफसी'ने 'जानकी' या शीर्षकावर आणि पात्राच्या नावावर अनौपचारिकपणे आक्षेप घेतल्याचा आरोप करण्यात आला. सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती एन. नागरेश यांनी 'सीबीएफसी'च्या युक्तिवादावर आश्चर्य व्यक्त केले. आता 'जानकी विरुद्ध केरळ' लवकरच थिएटरमध्ये दाखल होऊ शकतो. कारण त्याच्या निर्मात्यांनी सीबीएफसीने सेन्सॉर प्रमाणपत्रासाठी सुचवलेल्या बदलांना सहमती दर्शवली आहे. केरळ उच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात जानकी हे पात्र बलात्कार पीडित म्हणून दाखवले आहे, असे नमूद करून म्हटले आहे की न्यायाच्या शोधात तिला अनेक वेदनादायक प्रसंगांना तोंड द्यावे लागले आहे. मुख्य पात्राला बलात्कारपीडित म्हणून एका पूजनीय देवीचे नाव देऊन दाखवले जाते, ही सार्वजनिक सुव्यवस्थेसाठी गंभीर चिंतेची बाब आहे. हे देवी सीतेच्या व्यक्तिमत्त्वाशी जोडलेली प्रतिष्ठा आणि पावित्र्य कमी करते, असे नमूद केले आहे. चित्रपटातील एखाद्या पात्राला जानकी नाव दिल्याने सीतेचे पावित्र्य कसे कमी होते, ते इतके तकलादू होते का, रामाने सीतेचा त्याग केल्यानंतर ते कमी झाले नाही, रावण ते करू शकला नाही, आता ते कसे कमी होणार, या प्रश्नाचे उत्तर मंडळाने दिलेले नाही.

चित्रपटात मुख्य पात्राची तिच्यावरील हल्ल्याबद्दल उलटतपासणी केली जात असताना बचाव पक्षाचे वकील आक्रमक प्रश्न विचारतात, जसे की ती अश्लील चित्रपट पाहते का, लैंगिक सुख वाढवण्यासाठी ती कोणतेही औषध घेते का, तिचा प्रियकर आहे का किंवा हल्ल्यापूर्वी ती गर्भवती होती का? जानकी नाव असलेल्या पात्राला असे उत्तेजक प्रश्न विचारल्याने सार्वजनिक सुव्यवस्थेचा भंग होण्याची आणि धार्मिक भावना दुखावण्याचा साक्षात्कार मंडळाला कुणाच्याही आक्षेपाआधीच झाला. कथानकात दाखवल्यानुसार बलात्कार झाल्यानंतर या स्त्रीला एका विशिष्ट धार्मिक समुदायातील व्यक्ती मदत करते आणि दुसऱ्या धार्मिक समुदायातील व्यक्ती तिची उलटतपासणी करते आणि कठोर प्रश्न विचारते. हा धार्मिक विरोधाभास सांप्रदायिक तणाव निर्माण करण्याची आणि धार्मिक गटांमध्ये फूट पाडणारी कथा निर्माण करण्याची शक्यता आहे. निर्मात्यांनी तिच्या धार्मिक ओळखीचा फायदा घेण्याच्या स्पष्ट हेतूने हे नाव निवडले आहे. 'सीबीएफसी'चा हा युक्तिवाद पाहता ही प्रमाणपत्र देणारी संस्था आहे की कट्टर हिंदुत्त्ववादी संघटना असा प्रश्न निर्माण होतो.

दरम्यान, 'उदयपूर फाइल्स' या वादग्रस्त चित्रपटाचे प्रदर्शन थांबवण्यासाठी दाखल केलेली याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. हा चित्रपट उदयपूरमध्ये मुस्लिम समुदायाच्या लोकांनी हत्या केलेल्या शिंपी कन्हैया लालवर आधारित आहे. हत्येचे अकरा आरोपी तुरुंगात आहेत आणि खटला सुरू आहे. ट्रेलर प्रदर्शित झाल्यानंतर 'उदयपूर फाइल्स'हा चित्रपट वादात सापडला. कन्हैयालाल हत्या प्रकरणातील आठवा आरोपी मोहम्मद जावेद याने चित्रपटाचे प्रदर्शन थांबवण्यासाठी याचिका दाखल केली होती. ती सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. न्यायमूर्ती सुधांशू धुलिया आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने या याचिकेवर तात्काळ सुनावणी केली. या प्रकरणातील आरोपी मोहम्मद जावेद व्यतिरिक्त 'जमियत उलेमा-ए-हिंद'चे अध्यक्ष आणि 'दारुल उलूम देवबंद'चे प्राचार्य मौलाना अर्शद मदनी यांनी दिल्ली उच्च न्यायालयात चित्रपटाच्या प्रदर्शनाला स्थगिती देण्याची मागणी करणारी याचिका दाखल केली. तिथे स्थगिती मिळाली. म्हणजेच एखाद्या चित्रपटात एखाद्या घटनेशी संबंधित विषयावर चित्रपट निघाला, म्हणजे तिचा न्यायव्यवस्थेवर परिणाम होतो, असा नवा जावईशोध लागला आहे

करिअरवाटा

## संधी फॅशन डिझायनिंगमधली

वेगळ्या करिअर वाटेचे प्रवासी होऊ इच्छिणाऱ्यांसाठी 'फॅशन डिझायनिंग' हा उत्तम पर्याय आहे. या क्षेत्रात येण्यासाठी आवश्यक गोष्ट म्हणजे कल्पकता. फॅशनच्या क्षेत्रात सतत नवनवे प्रयोग होत असतात. यात विविध रंग, फॅब्रिक्सशी खेळावं लागतं. जुन्याचा नव्याशी मेळ साधावा लागतो. यासाठी अचाट कल्पनाशक्तीची गरज असते. म्हणूनच सतत शिकत राहणं, नव्या गोष्टी आत्मसात करणं या गुणांची गरज भासते. संवाद आणि संपर्क कौशल्यही तुम्हाला या क्षेत्रात पुढे नेऊ शकतं. बारावी विज्ञान शाखेचे विद्यार्थी फॅशन डिझायनिंगकडे वळू शकतात. गणित, फिजिक्स आणि केमिस्ट्री या विषयांसह बारावीत किमान ५० टक्के गुण असतील तर विद्यार्थी या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतात. फॅशन डिझायनिंगचं शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देणाऱ्या अनेक संस्था देशात आहेत. काही प्रमुख संस्था प्रवेश परीक्षा आणि मुलाखतींचं आयोजन करतात तर काही संस्थांमध्ये कलाशाखेच्या विद्यार्थ्यांनाही प्रवेश दिला जातो. 'बॅचलर ऑफ फॅशन डिझायनिंग', 'बीएससी–फॅशन डिझायनिंग', 'बॅचलर ऑफ फॅशन कम्युनिकेशन', 'डिप्लोमा इन फॅशन डिझायनिंग' सारखे अभ्यासक्रम पूर्ण करून या क्षेत्रात करीअर करता येतं.



खेचाखेची


## सरकारी नोकरीची ताकद

प्रेमाला कोणीच हरवू शकत नाही...
.
.
.
.
फक्त सरकारी नोकरीवाला सोडून...

वेगळं काही

नवस बोलण्याच्या अनोख्या पद्धतींविषयी...

✻ पंजाबमधल्या तल्हान गावातल्या संत बाबा निहालसिंग शहीदां यांच्या गुरूद्वारामध्ये परदेशगमनासाठी नवस बोलला जातो. इथे प्रतिक म्हणून खेळण्यातलं विमान अर्पण करतात. ✻ हैदराबादमधल्या मेहंदीपट्टनमपासून १७ किलोमीटर अंतरावर असलेल्या चिलकूर बालाजी मंदिराला व्हिसा टेम्पल असंही म्हटलं जातं. शुक्रवार, शनिवार आणि रविवार असे तीन दिवस या ठिकाणी व्हिसा मिळवण्यासाठी नवस बोलला जातो. नवस पूर्ण झाल्यानंतर लोक १०८ प्रदक्षिणा घालतात. ✻ भ्रष्टाचाराविरोधात लढणाऱ्या कानपूरच्या रॉबी शर्मा यांनी भ्रष्ट तंत्र विनाशक शनी मंदिर या नावाने एक मंदिर उभारलं आहे.




राशीभविष्य

- **मेष** : अनपेक्षित दिलासा मिळेल. नव्या योजना मार्गी लागतील. विद्यार्थ्यांच्या कला–गुणांना वाव मिळेल.
- **वृषभ** : खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. कौटुंबिक समस्या संभवतात.
- **मिथुन** : मनात चिंता राहील. कायदेशीर प्रकरणांबाबत पुरेशी काळजी घ्यावी. विद्यार्थ्यांना अडचणी येतील.
- **कर्क** : कार्यात सातत्य राखावं. सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील. अनावश्यक ताण–तणाव दूर ठेवावेत.
- **सिंह** : महत्त्वाच्या भेटीगाठी होतील. कलाकारांचा उत्साह वाढेल. जमिनीच्या प्रश्नात तडजोड हिताचे ठरेल.
- **कन्या** : गृहसजावट, स्थापत्य क्षेत्रात अनुकूलता राहील. प्रियजनांच्या भेटी होतील. बाकी चिंता नसावी.
- **तूळ** : मोठे व्यवहार लांबणीवर टाकावे. सरकारी कामं मनाजोगी होतील. मुलांच्या प्रश्नातून मार्ग निघेल.
- **वृश्चिक** : वाढत्या खर्चाला आवर घालावा. सारं काही मनाप्रमाणे घडेल. विवाहातील अडचणी दूर होतील.
- **धनु** : धनलाभाचे योग आहेत. कौटुंबिक समस्यांवर मात कराल. यांत्रिक–तांत्रिक क्षेत्रात संधी लाभतील.
- **मकर** : कार्यक्षेत्रात नव्या संधी लाभतील. गुंतवणूक तुर्तास नको. बेरोजगारांना उत्तम दिलासा मिळू शकेल.
- **कुंभ** : चिंता निर्माण करणारी वार्ता संभवते. ज्येष्ठांच्या प्रकृतीची काळजी घ्यावी. बोलताना विचार करावा.
- **मीन** : घरगुती समस्यांचा ताण राहील. अनुभवींचं मार्गदर्शन कामी येईल, नव्या ओळखींचा लाभ घ्यावा.

सुगरणीचा सल्ला

## चविष्ट गुलाब खीर

सणावारी किंवा विशेष प्रसंगी कोणता गोड पदार्थ करायचा असा प्रश्न पडतो. तेच ते पदार्थ खाऊन कंटाळा आलेला असतो. अशा वेळी तुम्ही गुलाब खीर ट्राय करू शकता.

साहित्य : एक लीटर दूध, १०० ग्रॅम बासमती तांदूळ, १०० ग्रॅम साखर, ४०० ग्रॅम मिल्कमेड किंवा कंडेन्स्ड मिल्क, गुलाबपाण्याचे पाच थेंब, पाच ग्रॅम वाळलेल्या गुलाबपाकळ्या, सजावटीसाठी चमचाभर कापलेले बदाम.

कृती : एका भांड्यात दूध काढून घ्या. मंद आचेवर साधारण अर्धा तास उकळून घ्या. यात कंडेन्स्ड मिल्क आणि साखर घाला. पाच मिनिटं शिजवून घ्या. यात बासमती तांदूळ घाला. तांदूळ नीट शिजू द्या. आता त्यात गुलाबपाकळ्या आणि गुलाबपाणी घाला. आता भांडं गॅसवरून खाली काढा. थंड होऊ द्या. त्यावर बदामाच्या चकत्या घाला. मस्तपैकी बाऊलमध्ये वाढून खायला द्या. वेगळ्या चवीची ही खीर तुम्हाला नक्कीच आवडेल.

दिनविशेष

## १९ जुलै

- १९५५: क्रिकेटपटू रॉजर बिन्नी यांचा जन्म.
- १९८५: इटलीतील व्हाल दि स्लाव्हा धरण फुटलं.
- १९८९: युनायटेड एअरलाइन्स फ्लाइट २३२ विमान अमेरिकेतील सू सिटी शहराजवळ कोसळलं.
- २०१७: चीनी सैन्याने तिबेटजवळ मोठ्या प्रमाणावर फौजफाटा उभा केला.
- २०१८: डॉलरच्या तुलनेत रुपया ४३ पैशांनी गडगडल्यामुळे डॉलरचा भाव ६९.०५ या ऐतिहासिक नीचांकी पातळीवर पोहोचला.

स्टडी टिप्स

## असा करा अभ्यास

अभ्यास करण्याच्या काही वैज्ञानिक पद्धती आहेत. त्या पद्धतींनी अभ्यास केला तर तुम्हाला चांगलं यश मिळू शकतं. जाणून घेऊ या.

✻ सलग दोन–तीन तास अभ्यास करण्यापेक्षा अर्ध्या तासाच्या सत्रांमध्ये अभ्यास करा. ✻ रात्रीचा अभ्यास टाळा. एक रात्र जागून अभ्यास केल्याने पुढचे चार दिवस त्याचा परिणाम राहतो. त्यामुळे सकाळी अभ्यास करा. प्रत्येक दिवशी ठराविक वेळीच अभ्यासाला बसा. ✻ वाचणं, महत्त्वाचे मुद्दे ठळक करणं, पुस्तक पुन्हा वाचणं यामुळे तुमच्या मेंदूची माहिती साठवून ठेवण्याची क्षमता वाढत नाही. 'फ्लॅशकार्ड' ही मेंदूपर्यंत माहिती पोहोचवण्याची योग्य पद्धत आहे. ✻ सगळा धडा लक्षात ठेवण्यापेक्षा त्यातले महत्त्वाचे मुद्दे लक्षात ठेवा. एक एक मुद्दा लक्षात ठेवण्याला प्राधान्य द्या. ✻ वेगवेगळ्या विषयांचे पेपर सोडवा. सराव चाचण्यांमध्ये सहभागी व्हा. यामुळे तुमच्या मेंदूची क्षमता वाढेल. ✻ अभ्यासासाठी योग्य जागा निवडा. अभ्यासासाठी लागणारं सगळं साहित्य जमवून मगच बसा. कोणताही अडथळा येणार नाही याची काळजी घ्या.

पंचांग

**शनिवार, १९ जुलै २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
आषाढ कृ. ९, नक्षत्र : भरणी
चंद्रराशी : मेष, योग : शूल
सूर्योदय : ६.१३, सूर्यास्त : ७.१७

फॉरवर्ड्स


**अपनें कहाँ क़भी अपनें होनें क़ा शोर मचातें हैं...**

**बस मुश्क़िलों में साँथ खड़ें हों जातें हैं...!**

आरोग्यमंत्र

## का जडतो मधुमेह?

मधुमेहींचं वाढतं प्रमाण अत्यंत चिंताजनक आहे. रक्तातल्या साखरेचं प्रमाण वाढणं हा एक स्लो पॉयझनिंगसारखा आजार असून हृदय आणि किडनीवर त्याचे सर्वाधिक विपरीत परिणाम होतात. पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये मधुमेह होण्याचं प्रमाण कमी आहे. मधुमेह म्हणजे रक्तात साचलेला ओलसर कफ (आम). रक्तातला हा घटक मासिक पाळीद्वारे दर महिन्याला बाहेर टाकला जातो. म्हणूनच मासिक पाळी सुरू असेपर्यंत स्त्रियांना मधुमेह होण्याचं प्रमाण कमी असतं. याच कारणामुळे स्त्रियांमध्ये मधुमेह चाळिशीनंतर म्हणजेच पाळी गेल्यानंतर डोकं वर काढणारा आजार ठरतो. मधुमेहास आणखीही काही बाबी कारणीभूत ठरु शकतात. उदाहरणार्थ



✻ दूध, दही अथवा दुग्धजन्य पदार्थ असा कफकर आहार जास्त प्रमाणात घेणं.
✻ अतिजागरण करणं.
✻ विरुद्ध आहार, अवेळी खाणं, अतिमात्रेत खाणं.
✻ आंबवलेले पदार्थ, नवीन धान्य, दही, गूळ, आंबट पदार्थ खाण्यात अधिक प्रमाणात असणं.
✻ शारीरिक कष्ट न घेणं. मानसिक ताणतणाव.
✻ दिवसा झोपणं (भोजनानंतर लगेच)
✻ आहारात समुद्रातील प्राण्यांचं मांस जास्त प्रमाणात असणं.

ग्रुमिंग

✻ चेहरा सौम्य फेसवॉशने धुवून घ्या. यामुळे चेहऱ्यावरची धूळ, घाण निघून जाईल. ✻ यानंतर स्क्रबचा वापर करा. चेहऱ्यावर स्क्रब लाऊन बोटं वर्तुळाकार फिरवा. यामुळे चेहऱ्यावरची मृत त्वचा दूर होईल. डोळ्यांजवळ बोटं हळूवार फिरवा. ✻ चेहरा नीट पुसून कोरडा करा. आता अंडर आय जेल किंवा क्रीमने डोळ्यांखाली हलक्या हाताने मसाज करा. ✻ चेहऱ्यावर सौम्य मॉईश्चरायझर किंवा फेस क्रीम लावा. ✻ या सगळ्या स्टेप्स फॉलो केल्यानंतरही चेहरा तेलकट वाटत असेल तर टाल्कम पावडर घ्या. हातांनी किंवा पफने चेहऱ्यावर लावा.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### इस्लामपूर झाले ईश्वरपूर

**मुंबई :** सांगली जिल्ह्यातल्या इस्लामपूर या गावाचे नाव बदलण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. देवेंद्र फडणवीस सरकारमधील मंत्री छगन भुजबळ यांनी विधीमंडळ अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी ही माहिती दिली. सरकारच्या या निर्णयामुळे आता इस्लामपूरचे नाव ईश्वरपूर झाले आहे. राज्य सरकारनं याबाबतचा निर्णय घेतला असून याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडं मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे, असं भुजबळ यांनी स्पष्ट केलं. इस्लामपूरचे नाव ईश्वरपूर करावे ही हिंदुत्ववादी संघटना तसंच त्या शहरातील नागरिकांची सातत्यानं मागणी होती. ती मागणी सरकारनं मान्य केली आहे. राज्यात गेल्या काही वर्षांमध्ये शहराचं नाव बदलण्याची ही पहिलीच घटना नाही. यापूर्वी औरंगाबादचं नाव बदलून छत्रपती संभाजीनगर असे ठेवण्यात आले. तसंच उस्मानाबादचे नाव धाराशिव आणि अहमदनगरचे नाव अहिल्यानगर ठेवण्यात आले आहे.

### सीमा सुरक्षा दलाची उल्लेखनीय कामगिरी

(पान १ वरुन)

केलेल्या कारवाईत, ६ डीजेआय मॅविक ३ क्लासिक ड्रोन आणि २.३४० किलो हेरॉइन जप्त करण्यात आले. यामुळे सीमेपलीकडे सक्रिय असलेल्या पाकिस्तानी नार्को-दहशतवाद सिंडिकेटला मोठा धक्का बसला आहे.

# पाकव्याप्त काश्मीरमध्ये दिसला मसूद अझहर

## दहशतवादाला पोसणाऱ्या पाकचा चेहरा झाला उघड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** जगभरात दहशतवाद पसरवणाऱ्या पाकिस्तानचा चेहरा पुन्हा एकदा उघड झाला आहे. जैश-ए-मोहम्मदचा म्होरक्या मसूद अझहर पाकव्याप्त काश्मीरमधील गिलगिट-बाल्टिस्तानमध्ये आढळला आहे. बहावलपूरपासून हा भाग एक हजार किलोमीटर अंतरावर आहे, ज्याला आपला बालेकिल्ला म्हटले जाते. ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारताने बहावलपूरमधील जैशच्या तळ सुभान अल्लाह कॅम्पमधील मसूद अझहरच्या मरकजला लक्ष्य केले आणि अनेक दहशतवाद्यांचा खात्मा केला.

माध्यमातील वृत्तानुसार, मसूद अझहर स्कार्दूच्या सदापाडा रोड परिसरात दिसला होता. या भागात दोन मशिदी, मदरसे आणि अनेक खासगी आणि सरकारी गेस्ट हाऊस आहेत. मसूद अझहर अफगाणिस्तानात असू शकतो, असा दावा पाकिस्तानचे माजी परराष्ट्रमंत्री बिलावल भुट्टो झरदारी यांनी नुकताच केला होता. मसूद पाकिस्तानात असता तर त्याला भारताच्या स्वाधीन करण्यास इस्लामाबाद तयार असल्याचा दावाही त्यांनी केला. मात्र, पाकव्याप्त काश्मीरमध्ये मसूद अझहरच्या उपस्थितीमुळे बिलावलचा दावा उघड झाला असून आता मसूद पाकव्याप्त काश्मीरमध्ये आल्याने पाकिस्तान त्याला भारताच्या स्वाधीन करण्यास तयार आहे का, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सुरू केलेल्या ऑपरेशन सिंदूरमध्ये जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तोयबाच्या तळांना लक्ष्य करण्यात आले होते. अजहर कसाबसा बचावला, तर त्याच्या कुटुंबातील १० सदस्य आणि इतर चार निकटवर्तीय ठार झाले. त्याच्यासाठी हा मोठा धक्का होता. जैश-ए-मोहम्मदने एक निवेदन जारी करून म्हटले होते की, मसूद अझहरची मोठी बहीण, मेहुणा, पुतण्याची पत्नी आणि भाची भारतीय हल्ल्यात ठार झाले. त्याचबरोबर एअर स्ट्राईकमध्ये पाच लहान मुलांचाही मृत्यू झाला होता.

मसूद अझहर हा भारतातील अनेक दहशतवादी हल्ल्यांचा मास्टरमाईंड आहे. २०१६ च्या पठाणकोट एअरबेस हल्ला आणि २०१९ च्या पुलवामा हल्ल्यामागे मसूद अझहरचा हात होता. या हल्ल्यात ४० जवान शहीद झाले होते. त्यानंतर भारताने पाकव्याप्त काश्मीरमध्ये हवाई हल्ले करताना अनेक दहशतवाद्यांचा खात्मा केला. भारत सरकारच्या मोस्ट वॉन्टेडच्या यादीतही मसूद अझहरचे नाव पहिल्या क्रमांकावर आहे. तो जैश-ए-मोहम्मद या बंदी घातलेल्या दहशतवादी संघटनेचा म्होरक्या आहे. कंदहार अपहरण प्रकरणात भारताने सुटका केल्यानंतर त्याने जैश ही दहशतवादी संघटना स्थापन केली.

## रेल्वेतून नेले जात होते ३५ कोटींचे ड्रग्ज



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** पनवेल रेल्वे स्टेशनवर बेंगळुरुमधील नारकोटिक्स नियंत्रण विभागाने केलेल्या संयुक्त कारवाईत तब्बल ३५ कोटी रुपयांचे तब्बल साडेतीन किलो 'मेथ' ड्रग्ज जप्त करण्यात आली आहे.

या प्रकरणी एका नायजेरियन महिलेला अटक करण्यात आली असून, पुढील तपास रेल्वे पोलीस आणि एनसीबी एकत्रितपणे करत आहेत. बेंगळुरु एनसीबीच्या गुप्त माहितीच्या आधारे, मंगला एक्सप्रेस या रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिलेवर लक्ष ठेवण्यात आले होते. संबंधित महिला पनवेल स्थानकावर पोहोचताच, एनसीबी आणि पनवेल रेल्वे पोलीस यांच्या पथकाने तिला अटक केली.

तिच्याकडून 'मेथाम्फेटामाइन' हा अत्यंत घातक आणि व्यसनाधीन बनवणारा पदार्थ सापडला. हे ड्रग्ज साडेतीन किलो वजनाचे असून, आंतरराष्ट्रीय बाजारात त्याची किंमत सुमारे ३५ कोटी रुपये असल्याचे प्राथमिक अंदाज आहेत. ही कारवाई विशेषतः रेल्वे मार्गांचा गैरवापर करून ड्रग्ज वाहतूक करणाऱ्या टोळ्यांविरुद्ध एक मोठा झटका मानला जात आहे.

## ओला-उबर चालकांचा संप




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईतील ओला आणि उबर कॅब चालकांचा संप सुरूच राहिल्याने प्रवाशांचे मोठे हाल झाले. शहराच्या विविध भागात लाखो प्रवासी रस्त्यावर अडकलेले दिसले. ओला-उबरचे भाडे स्थानिक काळ्या-पिवळ्या टॅक्सींइतकेच करावे, जेणेकरून त्यांना किमान उत्पन्न मिळू शकेल अशी वाहनचालकांची मागणी आहे.

सध्याचे कमिशन शुल्क कमी करावे, त्यामुळे वाहनचालकांचे उत्पन्न वाढेल अशी ही मागणी होत आहे. मुंबई आणि महाराष्ट्रात सुरू असलेल्या बाइक टॅक्सी सेवेचा थेट परिणाम त्यांच्या कमाईवर होत असल्याने त्यावर सरकारने बंदी घालावी, अशी मागणी वाहनचालकांनी केली आहे. हे आंदोलन प्रामुख्याने नवी मुंबई परिसरात केंद्रित होते, जिथे काही प्रवाशांना त्यांच्या कॅबमधून उतरण्यास भाग पाडले गेले. अनेक वाहनचालकांनी बाधित भागात फेऱ्या घेण्यास नकार दिला. अनेक प्रवाशांना कोणतीही सूचना न देता वाटेतच कॅबमधून उतरावे लागले. ओला आणि उबरचे बुकिंग अवघड होत असताना रॅपिडोमध्ये काळ्या-पिवळ्या टॅक्सींची मुबलक गर्दी पाहायला मिळाली. एका रॅपिडो ड्रायव्हरने सांगितले की ओला आणि उबर भरमसाठ कमिशन घेतात, तर रॅपिडो घेत नाहीत आणि सब्सक्रिप्शन कोटा गाठला तरीही बुकिंग ऑफर करतात.

भाड्याच्या वादात सुरुवातीच्या दीड किमीसाठी ३१ रुपये, त्यानंतर १ किमीसाठी २०.६ रुपये आकारले जातात. मूळ भाडे कारच्या मॉडेल आणि श्रेणीवर अवलंबून असते, जे पारदर्शक नसते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आगामी मोटार वाहन ॲग्रीगेटर मार्गदर्शक तत्त्वांमध्ये कॅबसाठी निश्चित दर असण्याची शक्यता नाही. या मार्गदर्शक सूचनांमध्ये मूळ भाड्यावर ०.५ टक्के ते १.५ टक्क्यांची मर्यादा घालण्यात आली आहे ज्यात सर्ज चार्जेसचाही समावेश असेल.

पान १ वरून

## उद्धव ठाकरेंचा केमिकल लोचा झालाय; शिंदे यांचा थेट प्रहार

महापौरपद देवेंद्र फडणवीस यांना मिळालं होतं, तेव्हा अर्ध्या तासात त्यांनी महापौरपद शिवसेनेला दिलं. पण, परतफेड न करता दगाबाजी केली. साधा फोन उचलायचा असतो, अशी आठवण एकनाथ शिंदेंनी आजच्या भाषणातून करुन दिली.

देवेंद्रजींना बोलले एक तर तू राहशील नाहीतर मी राहीन, कट कारस्थान करुन आत टाकायचा प्रयत्न केला. तेव्हा मी ठरवलं की आता कार्यक्रम करायचा. माझ्यावर टीका करायच्या आधी तुमच्याकडे तीन बोटं येतात. मुख्यमंत्री यांच्याकडे सगळेच जातात, किती द्वेष. मी सर्वसामान्य कुटुंबाचा मुलगा मुख्यमंत्री झाला. इतकी पोटदुखी असता कामा नये. हे जे काही सुरु आहे, ते पाहून देवेंद्रजी मनातल्या मनात हसते असतील, असेही एकनाथ शिंदेंनी म्हटलं.

एकीकडे आरएसएसला टोमणे मारायचे, बाळासाहेबांचं स्वप्न पूर्ण करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना शिव्या द्यायच्या. दुसरीकडे देवेंद्र फडणवीस यांना बुके द्यायचा. केमिकल लोचा झाला बहुदा, असा टोलाही एकनाथ शिंदेनी उद्धव ठाकरेंना लगावला. किती कोतेपणा आहे, आपण लता मंगेशकर संगीत महाविद्यालय करणार होतो. २४ एप्रिल २०२२ रोजी हृदयनाथ मंगेशकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना पहिला लता मंगेशकर पुरस्कार दिला आणि तिथेच पापड मोडला. मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात कार्यक्रम झाला, तिथं हे आले नाहीत. पीएम मोदींबाबत यांच्या मनात किती द्वेष आहे, याचे साक्षीदार उदय सामंत आहेत, असेही एकनाथ शिंदेनी म्हटलं.

## अनिल परब यांचा योगेश कदम यांच्यावर आरोप

सावली बार आहे. इथे पोलिसांनी धाड टाकली, त्यावेळी २२ बारबाला पकडल्या गेल्या. २२ बारबाला, २२ कस्टमर आणि ४ कर्मचाऱ्यांना पकडण्यात आले. या ठिकाणी कस्टमरवर गुन्हा दाखल झाला. या ठिकाणी पोलिसांनी पंचनामा केला. त्या बारचे परमिट हे ज्योती रामदास कदम यांच्या नावे आहे. त्या गृह मंत्र्यांच्या मातोश्री आहेत, असे त्यांनी म्हटले.

एकीकडे लाडक्या बहिणीचा तुम्हाला आशीर्वाद आहे आणि दुसरीकडे तुम्ही आया बहिणीना डान्सबारमध्ये नाचवता? आजच्या आज गृह राज्यमंत्री यांचा राजीनामा घ्यावा. अजित दादा तुम्ही योग्य ती कारवाई कराल. जे मुख्यमंत्री आज कारभार सांभाळतात त्यांनी गृहराज्यमंत्री यांचा राजीनामा घेतला पाहिजे. जर कारवाई झाली नाही तर सरकारचा पाठींबा आहे, हे सिद्ध होईल, असे देखील अनिल परब म्हणाले.

## हिंदी सक्तीचा निर्णय उद्धव...

यांनी लेखांचा संग्रह दिल्यानंतर मी ते वाचलं. माझी एवढीच मागणी आहे, ज्यावेळेस हा अहवाल सुपूर्द केला होता त्याची देखील बातमी लावावी. स्पेशल पोस्टही केली होती. त्याचंही कात्रण लावावं एवढीच माझी माफक मागणी आहे. बाकी माझी जास्त मागणी नाही", असा टोला देवेंद्र फडणवीस यांनी लगावला.

"आपल्याला पुढची भेट घ्यावीच लागेल. नाहीतर ह्यांना खाद्य कसं मिळेल? हे एक कठीणच झालं आहे. जयंतराव तुम्ही माझ्याकडे येऊन गेलेत की तुम्ही भाजमध्ये येणार. हे येऊन गेले की हे भाजपसोबत येणार. आपण संवादाच्या गोष्टी करतो. माझी विनंती आहे, संवाद राहूद्या. कुणी कुणाला भेटलं म्हणजे तो त्या पक्षात चाललाय किंवा युती करतोय, असं होत नाही", असंही देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

## तू साधा पीएसआय...

केल्याने रोहित पवार संतापले.

या व्हिडीओत पवार आक्रमकपणे सुनावताना दिसत आहेत, "आवाज खाली!! आणि हात वर केला तर सांगतो तुम्हाला. शहाणपणा करू नका, बोलता येत नसेल, तर बोलायचं नाही. कळलं का? चला व्हा तिकडे. आमदाराला हात लावायचा नाही." यावेळी पवार यांच्या बाजूच्या एका व्यक्तीने पीएसआयला "तू एक साधा पीएसआय..." असे म्हणत अपमानास्पद भाषा वापरली, या वक्तव्याने हा वाद अधिक तीव्र झाल्याचे दिसत आहे. वरिष्ठ पोलिसांनी हस्तक्षेप करून हा वाद थांबवला, मात्र या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने राजकीय आणि सामाजिक स्तरावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत.

## अभूतपूर्व गोंधळ

टकले आणि आव्हाडांचे कार्यकर्ते नितीन देशमुख यांच्यात हाणामारी झाली. त्यात दोन्ही बाजूंचे आणखी चार-चार कार्यकर्ते सहभागी झाले होते. किमान तीन मिनिटे हा धिंगाणा सुरू होता.

अखेर सुरक्षा रक्षकांनी त्यांना दूर केले. अशा प्रकारची घटना पहिल्यांदाच घडली. आव्हाडांसह जयंत पाटील यांनी मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली. विधानसभा अध्यक्ष चौकशी करून कारवाई करणार आहेत असे सांगण्यात आले. दरम्यान, पडळकरांनी दिलगिरी व्यक्त केली. तत्पूर्वी पडळकर समर्थकाने मोबाइलवर शिवीगाळ करत धमकावल्याचा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी केला होता.

## मुंबईकरांसाठी गुड न्यूज; लोकलचे सर्व डबे एसी होणार

प्रवास करतात,ज्याला दरवाजे नसल्यानं अपघात होतात. म्हणून मा. मोदीजी आणि मा. रेल्वे मंत्र्यांकडे आम्ही अशी मागणी केली होती की मेट्रोसारखे कोचेस उपनगरीय रेल्वेला दिले पाहिजेत. म्हणजे जेपूर्णपणे एसी असतील ज्याचे दरवाजे बंद होतील. ही मागणी केली आहे की हे कोचेस लावले तरी तिकिटात एक रुपयाची वाढ न करता हे कोचेस लागले पाहिजेत, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, मला सांगताना याचं समाधान आहे, आजच सकाळी रेल्वेमंत्री मुंबईत होते. त्यांनी हे सांगितलं, आम्ही या संदर्भात सकारात्मक निर्णय घेत आहोत. लवकरच मुंबईला येऊन अधिकृत घोषणा करतील. त्यानंतर आपल्या उपनगरीय रेल्वेचे सर्व डबे मेट्रो सारखे एसी असतील. ते रेट्रो फिटींग नसतील, या ठिकाणी चांगल्या पद्धतीनं डबे येतील. ज्यामध्ये दरवाजे असतील, या ट्रेन एसी असतील, कुठलिही तिकीटवाढ याच्यात केली जाणार नाही, असंही फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

## दोन्ही भाऊ एकत्र येणार का?

"मुंबईचं महत्त्व कमी केलं जात आहे. त्यासाठीच मुंबईत जेवढे उद्योग होते, वित्तीय कार्यालये होती, आर्थिक केंद्र होते ते सर्व गुजरातला कोण घेऊन गेलं? हीच लोकं घेऊन गेली ना? मुंबईला महाराष्ट्रापासून कुणी वेगळं करु शकत नाही. जे कोणी तसं कृत्य करतील आम्ही त्याचे तुकडे करु. यासोबतच मुंबईचं महत्त्व कमी होऊ देणार नाही. मुंबई महाराष्ट्राची राजधानी आहे, तसेच देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबईचं हे महत्त्व काही लोकांच्या डोळ्यांमध्ये खुपतं. अहमदाबादला जाणाऱ्या बुलेट ट्रेनचं निर्माण कोण करत आहे? हे स्पेशल सांगण्याची आवश्यकता नाही", असं उद्धव ठाकरे म्हणाले.

## अमेरिकन जनता...

सर्वात भयानक काळातून जात आहोत. सरकारमध्ये वाढत्या हुकूमशाही वृत्तीचा आणि कायद्याच्या उल्लंघनाचा सामना करत आहोत, जो आपल्या लोकशाही स्वातंत्र्य आणि अधिकारांना आव्हान देत आहे. पब्लिक सिटीझन ग्रुप ही एक गैर-नफा संस्था (एनजीओ) आहे जी मोठ्या कॉर्पोरेट घराण्यांच्या विरोधात काम करते. हे निदर्शने विशेषतः अटलांटा, सेंट लुईस, ओकलंड (कॅलिफोर्निया) आणि ॲनापोलिस (मेरीलँड) येथे करण्याचे नियोजन आहे.

# राष्ट्रसंत प.पू.आनंदऋषीजी म.सा. यांच्या ऊर्जा चरणांची स्थापना



**पुणे :** आनंद दरबार दत्तनगर कात्रज येथे भारतात प्रथमच १४ शुभचिन्ह असलेले राष्ट्रसंत आचार्य भगवंत प.पू. आनंदऋषीजी म.सा यांच्या ऊर्जा चरणांची विधिवत पूजा करून प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. आचार्य भगवंत प.पू. श्री. विरागसागर सुरीश्वरजी म.सा , वात्सल्य मूर्ति प.पू. श्री इन्दुप्रभाजी म.सा.आदि ठाणा यांच्या पावन सान्निध्य ऊर्जा चरणांचा भव्य 'वरघोडा' श्री. किसनराव कामठे यांच्या निवासस्थानावरून आनंद दरबार पर्यंत काढण्यात आला. ढोल ताशांचा गजर, महिलांच्या फुगड्या, बालवारकरी यांची दिंडी आणि टाळ मृदुंगाच्या गजराने वातावरण मंगलमय झाले.

आज पासून आनंद दरबारला, आनंद तीर्थ म्हणा कारण गुरुचे चरण या ठिकाणी स्थापित झाले असून ही वास्तू पवित्र झाली आहे असे मत परम पूज्य विरागसागर सुरीश्वरजी म.सा यांनी उपस्थित धर्मसभेत व्यक्त केले. आनंद दरबारचे अध्यक्ष बाळासाहेब धोका म्हणाले काळाप्रमाणे आपण देखील बदलायला हवे पुढच्या पिढीला पूज्य आनंदऋषीजींच्या भक्ती-शक्तीच्या अथांग सागराचे दर्शन व्हावे यासाठी चरण कमल पादुकांची स्थापना केले आहे.

यावेळी सुनीलजी पारख, दत्तात्रेय कामठे, रमनलाल लुंकड, डॉ. सुमतिलाल लोढा, कमलाबाई कर्णावट , सुरेशजी डाकलीया, रविन्द्र नहार, रविन्द्र लुंकड, गणेशजी चोरडिया, अक्षय जैन , मा.नगरसेवक युवराज बेलदरे आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी महाप्रसादी चा लाभ श्रीमती सक्करबाई आलमचंदजी चोरडिया व जैन श्रावक संघ ,वडगाव मावळ यांना मिळाला.

कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी प्रकाश बोरा, पारस धोका, संतोष भंडारी, सुयोग भंडारी, संतोष दुगड व आनंद दरबारचे सर्व सदस्य, युवा मंडळ, महिला मंडळ आणि बहू मंडळ यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश लुंकड यांनी केले. आभार समितीचे अध्यक्ष - उमेद धोका यांनी केले.

## मुंबईत अचानक तीन मजली चाळ कोसळली

**मुंबई :** मुंबईत आज सकाळी अचानक एक तीन मजली चाळ कोसळली. इमारतीच्या ढिगा-याखाली १२ जण अडकल्याची माहिती आहे. या घटनेची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दलाने (एमएफबी) लेव्हल-२ अलर्ट जारी केला आणि बचाव कार्य सुरू केले. मुंबईतील वांद्रे परिसरातील भारत नगर येथील चाळ क्रमांक-३७ मध्ये ही दुर्घटना घडली. स्फोटानंतर संपूर्ण इमारत कोसळली. आतापर्यंत ढिगा-यातून बाहेर काढलेल्या १२ जणांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## यूपी पोलिसांच्या एन्काउंटरमध्ये २३८ गुन्हेगार ठार

# ९ हजारांहून अधिक गोळीबारात जखमी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**लखनौ :** उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ यांचे सरकार आल्यापासून राज्यातील गुन्हेगारांविरोधात यूपी पोलिसांची तीव्र कारवाई सुरुच आहे. मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार, गुन्हेगारीबाबत झिरो टॉलरन्स धोरणांतर्गत गुन्हेगार/गुन्हेगारांविरुद्ध सातत्याने कठोर कारवाई केली जात आहे. २०१७ पासून पोलिसांनी २३८ गुन्हेगारांना चकमकीत ठार केले आहे, तर ९ हजारांहून अधिक गुन्हेगार गोळीबारात जखमी झाले आहेत.

सरकारने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, ३० हजारांहून अधिक गुन्हेगारांना अटक करुन तुरुंगात पाठवले आहे. तर, ९,४६७ गुन्हेगारांच्या पायाला गोळ्या लागल्या. सर्वाधिक कारवाई मेरठ झोनमध्ये झाली. योगी सरकार कायदा आणि सुव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी कठोर पावले उचलत आहे. मुख्यमंत्री योगी यांच्या नेतृत्वाखाली, गेल्या आठ वर्षांत यूपी पोलिस गुन्हेगारी आणि गुन्हेगारांविरुद्ध झिरो टॉलरन्स धोरणांतर्गत सतत कारवाई करत आहेत. २०१७ पासून पोलिसांनी राज्यात ३० हजारांहून अधिक गुन्हेगारांना चकमकीनंतर अटक केली आहे, तर ९ हजारांहून अधिक गुन्हेगारांना चकमकीदरम्यान पायात गोळी लागली आहे. मेरठ झोनमध्ये सर्वाधिक ७९६९ गुन्हेगारांना अटक करण्यात आली, तर २९११ जखमी झाले.

उत्तर प्रदेशचे डीजीपी राजीव कृष्णा म्हणाले की, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या निर्देशानुसार गुन्हेगारांवर सतत कारवाई केली जात आहे. गेल्या आठ वर्षांत, गुन्हेगारांना पकडण्यासाठी यूपी पोलिसांनी १४,९७३ कारवाई केल्या. या दरम्यान, ३०,६९४ गुन्हेगारांना अटक करून तुरुंगात पाठवण्यात आले.

#रा

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांना कळवण्यात येते की मनोज गणेश गवळी राहणार, सर्व्हे नंबर ५६ / ८२, फ्लॅट नंबर २१०, साउथ विंग, रोहित पाम्स, रहाटणी, पुणे- ४११०१७. यांचे दिनांक १५.०६.२०२५ रोजी निधन झाले असून, त्यांच्या नावावर असलेली वाहने अनुक्रमे (१) दोन चाकी वाहन नंबर MH 14 JB 7210 असा असून त्याचा चासीस नंबर MD2A11CX6LCL41223 व इंजिन नंबर DHXCLL64295 असा आहे. (२) दोन चाकी वाहन नंबर MH 14 FH 6669 असा असून त्याचा चासीस नंबर 21946 व इंजिन नंबर 52604 असा आहे. (३) चार चाकी वाहन नंबर MH 14 JM 9868 असा असून त्याचा चासीस नंबर MAT632144MPEJ0174 व इंजिन नंबर REVTRN10EYXM82055 असा आहे. सदरील तिनही वाहने त्यांची एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती विद्या मनोज गवळी यांच्या नावावर पिंपरी-चिंचवड आरटीओ कार्यालयात करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, पंधरा दिवसाच्या आत कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही, असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.
१९/०७/२०२५

**श्रीमती विद्या मनोज गवळी**
सर्व्हे नंबर ५६ / ८२, फ्लॅट नंबर २१०,
साउथ विंग, रोहित पाम्स,
रहाटणी, पुणे. ४११०१७.

**जाहीर नोटीस**
**उपविभागीयदंडाधिकारी हवेली, उपविभाग पुणे यांचे कार्यालय**
७.निलगिरी बंगला, राणीचा बाग, अल्पबचत भवनमागे, पुणे-४११००१ दुरध्वनी क्र. ०२०-२६३३०८३२
Email-sdoune@gmail.com

क्र. मृत्यु/नोंदणी/SR/१९७/२

१) **श्री. शिवाजी ज्ञानोबा परंडवाल** रा. माळीनगर, देहूगाव ता. हवेली जि. पुणे .....अर्जदार
विरुध्द
२) **जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी / निबंधक,** देहू नगर पंचायत .....जाबदेणार

विषय: जन्म आणि मृत्यु नोंदणी कायद्याच्या कलम १३(२)(३) नुसार,

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार **श्री. शिवाजी ज्ञानोबा परंडवाल रा. माळीनगर, देहूगाव ता. हवेली जि. पुणे** (अपिलार्थी) **यांनी त्यांचे आजी कै. रखमाबाई गणपत परंडवाल, यांचा, मृत्यु दि. ११/०३/१९८६ रोजी मौजे माळीनगर देहू येथे** झाला आहे. सदर मृत्युची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्युची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वता: अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकूम करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि.१५/७/२०२५ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

**(डॉ.यशवंत माने)**
(शिक्का) उपविभागीय दंडाधिकारी, हवेली, उपविभाग पुणे

ठिकाण : पुणे
दिनांक : १५ / ७/२०२५

# इंग्लंडचे ११० कोटींचे विमान केरळमध्येच

## पार्किंगपोटी विमानतळ प्रशासनाला लक्षावधींची कमाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तिरुअनंतपुरम :** ब्रिटनचे अत्याधुनिक एफ-३५बी लढाऊ विमान मागील महिन्याभरापासून केरळच्या तिरुअनंतपुरम विमानतळावर तांत्रिक बिघाडामुळे अडकलं आहे. या विमानामुळे तिरुवनंतपुरम विमानतळ प्रशासनाला दररोज तब्बल २६,२६१ पार्किंग शुल्क मिळत आहे.

१४ जून रोजी तांत्रिक बिघाड झाल्यानंतर या ब्रिटिश लढाऊ विमानाने तिरुवनंतपुरम विमानतळावर आपत्कालीन लँडिंग केलं. त्यानंतर विमान तिथेच उभं आहे. ३३ दिवसांच्या पार्किंगनंतर एकूण पार्किंग शुल्क सुमारे ८.६६ लाख इतकं झालं आहे. ६ जुलै रोजी ब्रिटनमधून २४ जणांची रॉयल एअर फोर्स टीम केरळमध्ये दाखल झाली. यात १४ तांत्रिक तज्ञ आणि १० क्रू मेंबर्सचा समावेश होता. त्यांनी विमानाची तपासणी करून ते भारतातच दुरुस्त करता येईल का, की त्याला परत ब्रिटनला हलवावं लागेल, हे पाहिलं.

एफ-३५बी हे लढाऊ विमान ११० दशलक्ष डॉलर (९०० कोटींपेक्षा जास्त) किमतीचं असून ते पाचव्या पिढीतील आणि शॉर्ट टेक ऑफ अँड व्हर्टिकल लँडिंग क्षमतेसह येतं. त्यामुळे ते लहान डेक्स, लहान विमानतळ, आणि युद्धनौकांसाठी उपयुक्त ठरतं. भारतीय हवाई दलानेही या दुरुस्तीमध्ये आवश्यक सर्व सहकार्य दिलं. मात्र, जेव्हा विमान परत जाण्याच्या तयारीत होतं, तेव्हा हायड्रॉलिक फेल्युअर झाल्याचं लक्षात आलं आणि पुन्हा दुरुस्तीची गरज निर्माण झाली.

इंजिनियर्स लवकरात लवकर विमान दुरुस्त करून ते या आठवड्यात ब्रिटनला परत पाठवण्याचा प्रयत्न करत आहेत.

दुरुस्ती शक्य न झाल्यास, ते सी-१७ ग्लोबमास्टर सारख्या मोठ्या विमानात टाकून हलवण्याची शक्यता आहे. ही घटना भारतातील नागरी विमानतळांवर लष्करी लढाऊ विमानांच्या तात्पुरत्या तैनातीबाबत एक महत्त्वाचा संदर्भ ठरू शकते. तिरुअनंतपुरम विमानतळाला यामुळे हजारो रुपयांचे उत्पन्न मिळाले असून, यापुढे अशा प्रकारच्या परदेशी लष्करी विमानांच्या आपत्कालीन लँडिंगवर लक्ष ठेवणे गरजेचे ठरणार आहे.

### १४ जूनला झाले होते इमर्जन्सी लँडिंग

● हे विमान भारतात १४ जून रोजी तिरुअनंतपुरम विमानतळावर आपत्कालीन लँडिंगसाठी आले होते. भारतीय विमानसेवा आणि इतर अधिकाऱ्यांनी पूर्ण सहकार्य करत विमान सुरक्षितपणे इथं उतरवलं. ६ जुलै रोजी ब्रिटनमधून २४ सदस्यांची तांत्रिक टीम केरळमध्ये पोहोचली, ज्यांनी विमान गॅराजमध्ये हलवून दुरुस्ती कामांची सुरुवात केली. इंजिनियर्सनी विमान वाजवी कालावधीमध्ये पुन्हा उडण्यायोग्य बनवण्याचा प्रयत्न सुरू ठेवला.



# राजकीय सूडातून रॉबर्ट वाड्रांना त्रास

## राहुल गांधी यांचा केंद्र सरकारवर हल्लाबोल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी एक्स (पूर्वीचं ट्विटर) या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून केंद्र सरकारवर तीव्र हल्लाबोल केला. मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात रॉबर्ट वाड्रा (राहुल गांधी यांचे जिजाजी) यांच्याविरोधात ईडीने गुरुवारी दाखल केलेल्या आरोपपत्रानंतर राहुल गांधींनी प्रतिक्रिया दिली आहे.

राहुल गांधी म्हणाले, "सरकार गेल्या १० वर्षांपासून माझ्या जिजाजींना त्रास देत आहे. ही चार्जशीट त्याच राजकीय सूडाच्या कारस्थानाचा भाग आहे. मी रॉबर्ट, प्रियंका आणि त्यांच्या मुलांच्या सोबत आहे. त्यांना केवळ राजकीय हेतूनं बदनामी आणि त्रास सहन करावा लागत आहे. पण मला खात्री आहे की ते धैर्यानं आणि सन्मानानं या सगळ्याला सामोरे जातील. शेवटी सत्याचाच विजय होईल."

फेब्रुवारी २००८ मध्ये रॉबर्ट वाड्रा यांच्या स्कायलाईट हॉस्पिटॅलिटी या कंपनीने हरियाणातील गुरुग्रामजवळील शिकोहपूर गावात ३.५ एकर जमीन ओंकारेश्वर प्रॉपर्टीजकडून ७.५ कोटी रुपयांना खरेदी केली. त्यावेळी हरियाणात काँग्रेसचे सरकार होती आणि भूपेंद्र सिंह हुड्डा मुख्यमंत्री होते.



### ईडी कडून मनी लॉन्ड्रिंगचा गुन्हा

● ईडीने या एफआयआर वरून मनी लॉन्ड्रिंगचा गुन्हा दाखल केला. एजन्सीचा दावा आहे की, या व्यवहारातून काळा पैसा फिरवण्यात आला असू शकतो. ओंकारेश्वर प्रॉपर्टीज ही कंपनी बनावट असण्याचा संशयही व्यक्त करण्यात आला आहे. ईडीच्या तपासात असं समोर आलं की, व्यवहारात दिलेला चेक कधीही वठवण्यात आला नाही. त्यामुळे व्यवहार फक्त कागदोपत्रीच होता, असा शंका आहे. ईडीचा आणखी एक गंभीर आरोप म्हणजे या व्यवहारातून कंपनीला सुमारे ५ हजार कोटी रुपयांचा फायदा झाला, ज्यासाठी तत्कालीन हुड्डा सरकारने नियमांचं उल्लंघन केलं. वजीराबादमधील ३५० एकर जमीन डीएलएफला दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

जमीन खरेदीनंतर महिनाभरातच स्कायलाईट हॉस्पिटॅलिटीला सरकारकडून तिथे रहिवासी प्रकल्प उभारण्याची परवानगी मिळाली. त्यामुळे जमीन महाग झाली आणि केवळ दोन महिन्यांत वाड्रांच्या कंपनीने ती जमीन डीएलएफ कंपनीला ५८ कोटी रुपयांना विकली. म्हणजे केवळ ४ महिन्यांतच सुमारे ७०० टक्के नफा मिळाला.

२०१२ मध्ये हरियाणाचे भू-अभिलेख संचालक आयएएस अधिकारी अशोक खेमका यांनी या व्यवहारात अनियमितता असल्याचं सांगत जमीन हस्तांतरण (म्युटेशन) रद्द केलं. त्यानंतर त्यांची बदली करण्यात आली आणि वादाला सुरुवात झाली. २०१८ मध्ये हरियाणा पोलिसांनी रॉबर्ट वाड्रा, भूपेंद्र हुड्डा, डीएलएफ आणि ओंकारेश्वर प्रॉपर्टीज यांच्याविरोधात आयपीसीच्या कलम ४२० (फसवणूक), १२० बी (कट रचना), ४६७, ४६८, ४७१ आणि नंतर ४२३ अंतर्गत गुन्हे दाखल केले. १६ जुलै रोजी ईडीने रॉबर्ट वाड्रा यांच्याशी संबंधित सुमारे ३७.६४ कोटींची मालमत्ता जप्त केली. गुरुवारी दाखल केलेली चार्जशीट ही वाड्रा यांच्या विरोधात ईडीने प्रथमच दाखल केलेली आहे.

# लालूप्रसाद यादव यांना सर्वोच्च न्यायालयाचा धक्का

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** :नोकरीसाठी जमीन घोटाळा प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख लालूप्रसाद यादव यांना मोठा धक्का दिला आहे. लालू प्रसाद यादव यांच्याविरुद्ध कनिष्ठ न्यायालयाच्या खटला चालू ठेवण्याच्या आदेशाला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. तसेच, दिल्ली उच्च न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी जलद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तथापि, सर्वोच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाच्या कार्यवाहीत उपस्थित राहण्याची सूट लालूप्रसाद यादव यांना दिली आहे.

आरजेडी सुप्रीमो या प्रकरणात दिलासा मिळविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात पोहोचले होते. तत्पूर्वी, दिल्ली उच्च न्यायालयाने लालू यादव यांची ही मागणी फेटाळून लावली होती. दिल्ली उच्च न्यायालयाने म्हटले होते की, आदेशाला स्थगिती देण्याचे कोणतेही ठोस कारण नाही. उच्च न्यायालयाने सीबीआयला नोटीस बजावली होती आणि सुनावणी १२ ऑगस्टपर्यंत तहकूब केली होती.

लालू प्रसाद यादव यांनी त्यांच्या याचिकेत २०२२, २०२३ आणि २०२४ मध्ये दाखल केलेल्या सीबीआय एफआयआर आणि तीन आरोपपत्रे आणि संज्ञानात्मक आदेश रद्द करण्याची मागणी केली होती. त्यांनी म्हटले होते की, हा अहवाल १४ वर्षांच्या विलंबाने २०२२ मध्ये दाखल करण्यात आला होता. तर सक्षम न्यायालयात क्लोजर रिपोर्ट दाखल केल्यानंतर सीबीआयने केलेली प्राथमिक चौकशी आणि तपास बंद करण्यात आला होता.

मागील तपास आणि त्याचा क्लोजर रिपोर्ट लपवून नवीन तपास सुरू करणे हे कायद्याच्या प्रक्रियेचा गैरवापर आहे. त्यामुळे बेकायदेशीर तपासामुळे यादव त्रस्त आहेत. नि:पक्ष चौकशीच्या त्यांच्या मूलभूत अधिकाराचे हे उल्लंघन आहे. सध्याची चौकशी बेकायदेशीर आहे. कारण दोन्ही अनिवार्य मंजुरीशिवाय सुरू करण्यात आली आहेत. अशा मंजुरीशिवाय केलेली कोणतीही चौकशी सुरुवातीपासूनच अवैध असेल.

# डीआरआयची न्हावा शेवा बंदरात छापेमारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** डीआरआयनं न्हावा शेवा बंदरात छापेमारी करत तब्बल १३.१८ कोटी रुपयांच्या विदेशी सिगारेटचा साठा जप्त केलाय. या प्रकरणात डीआरआयकडून एका आरोपीला अटकही करण्यात आलीय. डीआरआयनं जप्त केलेल्या सिगारेटला भारतात बंदी घालण्यात आली आहे. मात्र तरीही छुप्या पद्धतीनं समुद्रमार्गे कस्टम ड्युटी चुकवून या बंदी घातलेल्या सिगारेटची तस्करी करण्यात येत होती.

महसूल गुप्तचर संचालनालय (डीआरआय), मुंबई विभागीय युनिटला मिळालेल्या माहितीच्या आधारे ही मोठी कारवाई करण्यात आलीय. भारतात छुप्या पद्धतील कस्टम ड्युटी चुकवून समुद्रमार्गे तस्करी सुरू असल्याची माहिती डीआरआयला मिळाली होती. भारतात विदेशी सिगारेटची तस्करी होणार आहे, अशी माहिती मिळताच डीआरआयनं महागड्या विदेशी सिगरेटच्या तस्करीचा मोठा प्रयत्न उधळून लावला.

मिळालेल्या माहितीच्या आधारे डीआरआय मुंबईच्या अधिकाऱ्यांनी न्हावा शेवा बंदरात कंटेनरमधून छुप्या पद्धतीनं आलेला हा माल ताब्यात घेतला. तपासणी केली असता यात या विदेशी ब्रँडच्या सिगारेटचे १०१४ कार्टुन असलेलं एक कंटेनर डीआरआयच्या हाती लागलं. कायद्यानं ही सिगरेट भारतात विकण्याची परवानगी नाही. या एकूण मालाची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत १३.१८ कोटी रुपये इतकी आहे.



**स्वेडा, सीरिया** सीरियाच्या दक्षिणेकडील ड्रुझ शहरात स्वेदा येथे सीरियन सरकारी सैन्य आणि स्थानिक यांच्यात झालेल्या चकमकीनंतर सीरियन सुरक्षा दलाच्या सदस्यांनी एका घराच्या आत अशा पद्धतीने बैठक घेतली.

# ब्रह्मोस हायपरसोनिक विकसित करणार भारत आणि रशिया




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताच्या ब्रह्मोस सुपरसोनिक क्षेपणास्त्राला जगाने मान्यता दिली आहे. ते रोखण्यासाठी मोजक्याच हवाई संरक्षण यंत्रणा सक्षम आहेत. त्याचवेळी ऑपरेशन सिंदूरदरम्यान या क्षेपणास्त्राने आपली ताकद जगाला दाखवून दिली. आता लवकरच ब्रह्मोसचा हायपरसोनिक व्हेरियंटही येत आहे. चीनपासून अमेरिकेपर्यंतची हवाई संरक्षण यंत्रणा या क्षेपणास्त्रासमोर पाणी भरणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भारत आणि रशियाने लवकरच या प्रकल्पावर काम सुरू केले असून, हा प्रकल्प सुरू झाला आहे.

ब्रह्मोस एअरोस्पेसचे माजी महासंचालक अतुल राणे यांनी सांगितले की, ब्रह्मोस हायपरसोनिक क्षेपणास्त्राचे काम सुरू झाले आहे. दोन्ही देश या प्रकल्पात सामील झाले आहेत. लवकरच ब्रह्मोस हायपरसोनिक क्षेपणास्त्र आपल्यासमोर येणार आहे. ब्रह्मोस क्षेपणास्त्राला भारत आणि रशियातील ब्रह्मपुत्रा आणि मोस्कवा या दोन नद्यांचे नाव देण्यात आले आहे. या प्रकल्पात डीआरडीओचा ५०.५० टक्के तर रशियन कंपनीचा ४९.५० टक्के हिस्सा आहे.

ब्रह्मोस हायपरसोनिक क्षेपणास्त्राच्या वेगाबाबत अधिकृत माहिती मिळालेली नसली तरी आवाजाच्या वेगापेक्षा ८ पट वेगाने हे क्षेपणास्त्र डागता येऊ शकते, असे तज्ज्ञांचे मत आहे. याशिवाय याची रेंज १५०० किलोमीटरपेक्षा जास्त असेल. अशा परिस्थितीत पाकिस्तान आणि चीनचा मोठा भाग त्याच्या तावडीत येईल, असे म्हणता येईल. तो मॅक-8 किंवा मॅक-9 च्या वेगापर्यंत पोहोचू शकतो. म्हणजेच ब्रह्मोस सुपरसोनिक क्षेपणास्त्रावर ताशी ११००० किलोमीटर वेगाने हल्ला करू शकते.

ब्रह्मोस हायपरसोनिक क्षेपणास्त्रात स्क्रॅमजेट इंजिन असणार आहे. हवेत प्राणवायू खेचून तो बराच काळ उड्डाण करण्यास सक्षम आहे. याशिवाय या क्षेपणास्त्राचे वजनही कमी असेल, जेणेकरून तेजस विमानातून ते सहज प्रक्षेपित करता येईल. इस्रायलची आयर्न डोम एअर डिफेन्स सिस्टीम अतिशय प्रगत मानली जाते. मात्र, ब्रह्मोस हायपरसोनिक क्षेपणास्त्राला रोखणेही या प्रणालीला अवघड होणार आहे. ब्रह्मोस प्रकल्पही भारत आणि रशियाने संयुक्तपणे राबविला होता. हे आता जगातील सर्वात वेगवान सुपरसोनिक क्रूझ क्षेपणास्त्रांपैकी एक आहे. ब्रह्मोसची ही आवृत्ती लक्ष्याच्या आत खोलवर भेदण्यासही सक्षम असेल. येत्या काळात हे क्षेपणास्त्र भारताच्या सर्वात शक्तिशाली शस्त्रांपैकी एक ठरणार आहे. हे क्षेपणास्त्र इंटेलिजन्समध्येही नंबर वन असेल. हे केवळ उच्च वेगाने आपल्या लक्ष्याला लक्ष्य करू शकत नाही तर वेगाने वळू शकते. अशा वेळी शत्रूला त्याला रोखणे सोपे जाणार नाही. तसेच शत्रूच्या रडार यंत्रणेला ही मात करता येणार आहे. ॲडव्हान्स कंट्रोल सिस्टीम, स्टेल्थ फीचर्स आणि डिझाईन यामुळे हे आणखी खास झाले आहे.

## ५५ माओवाद्यांचा शोध सुरू : जम्मू-खंड पोलीस




**रांची :** झारखंड पोलिसांनी शुक्रवारी सांगितले की, भाकप (माओवादी) च्या वरिष्ठ कमांडरसह ५५ नक्षलवाद्यांचा मोठ्या प्रमाणात शोध सुरू असून त्यांच्याकडे एकूण ८.४५ कोटी रुपयांचे बक्षीस आहे. राज्यातून नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यासाठी सुरक्षा दलांनी व्यापक मोहीम हाती घेतली असून गेल्या सहा महिन्यांत १९७ माओवाद्यांना अटक करण्यात आली आहे, तर १० नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली असून १७ ठार झाले आहेत. नक्षलविरोधी मोहिमेत मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त करण्यात आल्याचा दावा ही पोलिसांनी केला असून, त्यात सुरक्षा दलांकडून लुटण्यात आलेल्या ३१ शस्त्रांचाही समावेश आहे.

## राहुल गांधींनी घेतली ए. के. अँटनी यांची भेट



**तिरुवनंतपुरम/कोल्लम :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी संरक्षणमंत्री ए. के. अँटनी यांची शुक्रवारी त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. राज्यसभेच्या खासदारपदाचा कार्यकाळ संपल्यानंतर २०२२ मध्ये सक्रिय संसदीय राजकारण सोडून केरळला स्थलांतरित झालेल्या अँटनी यांच्या घरी राहुल गांधी यांनी ही शिष्टाचार भेट घेतली. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते १९७० पासून केरळ विधानसभेचे सदस्य आहेत आणि १९७७, १९९५ आणि २००१ मध्ये तीन वेळा राज्याचे मुख्यमंत्री झाले.

## अमेरिकेशी करार करताना हुशारी बाळगण्याची गरज

नवी दिल्ली : विकसित देशांकडून मोठ्या प्रमाणात अनुदान मिळणाऱ्या कृषी क्षेत्रासंदर्भात अमेरिकेशी व्यापार करार करताना भारताने अत्यंत सावध गिरी बाळगण्याची गरज आहे, असे मत रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांनी शुक्रवारी व्यक्त केले. राजन म्हणाले की, भारताचा आर्थिक विकास दर ६ ते ७ टक्क्यांच्या दरम्यान स्थिरावला आहे आणि जागतिक व्यापारातील अनिश्चिततेमुळे काही टक्के भागावर परिणाम होऊ शकतो. "मला वाटते की जिथे शेतीसारख्या क्षेत्रात (व्यापार वाटाघाटी) अधिक कठीण आहे, जिथे प्रत्येक देश आपल्या उत्पादकांना सबसिडी देतो आणि आपले उत्पादक तुलनेने लहान असू शकतात, त्यांना काही प्रमाणात कमी सबसिडी असू शकते... देशात शेतीमालाची अखंड आवक त्यांच्यासाठी समस्या निर्माण करू शकते, असे ते म्हणाले.

## भूपेश बघेल यांच्या मुलाला अटक



**नवी दिल्ली :** छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांचा मुलगा चैतन्य बघेल याला सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) शुक्रवारी अटक केली. दुर्ग जिल्ह्यातील भिलाई शहरातील त्यांच्या निवासस्थानी छापे टाकून मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पीएमएलए) त्यांना ताब्यात घेण्यात आले. पिता-पुत्र एकाच ठिकाणी राहतात. पक्षाचे काही समर्थक जमा झाले असले तरी घराबाहेर पोलिसांचा मोठा फौजफाटा दिसून आला.

## दहशतवादविरोधी सहकार्य वाढवावे, चीनचे आवाहन

**बीजिंग :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यात सहभागी असल्याच्या आरोपावरून अमेरिकेने पाकिस्तानस्थित लष्कर-ए-तोयबाची संघटना असलेल्या रेझिस्टन्स फ्रंटला परदेशी दहशतवादी संघटना म्हणून घोषित केल्यानंतर चीनने प्रादेशिक देशांना प्रादेशिक सुरक्षेसाठी दहशतवादविरोधी सहकार्य वाढविण्याचे आवाहन केले आहे. टीआरएफला परदेशी दहशतवादी संघटना म्हणून घोषित करण्याच्या अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या विधानाबद्दल विचारले असता परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान यांनी शुक्रवारी येथे पत्रकार परिषदेत सांगितले की, चीन कोणत्याही प्रकारच्या दहशतवादाला कडाडून विरोध करतो आणि २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध करतो. चीनने प्रादेशिक देशांना प्रादेशिक सुरक्षेसाठी दहशतवादविरोधी सहकार्य वाढवण्याचे आवाहन केले आहे, असे लिन यांनी सांगितले.

# ऐतिहासिक तलाव भरण्याच्या मार्गावर



**पुरंदर** उन्हाळ्यात नेहमीच रिकामा पडणारा जेजुरीचा भव्य दिव्य असा ऐतिहासिक पेशवे तलाव यंदाच्या पावसात अर्ध्याहून अधिक भरला असून, अधिक पाऊस पडल्यास तो पूर्ण क्षमतेने भरण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. (छायाचित्र - विजयकुमार हरिश्चंद्रे.)

## वारकरी साहित्य परिषदेची जुन्नर येथे बैठक

**मंचर :** वारकरी साहित्य परिषदेची जुन्नर तालुक्यात जिल्हास्तरीय बैठक होणार आहे. संत जनाबाई मुक्ताई महिला हरिपाठ मंडळाच्या राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्याच्या हेतूने बैठकीचे नियोजन करण्यात आले आहे. श्री विठ्ठलाच्या सर्व संतांचे विचार तसेच संत साहित्य समाजातील सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी स्थापन झालेल्या वारकरी साहित्य परिषदेच्या संत जनाबाई मुक्ताई महिला हरिपाठ मंडळाच्या राज्यस्तरीय स्पर्धांचे नियोजनासाठी शनिवारी, दि १९ रोजी श्रीक्षेत्र रेडा समाधी आळे येथे जिल्हास्तरीय बैठक होत आहे. त्यासाठी जिल्ह्यातील सर्व वारकरी बांधवांना निमंत्रण करण्यात येत आहे. जुन्नर तालुका अध्यक्ष हभप गंगाराम महाराज डुंबरे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात येणार आहेत. तसेच या बैठकीसाठी पुणे जिल्ह्यातील वारकरी साहित्य परिषदेचे पुणे संपर्कप्रमुख योगिनी खोत या उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. तसेच जिल्हाध्यक्ष हभप भाऊसाहेब महाराज हांडे व उपाध्यक्ष हभप माऊली महाराज कुंजीर, सचिव हभप तान्हाजी महाराज खराडे तसेच महिला अध्यक्षा हभप सविता गवते व हभप सुमन वाईकर हे उपस्थित राहणार आहेत. मालुश्रीताई पाटील यांच्या संकल्पनेतील संत जनाबाई मुक्ताई महिला हरिपाठ मंडळाच्या राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्याच्या हेतूने बैठकीचे नियोजन करण्यात आलेले आहे.

## धामणीत बिबट्याचा हल्ल्यात शेळी ठार

**लोणी धामणी :** धामणी (ता.आंबेगाव) येथील खंडोबा मंदिर परिसरातील पांगुळठिका या भागात जनावरे चरत असताना बुधवार ( दि.१६) रोजी भरदिवसा दुपारी दीड ते दोनच्या सुमारास बिबट्याने शिवाजी गाढवे यांच्या शेळीवर हल्ला करून शेळी ठार केल्याची घटना घडली आहे. घटनेची माहिती मिळताच तातडीने धामणी वन परिमंडळ विभागाच्या च्या वनपाल नीलम चव्हाण, वनरक्षक अस्मिता शिंदे, दिलीप वाघ, उपसरपंच अक्षयराजे विधाटे, गणेश जाधव, गोविंद वाघ यांनी घटना स्थळी भेट दिली. या हल्ल्यात १ शेळी मृत्युमुखी पडल्याने गाढवे यांचे जवळपास १२ हजाराचे नुकसान झाले आहे. धामणी परिसरात काही महिन्यांपासून बिबट्याचा वावर वाढला आहे. तीन दिवसांपूर्वी हिवरकर मळा येथे शेतकऱ्यांना बिबट्याचे दर्शन झाले असल्याचे गोरक्ष हिवरकर यांनी सांगितले. या परिसरात बिबट्याच्या दहशतीमुळे ग्रामस्थ, शेतकरी, शालेय विद्यार्थी यांच्यामधे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागाने हिवरकर मळा येथे पिंजरा लावला असून पांगुळठिका परिसरात सुद्धा पिंजरा लावण्यात येणार असल्याचे वनपाल चव्हाण यांनी सांगितले.

## वाघिरे महाविद्यालयाच्या वतीने प्लास्टिक संकलन

**ओतूर :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब वाघिरे कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ओतूर येथील शारीरिक शिक्षण आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त गिरीभ्रमण आणि प्लास्टिक संकलन हा विधायक उपक्रम दिनांक १७ जुलै, हडसर किल्ला परिसरात यशस्वीपणे राबविण्यात आला, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. उमेशराज पनेरू, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. राजेंद्र आंबवणे यांनी दिली. सदर अभियानामध्ये एकूण ४९ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन गिरीदुर्ग या प्रकारातील हडसर किल्ल्यावर आणि परिसरातील प्लॅस्टिक कचरा संकलित करून त्याचे योग्य प्रकारे विल्हेवाट लावली. या माध्यमातून विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाचा आणि स्वच्छतेचा संदेश दिला. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भूगोल विभागाचे प्रमुख प्राध्यापक डॉ. ए. टी. पाडवी, मानसशास्त्र प्रमुख प्रा. जितेंद्र घोडके, मराठी विभागप्रमुख डॉ. वसंत गावडे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. नंदकिशोर उगले, डॉ. निलेश काळे, प्रा. स्मिता पोखरकर, प्रा. रत्नमाला मोरे, ज्युनियर विभागातील प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी आदी उपस्थित होते.

## ब्रिगेडी कार्यकर्ते चोख उत्तर देतील



**जेजुरी :** महाराष्ट्र हे शिव -फुले -शाहू आंबेडकर आणि ,संतपरंपरेच्या विचारधारेवर वाटचाल करणारे बहुजन चळवळीचे पुरोगामी राज्य आहे. मात्र, सध्या महामानव व महापुरुषांच्या विचारधारेवर वाटचाल करणाऱ्या नेत्यांना टार्गेट करत त्यांच्यावर हल्ला करण्याचे प्रकार काही वर्षांपासून वाढले आहेत. संभाजी ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेला हल्ला हा पूर्वनियोजित कट होता. हल्ला करणारा समाजकंटक व गुंडप्रवृत्तीचा दीपक काटे आणि त्याच्या मागे सत्तेतील एका मंत्र्यांचा हात असून वेळ येताच ब्रिगेडी कार्यकर्ते याचे चोख उत्तर देतील असा इशारा संभाजी ब्रिगेडचे राज्य संघटक अजयसिंह सावंत यांनी जेजुरी येथील निषेध सभेत दिला. अक्कलकोट येथे प्रवीण गायकवाड यांचेवर शिवधर्म संघटनेचा अध्यक्ष तसेच भाजपाचा कार्यकर्ता असलेल्या दीपक काटे व त्याच्या सहकाऱ्यांनी शाइफेक करत हल्ला केला होता. या घटनेचा निषेध करण्यासाठी गुरुवारी (दि.१७) संभाजी ब्रिगेड जेजुरी शहराच्या वतीने निषेध सभेचे व मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. गायकवाड यांच्यावर झालेला दुर्दैवी हल्ला ही शेवटाची सुरुवात असून त्यांना जशास तसे उत्तर दिले जाईल असा इशारा संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष तथा देवसंस्थानचे माजी अध्यक्ष संदीप जगताप यांनी दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवराज झगडे यांनी केले. कार्यक्रमानंतर पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नंदी चौक मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

# रमेश थोरात भाजपच्या वाटेवर?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** भाजपने पुणे जिल्ह्यात आपली ताकद वाढवायला सुरूवात केली आहे. येत्या काही महिन्यांवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागणार असल्याने आत्तापासूनच भाजपने जोरदार तयारी सुरू केली आहे. काँग्रेसशी एकनिष्ठ असलेले माजी आमदार संग्राम थोपटे यांनी काही महिन्यांपूर्वी भाजपची कास धरली.

नुकताच पुणे जिल्ह्यातील काँग्रेसचं मोठं नाव पुरंदरचे माजी आमदार संजय जगताप यांना गळाला लावण्यात भाजपला यश आलं. त्यांनीही आपल्या हाती कमळ घेतलं आहे. या सगळ्या घडामोडी होत असताना दौंडमधून राजकीय बातमी समोर आली आहे.

भाजप आपली ताकद वाढवत असतानाच आता येत्या काळात दौंडमध्ये मोठा राजकीय भूकंप होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दौंडचे माजी आमदार आणि शरद पवार यांचे विश्वासू रमेश थोरात लवकरच आपल्या हाती 'घड्याळ' बांधणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. त्याअनुषंगाने रमेश थोरात यांच्या कार्यकर्त्यांच्या बैठकादेखील सुरू असल्याची माहिती आहे.

आगामी काळात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजित दादांकडून राष्ट्रवादीची ताकद वाढविण्यावर भर दिला जात असल्याचे दिसत आहे. पुणे जिल्हा परिषद आणि पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या निवडणुका देखील होणार आहेत. याच पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी रमेश थोरात यांना पक्षप्रवेशासाठी आग्रह धरला असल्याच्या चर्चा होत आहेत.

# ॲग्रो डिलर्स असो.ची नवी कार्यकारिणी जाहीर



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**मंचर :** पुणे जिल्ह्यातील खते, बियाणे, किटकनाशके विक्रेत्यांच्या संघटनेची नवी कार्यकारिणी जाहीर झाली असून, जिल्हाध्यक्षपदी मंचर येथील महेश मोरे यांना एकमताने नियुक्त करण्यात आले आहे. कार्याध्यक्षपदी मधूकर भरणे,उपाध्यक्षपदी प्रशांत तुपे व विनोद गांधी,सचीवपदावर संदीप दौंडकर, सहसचिवपदी विठ्ठल पाटील, खजीनदारपदावर आकाश गांधी यांची निवड झाली आहे.

पुणे जिल्हा ॲग्रो डिलर्स असोसिएशनची नवी कार्यकारिणी जाहीर झाली आहे.पुणे जिल्ह्यातील असोसिएशनचा पदभार स्वीकारल्यानंतर महेश मोरे यांनी सांगितले की, ही संघटना कृषी विकासासाठी शेतकरी व कृषी विक्रेत्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी कार्य करते. यासाठी कृषी विक्रेते व शासनाचा कृषी विभाग यामध्ये समन्वयाची भूमिका निभावते. कृषी क्षेत्रातील नवीन बदल व त्याची अंमलबजावणी व कृषी विक्रेत्याना त्यानुसार वेळोवेळी मार्गदर्शन करणे प्रशिक्षण देणे व त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी मागणी व पाठपुरावा करणे तसेच कृषी निविष्ठांचा मागणी पुरवठा यामध्ये सुसुत्रता असणे गरजेचे असते.

त्याचबरोबर गुणवत्तापुर्ण कृषी निविष्ठांबाबत जनजागृती करणे तसेच विनापरवाना घरपोच निविष्ठा विक्रेत्यांची माहिती कृषी विभागाला कळविणे, ऑनलाईन विक्रीमध्ये होणारी शेतकरी व विक्रेत्यांची होणारी फसवणूक थांबविण्यासाठी प्रयत्न करणे. अशी अनेक कृषी हिताची कामे यापुढे सातत्याने संघटनेमार्फत केली जातील. कृषी व व्यापार हित व शेतकरी केंद्रबिंदू मानून येत्या काळात कृषी निविष्ठा विक्रेते व शासन यामध्ये समन्वय साधून अडचणी सोडविण्यासाठी व निविष्ठा विक्रेत्यांच्या न्याय्य हक्कांसाठी असोसिएशन सतत कार्यरत राहिल असे मोरे यांनी सांगितले.

# बारामतीत बँक अधिकाऱ्याची बँकेतच आत्महत्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**बारामती :** वरिष्ठांचा अतिरिक्त दबाव सहन झाल्याने सुसाईड नोट लिहून येथील बँक ऑफ बडोदाच्या मुख्य व्यवस्थापकांनी बँकेतच गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना काल रात्री घडली. शिवशंकर मित्रा असे आत्महत्या केलेल्या मुख्य व्यवस्थापकांची नाव आहे. पहिल्यांदाच अशा प्रकारचे घटना घडल्याने बारामतीत खळबळ उडाली आहे.

शिवशंकर मित्र (वय ५२, रा. प्रयागराज) असे या बँक प्रबंधकाचे नाव असून त्यांनी पाच दिवसापूर्वीच बँकेकडे अतिरिक्त दबाव सहन होत नसल्याने स्वेच्छानिवृत्ती मागितली होती. मात्र बँकेच्या वरिष्ठ स्तरावरून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अखेर रात्री त्यांनी आत्महत्या केली. आत्महत्ये पूर्वी त्यांनी एक चिठ्ठी लिहिली.यामध्ये त्यांनी नमूद केले की, मी शिवशंकर मित्रा, मुख्य प्रबंधक बँक ऑफ बडोदा बारामती, मी आज बँकेच्या अतिरिक्त दबावाच्या कारणामुळे आत्महत्या करत आहे. माझी बँकेकडे विनंती आहे की, कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त दबाव टाकू नका. सर्वांना आपापल्या जबाबदारीची पूर्णपणे जाणीव आहे आणि ते शंभर टक्के आपले योगदान देत असतात.

मी माझी आत्महत्या पूर्णपणे शुद्धीत असताना व स्वतःच्या इच्छेने करत आहे. त्याच्यामध्ये माझ्या कुटुंबाची कोणतीही चूक नाही. कोणालाही जबाबदार धरू नये. मी फक्त बँकेच्या प्रचंड दबावामुळे आत्महत्या करत आहे. पत्नी प्रिया यांना उद्देशून त्यांनी, प्रिया, मला माफ कर. माही मला माफ कर ! असे त्यांनी पत्नी प्रिया आणि मुलगी माही यांना लिहिलेलं आहे.

# जाधववाडीत पुन्हा बंद बंगला फोडण्याचा प्रयत्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पारगाव :** जाधववाडी (ता.आंबेगाव) गावात कृषी सेवा केंद्र व किराणा मालाचे दुकान फोडल्याची घटना ताजी असताना पुन्हा बंद बंगला फोडण्याचा प्रयत्न चोरट्यांनी केला. गुरुवारी (दि. १७) रोजी पहाटे पावणे तीन वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

जाधववाडी, कारफाटा परिसरात भुरट्या चोऱ्यांचे सत्र अद्यापही सुरूच आहे. जाधववाडी येथे बी.के. फर्टीलायझर्स हे कृषी सेवा केंद्र व राज किराणा स्टोअर्स या किराणा मालाचे दुकान फोडून चोरट्यांनी सुमारे दोन लाख रुपयांची शेती पिकांची औषधे व तीन गोड तेलाचे डबे लंपास केल्याची घटना मंगळवारी (दि. १५) पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास घडली होती. त्यानंतर दोन दिवस उलटले. गुरुवारी (दि.१७) पहाटे पावणेतीन वाजता जाधववाडी गावठाणात पोलीस पाटील योगेश जाधव यांच्या घराशेजारी असलेल्या संजय थोरात यांचा बंगला फोडण्याचा प्रयत्न चोरट्यांनी केला.

परंतू शेजारी राहणारे पोलीस पाटील योगेश जाधव व त्यांचे बंधू धनंजय जाधव हे जागे झाले. तेव्हा चोरट्याने तिथून पळ काढला.संजय थोरात हे मुंबई येथे राहतात. ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.




जाधववाडी( ता.आंबेगाव) येथे गावठाणात संजय थोरात यांचा बंगला चोरट्यांनी फोडण्याचा प्रयत्न केला. ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली.

# महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेत चैतन्यचा निकाल १०० टक्के




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ओतूर :** महाराष्ट्र प्रज्ञाशोध एप्रिल २०२५ मध्ये झालेल्या परीक्षेत ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालयाची विद्यार्थीनी तन्वी सुनिल पंडोरे जिल्हास्तरावर नववी मध्ये प्रथम आली. विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला असल्याची माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.

नौरोसजी वाडिया महाविद्यालय,पुणे च्या सर्वोत्कृष्टता केंद्राच्या वतीने महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षा महाराष्ट्र गोवा आणि गुजरात या तीन राज्यांमध्ये आयोजित केली जाते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमधील प्रज्ञेचा शोध घेण्यासाठी ही परीक्षा आयोजित केली जाते. राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेची तयारी म्हणून या परीक्षेकडे पाहिले जाते. राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय विजेत्यांना शिष्यवृत्ती देऊन राष्ट्रीय स्तरावरील प्रथितयश मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गौरव केला जातो.

इयत्ता आठवी, नववी, दहावीच्या महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेत लागला असून, विद्यालयाची इयत्ता नववीची विद्यार्थीनी तन्वी सुनिल पंडोरे हिचा जिल्हास्तरावर इयत्ता नववीच्या गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक आला आहे. संस्कृती दिपक अहिनवे,आदित्य नवनाथ बोरुडे,सलोनी मनोहर वामन,श्रीशा अमित डुंबरे या विद्यार्थ्यांना तालुका प्राईज व स्पेशल प्राईज मिळाले आहे. पलक रामदास डोंगरे, अथर्व विठ्ठल कवटे, अंजली योगेश खेत्री, स्वरा प्रवीण महाले, पार्थ संतोष उकिरडे, आराध्य भाऊसाहेब खाडे, आदिती रविंद्र ढमाले, आराध्य रविंद्र डुंबरे, ओम सचिन डुंबरे, नंदन बापूसाहेब घोलप, शिवानी देवीदास रघतवान, वेदांत यतीन शेटे या विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ प्राईज मिळाले आहे. हे सर्व विद्यार्थी इयत्ता आठवी व नववीतील आहेत.

महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षा जुन्नर तालुक्याचे समन्वयक भाऊसाहेब खाडे, मंगेश तांबे, प्रमोद कुमार जाधव, अनिल जवरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे ग्राम विकास मंडळाचे अध्यक्ष अनिल तांबे, प्रभाकर तांबे, राजेंद्र डुंबरे, प्रदीप गाढवे, पंकज घोलप, रघुनाथ तांबे, मुख्याध्यापिका राजश्री भालेकर, संजय हिरे, अनिल उकिरडे, संतोष सोनवणे, अजित डांगे यांनी अभिनंदन केले आहे.

## बिबट्याच्या हल्ल्यातून महिला बचावली

**मंचर :** दुचाकीस्वराने वेळेचे गांभीर्य राखून तत्परतेने आपली दुचाकी जोरात पळविल्याने दुचाकी वरील महिला बिबट्याच्या जीव घेण्या हल्ल्यातून बचावले आहे, ही लौकी येथे घडली आहे. शोभा दगडू काळे (वय ३७) यांच्यावर बुधवारी रात्री नऊच्या दरम्यान राणूबाई मंदिराजवळ बिबट्याने हल्ला केल्याने त्या किरकोळ जखमी झाल्या आहेत. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार चांडोली येथून लौकी या ठिकाणी दुचाकीवरून मुलगा स्वप्निल काळे,बहिण माधुरी पारधी आणि शोभा काळे हे तिघेजण येत होते. लौकी गावच्या हद्दीतील राणूबाई माता मंदिराजवळील बाळू थोरात यांच्या विहिरीजवळ बिबट्या कुत्र्याला पकडण्याच्या प्रयत्नात होता. त्याचवेळी दुचाकी अचानक आडवी आली असता, दुचाकीवरील शोभा काळे यांच्या पायावर बिबट्याने हल्ला केला. यावेळी मुलगा स्वप्निल काळे यांनी प्रसंगावधान राखून गाडी वेगाने पळवल्याने बिबट्याच्या तावडीतून त्यांची सुटका झाली. लौकी या ठिकाणी गावात हॉटेलवर स्वप्निल काळे व त्यांचे कुटुंबीय गेले असता त्यांनी हल्ला झाल्याची घटना सांगितली. वनसेवक जालिंदर थोरात यांनी रेस्क्यू टीमला फोन करून बोलावले यावेळी रेस्क्यू टीम बरोबर जालिंदर थोरात,मंगेश औटी हे शोभा काळे यांना घेऊन मंचर उपजिल्हा रुग्णालय या ठिकाणी दाखल झाले. या ठिकाणी वनअधिकारी विकास भोसले व वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी भेट देऊन पाहणी केली. लौकी येथे बिबट्याचे वारंवार हल्ले होत असल्याने ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.या ठिकाणी बिबट्याला जेरबंद करण्यासाठी वन विभागाने पिंजरा लावावा.अशी मागणी लौकी ग्रामस्थांनी केली आहे.

## प्रकाश पवार यांचा पुरस्काराने सन्मान



**खेड :** गेले ५० वर्षांपासून महाराष्ट्राच्या कबड्डी क्षेत्रामध्ये विविध भूमिकेत कार्यरत असलेले प्रकाश पवार यांचा कबड्डी दिनानिमित्त सोमवारी (दि. १५) कबड्डी क्षेत्रातील 'ज्येष्ठ कार्यकर्ता' हा मानाचा राज्य पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. खेड तालुक्यातील महाराणा प्रताप क्रीडा मंडळ व राजगुरुनगर येथील साहेबराव सातकर प्रतिष्ठानचे सचिव प्रकाश पवार यांच्या कबड्डी क्षेत्रातील बहुमोल योगदानाची महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनने दखल घेतली . पोयनाड , जिल्हा अलिबाग येथे झालेल्या या कार्यक्रमात राज्य कबड्डी संघटनेचे कार्याध्यक्ष माजी खासदार गजानन कीर्तीकर, सचिव बाबूराव चांदेरे यांच्या हस्ते प्रकाश पवार यांचा गौरव करण्यात आला. राज्य कबड्डी संघटनेचे खजिनदार मंगल पांडे, माजी सचिव आस्वाद पाटील, अर्जुन पुरस्कार विजेत्या शकुंतला खटावकर, रायगड जिल्हा असोसिएशनच्या सचिव चित्रा पाटील यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. प्रकाश पवार गेली ५० वर्षांपासून कबड्डी क्षेत्रात खेळाडू, पंच, पंचप्रमुख, प्रशिक्षक व कबड्डी संघाची स्थापना करण्यासाठी मार्गदर्शकाची भूमिका पार पाडत आहेत. याचबरोबर ते क्रीडा व सहकार क्षेत्रात राज्य स्तरावर अधिकारी ,प्रशिक्षक,पदाधिकारी म्हणून गेल्या ४५ वर्षांपासून कार्यरत आहेत. त्यांच्या या बहुआयामी कार्याची दखल घेत राज्य कबड्डी असोसिएशनने या वर्षीच्या ज्येष्ठ कार्यकर्ता पुरस्कारासाठी त्यांची निवड केली. सन्मानचिन्ह प्रदान करून त्यांच्या कार्याचा गौरव केला.

## बिबट्याच्या हल्ल्यात कालवडीचा मृत्यू



**मंचर :** पापळवाडी येथील सखाराम विठोबा दरेकर यांच्या शेतातील गोठ्यावर जनावरे बांधलेली होती. त्यामध्ये मध्यरात्री बिबट्याने दीड वर्षाच्या कालवडीवर हल्ला करून गोठ्याच्या बाजूला नेऊन तिला ठार केले. कालवडीचा मृत्यू झाल्याने शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्याचे नुकसान झाले असून शासनाकडून तातडीने मदत मिळण्यासाठी राष्ट्रवादी युवक अध्यक्ष जयसिंग दरेकर यांनी वनविभागाशी संपर्क साधला असता, वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष कंक, चाकण यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाच्या वनरक्षक एस. पी शिंदे यांनी तातडीने पंचनामा केला. बिबट्याचा वावर जास्त प्रमाणात वाढल्याने परिसरामध्ये पिंजरे बसविण्याची मागणी वनविभागाकडे जयसिंग दरेकर यांनी केलेली आहे.

## श्री मार्तंड देवसंस्थान समिती



**पुरंदर** श्री मार्तंड देवसंस्थान समिती प्रमुख विश्वस्त पदावर जेजुरी येथील रहिवासी असलेले मंगेश अशोकराव घोणे यांची एकमताने निवड करण्यात आली. महाराष्ट्राचे कुलदैवत खंडेरायाच्या मंदिर, गडकोट व धार्मिक जत्रा यात्रा उत्सवांचे नियोजन व व्यवस्थापन पाहण्याचे काम ही समिती करते. देवसंस्थान समितीच्या प्रमुख विश्वस्त पदावर मंगेश अशोकराव घोणे यांची एकमताने निवड करण्यात आली. मावळते प्रमुख विश्वस्त अभिजित देवकाते, विश्वस्त अनिल सौन्दडे, पोपटराव खोमणे, पांडुरंग थोरवे, विश्वास पानसे, डॉ. राजेंद्र खेडेकर आदी उपस्थित होते. निवडीनंतर मंगेश घोणे यांची भंडारा उधळून मिरवणूक काढत स्वागत करण्यात आले.

# आंबेगाव तालुक्यात हजारो शेतकरी भरपाईच्या प्रतीक्षेत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**अवसरी :** आंबेगाव तालुक्यात मान्सूनपूर्व मुसळधार पावसाने झालेल्या नुकसानभरपाईची रक्कम दोन महिने उलटून गेले तरीही खात्यात जमा झाले नसल्याने हजारो शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे. तालुक्यात मे आणि जून महिन्यात पावसाने ९५ गावांमधील ४ हजार ७०३ शेतकरी बाधित झाले असून, १३१३.४४ हेक्टर क्षेत्रातील पिकांचे अतोनात नुकसान झाले होते.



राज्य शासनाकडे ३ कोटी ६३ लाख ९७० रुपयांची नुकसान भरपाईची मागणी केली आहे, अशी माहिती तालुका कृषी अधिकारी कार्यालयातून देण्यात आली.

राज्य शासनाच्या आदेशानुसार मे महिन्यात आंबेगाव तालुक्याच्या लोणी, कुरवंडी, चास, नारोडी, लौकी, चांडोली, गिरवली, टाकेवाडी या भागात ढगफुटीसदृश पाऊस झाला होता. यामुळे बाजरी, भुईमूग, पालेभाज्यावर्गीय पिके ज्यामध्ये कोथिंबीर, शेपू, टोमॅटो, फ्लॉवर या पिकांचे अतोनात नुकसान झाले होते.

काढणीयोग्य असलेली बाजरी काळी पडली. सरमाड वैरण जाग्यावरच सडून गेली. कणसे भिजल्याने त्याला चौरे (मोड) फुटले. संपूर्ण बाजरीचे पीक भुईसपाट झाले होते.

सध्या पावसाने उसंत घेतल्याने शेतात वाफसा झाला आहे. उर्वरित पेरण्या करण्यात शेतकरी मग्न आहे तर अतिपावसामुळे वाया गेलेल्या पिकाच्या ठिकाणी दुबार पेरणी करण्याचे संकट शेतकऱ्यांपुढे उभे आहे.

राज्य शासनाच्या आदेशानुसार तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना महसूल विभागाचे तहसीलदार यांनी गावागावांतील तलाठी, कृषी सहाय्यक ग्रामसेवक यांना लेखी स्वरूपात दिल्या होत्या. त्यानुसार प्रत्यक्ष बांधावर जात वस्तुनिष्ठ पंचनामे करण्यात आले. सुमारे ३ कोटी ६२ लाख ९७० रुपयाचे नुकसानभरपाईच्या प्रतीक्षेत तालुक्यातील शेतकरी आहेत.

या भरपाईमध्ये फळबागा, जिरायत पिके व बागायत पिके अशी वर्गवारी करण्यात आली आहे. फळबागांना हेक्टरी २२ हजार ५०० रुपये तर बागायत पिकांना हेक्टरी १७ हजार रुपये व जिरायत पिकांना हेक्टरी ८ हजार ५०० रुपये नुकसानभरपाई देण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्याचे समजते.

## श्री मूर्ती घडवण्याची धावपळ सुरू



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मंचर :** गणेश उत्सव सोहळा जवळच असल्याने गावोगावच्या मूर्ती कारागिरांची मुर्त्या घडवून रंगविण्याची धावपळ सुरू झाले असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे. यंदाच्या गणेशोत्सवासाठी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मोठ्या बसविण्यासाठी उशिरा परवानगी मिळाल्याने मंडळांना मोठ्या मूर्ती मिळविण्यासाठी धावपळ करावी लागत असल्याचे चित्र दिसत आहे.

गणेश उत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला असल्याने कारागीर मुर्त्या घडवून रंग-रंगोटीच्या अंतिम टप्प्यात काम आलेले दिसत आहे, यंदाच्या वर्षी गणेश भक्तांची ड्रेपरी असणाऱ्या मुर्त्यांना मागणी वाढल्याने मूर्तिकारांचे काम वाढले असले तरी मागील तीन महिन्यापासून सततच्या पावसाने मूर्ती वाळण्यास उशीर होत आहे, त्यामुळे मुर्त्या तयार असून वाळण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला नसल्याने कारागीर मंडळी धास्तावले आहेत.

यंदा शासनाने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मुर्त्यांना परवानगी दिली असल्यामुळे तसेच मोठ्या मुर्त्यांना देखील परवानगी उशिरा मिळाली असल्याने कारागिरांकडे मोठ्या मुर्त्या उपलब्ध होण्यास वेळ लागत आहे, त्यामुळे मंडळांना मोठ्या मुर्त्या मिळवण्यासाठी धावपळ करावी लागत आहे. असे श्रीधर राजगुरू यांनी सांगितले.

## वाफगाव येथील वस्तीगृहातील आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वरची ठाकरवाडी व वाफगाव येथील वस्तीगृहातील आदिवासी, गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वर्षभर पुरेल इतके शैक्षणिक साहित्य तसेच दप्तर व शाळेत विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी आधूनीक शुभ्र व हिरव्या वर्गफलकांचे वाटप केले.

गरीब, गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना शैक्षणिक सुविधा कमी पडू नयेत व या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून आस्ताना ई कलंदर ट्रस्टचे अध्यक्ष दत्तात्रय गुंजाळ तसेच ट्रस्टचे विश्वस्त सुनील मांदळे यांच्या माध्यमातून आवश्यक शैक्षणिक साहित्य शाळेसाठी मिळाले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वरची ठाकरवाडी येथील शाळेतील विद्यार्थ्यांना तसेच वाफगाव विद्यालयाच्या वस्तीगृहात असणाऱ्या मुलांना शैक्षणिक शालेय वस्तू भेट दिल्या. यामध्ये वह्या ,चित्रकला वह्या, चित्रकला पेन्सिल, पेनसंच, पेन्सिल स्केल तसेच शालेय बॅगचे वाटप करण्यात आले. शाळेसाठी देण्यात आलेल्या साहित्यासाठी आशा नाईक तसेच पुण्याच्या सिम्बॉयसिस कॉलेजचे प्राचार्य अनुराग महाजन यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले.

शाळेचे मुख्याध्यापक वल्लभ क्षीरसागर यांनी आस्ताना ई कलंदर ट्रस्ट कोथरूड पुणे यांच्या माध्यमातून शाळेसाठी कपाट, प्रिंटर, चटई, शालेय बॅग, वॉटर बॅग तसेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी साऊंड सिस्टिम(ट्रॉली ॲम्प्लिफायर) अशा अनेक सुविधा शाळेसाठी उपलब्ध करून दिल्यामुळे शाळेचा भौतिक व सर्वांगीण विकास होण्यासाठी ट्रस्टचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले आहे, असे सांगितले.

वसतिगृहातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्यासाठी म. य. होळकर विद्यालयाचे तत्कालीन शिक्षक सुनील घुमटकर व मेहमूद मुलाणी यांचेदेखील मदत केली. यावेळी जिल्हा परिषद सदस्य दादाभाऊ पारधी, माजी ग्रामपंचायत सदस्य सुरेश मेंगडे, कैलास सुर्वे, विजय सांडभोर तसेच कृषी अधिकारी बाळासाहेब मांदळे, शाळेचे शिक्षक रामचंद्र येवले, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दत्तात्रय खंडागळे तसेच पालक उपस्थित होते.



वाफगांव (ता.खेड) येथे आस्ताना ई कलदंर ट्रस्टच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देण्यात आले. (छायाचित्र : सिद्धेश कर्नावट, राजगुरूनगर )

# आंबेगावात गट-गणांच्या संख्येत मोठे फेरबदल




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मंचर :** आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी आंबेगाव तालुक्यातील जिल्हा परिषद गट आणि गणांची संख्या पूर्ववत झाली आहे. नगरपंचायत झाल्याने मोठ्या संख्येचे मंचर शहर बाहेर पडले आहे. त्यामुळे पूर्वीच्या गट आणि गण रचनेत मोठे फेरबदल झाले आहेत. त्यामुळे इच्छुकांची डोळे आरक्षण सोडतीकडे लागले आहेत.

आंबेगाव तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या पाच गटांची आणि पंचायत समितीच्या दहा गणांची प्रारूप प्रभाग रचना सोमवारी (ता. १४) जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी जाहीर केली. या प्रभाग रचनेवर सोमवार (ता. २१) पर्यत हरकती नोंदविता येणार आहे. नागरिकांच्या माहितीसाठी ही प्रभाग रचना तहसीलदार कार्यालयातील सूचना फलकावर लावण्यात आली आहे. तालुक्यात मंचर येथे नगरपंचायत अस्तित्वात आल्याने मंचर शहर बाहेर पडले आहे. त्यामुळे पूर्वीच्या गट आणि गण रचनेत मोठे फेरबदल झाले आहेत. काही जणांच्या फायद्याचे तर काहींच्या तोट्याचे झाले आहेत. त्यामुळे इच्छुकांचे डोळे आरक्षण सोडतीकडे लागले आहेत.

जिल्हा परिषदेचे गट, पंचायत समितीचे गण व त्यातील समाविष्ट गावे पुढील प्रमाणे : शिनोली गट, बोरघर पंचायत समिती गण : आहुपे, पिंपरगणे, आघाणे, तिरपाड, डोण, न्हावेड, नानवडे, पाटण, पिंपरी, साकेरी, महाळुंगे तर्फे आंबेगाव, आसाणे, मेंनुबरवाडी, माळीण, आमडे, कुशिरे बुद्रुक, कुशिरे खुर्द, दिगद, मेघोली, कोंढरे, पंचाळे बुद्रुक, पंचाळे खुर्द, अडिवरे, वचपे, बोरघर, आंबेगाव, वरसावणे, फुलवडे, महाळुंगे तर्फे घोडा, कानसे, सुपेधर, चपटेवाडी, गंगापूर बुद्रुक, गंगापूर खुर्द, आपटी, आमोंडी, फलकेवाडी, शिनोली पंचायत समिती गण : शिनोली, फदालेवाडी/उगलेवाडी, पिंपळगाव तर्फे घोडा, पोखरकरवाडी, डिंभे खुर्द, मापोली, गोहे खुर्द, गोहे बुद्रुक, डिंभे बुद्रुक, कोलतावडे, कळंबई, राजेवाडी, पोखरी, चिखली, जांभोरी, नांदूरकीचीवाडी, तळेघर, फलोदे, सावरली, राजपूर, गाडेवाडी, कोंढवळ, निगडाळे, तेरुंगण,

घोडेगाव गट, घोडेगाव पंचायत समिती गण : घोडेगाव, आंबेगाव गावठाण, कोलदरा-गोनवडी, धोंडमाळ-शिंदेवाडी, चिंचोली, नारोडी, गिरवली, रामवाडी, काळेवाडी-दरेकरवाडी, गवारवाडी, ढाकाळे, आंबेदरा, साल, तळेकरवाडी, पेठ पंचायत समिती गण : पेठ, श्रीरामनगर, कारेगाव, भावडी, थुगाव, कोल्हारवाडी, कुरवंडी, चिंचोडी, शेवाळवाडी-लांडेवाडी, पिंगळवाडी-लांडेवाडी, कोळवाडी-कोटमदरा.

कळंब गट, कळंब पंचायत समिती गण : ठाकरवाडी, चास, कडेवाडी, महाळुंगे पडवळ, माळवाडी, ठाकरवाडी, विठ्ठलवाडी, टाकेवाडी, साकोरे, नांदूर, लौकी, कळंब, चांडोली बुद्रुक पंचायत समिती गण : चांडोली बुद्रुक, खडकी, भराडी, थोरांदळे, नागापूर, जाधववाडी, रांजणी, वळती, भागडी.

पारगाव तर्फे अवसरी बुद्रुक गट, पारगाव तर्फे अवसरी बुद्रुक पंचायत समिती गण : शिंगवे, निरगुडसर, मेंगडेवाडी, जवळे, पारगाव तर्फे अवसरी बुद्रुक, काठापूर बुद्रुक, जारकरवाडी पंचायत समिती गण : पोदेवाडी, लोणी, वाळूंजनगर, खडकवाडी, लाखणगाव, देवगाव, जारकरवाडी, रानमळा, वडगावपीर, मांदळेवाडी, शिरदाळे, धामणी, पहाडदरा.

अवसरी बुद्रुक गट, पिंपळगाव तर्फे महाळुंगे पंचायत समिती गण : वडगाव काशिंबेग, वाळूंजवाडी, एकलहरे, सुलतानपूर, तांबडेमळा, शेवाळवाडी, निघोटवाडी, पिंपळगाव तर्फे महाळुंगे, टाव्हरेवाडी, चांडोली खुर्द, अवसरी बुद्रुक पंचायत समिती गण : अवसरी खुर्द, खडकमळा, शिंदेमळा, भोरवाडी, वायाळमळा, पारगाव तर्फे खेड, अवसरी बुद्रुक, गावडेवाडी.

# भन्नाट वेगाचा अनोखा विक्रम

**अचिव्हर**

काही लोकांमध्ये अद्भूत प्रतिभा असते. या टॅलेंटमुळे ते केवळ आपल्या शहरातच नाही तर संपूर्ण जगात प्रसिद्धी मिळवतात. सध्या सोशल मीडियावर असाच एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. यामध्ये एका व्यक्तीने आपली क्षमता दाखवून विश्वविक्रम केला आहे. हैदराबादमध्ये राहणाऱ्या एस.के.अश्रफ नामक युवकाने हा अनोखा विक्रम रचून लोकांचे लक्ष वेधून घेतले आहे. त्याने संगणकावर इंग्रजी अक्षरे उलटे टाईप केली आहेत आणि हे काम अवघ्या २.८८ सेकंदात केले आहे. एका व्यक्तीने इतक्या कमी काळात शब्द टाइप करण्याचा हा विश्वविक्रम आहे.

गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सने आपल्या इंस्टाग्रामवर या व्यक्तीचा व्हिडिओ शेअर केला आहे. ती व्यक्ती किती पटकन लिहित आहे, हे तुम्हीही व्हिडिओमध्ये बघू शकता. व्हिडिओ डेस्कटॉप स्क्रीनने सुरू होतो आणि क्लिप पुढे जाते तसतशी ती व्यक्ती पटकन शब्द टाइप करत असल्याचे दिसून येते. त्याने झेड ते ए मधून इंग्रजी अक्षरे अवघ्या काही सेकंदात टाईप केली आहेत.

पापणी लवते ना लवते तोच त्या व्यक्तीने इंग्रजी वर्णमाला लिहिली.

हा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत असल्यामुळे तो पाहिल्यानंतर लोक त्याचे कौतुक करताना दिसत आहेत.



आतापर्यंत एक दशलक्षाहून अधिक लोकांनी पाहिले आहे. हा विक्रम पाहून अनेकांना या व्यक्तीने प्रभावित केले आहे, तर काही लोकांनी आपण हा विक्रम मोडणार असल्याचा दावा केला आहे.

गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड्सने या व्यक्तीचे कौतुक केले आणि सांगितले की, त्याने विक्रम करण्याची ही पहिलीच वेळ नाही. एसके अश्रफ असे या व्यक्तीचे नाव असून त्याने हा विक्रम ५ फेब्रुवारी २०२४ रोजी केला होता. हा त्याचा पहिला विश्वविक्रम नसला तरी याआधीही त्याने सर्वात जलद वेळेत वर्णमाला टायपिंग करण्याचा मान मिळवून यादीत स्थान मिळवले होते. त्यामुळे एस.के.अश्रफचे कौतुक व्हायलाच हवे.

## शेर की जुबानी

धडकने लगे दिल की तारों की दुनिया
जब तुम मुस्कुरा दो,
संवर जाए हम बेकरारों की दुनिया
जब तुम मुस्कुरा दो।

खामोश सा शहर और
गुफ्तगू की आरजू,
हम किससे करे बात
कोई बोलता ही नहीं।

उनकी चाहत में हम
कुछ यूं बंधे हैं।
वो साथ भी नहीं,
हम अकेले भी नहीं।

## सोशल मीडिया

### हा जुगाड धोक्याचा



भारतामध्ये जुगाड ही एक सामान्य गोष्ट आहे. बरेच लोक काम पूर्ण करण्यासाठी लहान-मोठे जुगाड करतात. फोन कव्हरमध्ये नोट्स किंवा कार्ड्स ठेवणे देखील याचाच एक भाग आहे. काहींना नोटा, नाणी आणि चाव्या मोबाईल कव्हरच्या मागे ठेवण्याची सवय असते. पण असा जुगाड आपल्या जीवालाही धोकादायक ठरू शकतो. यामुळे फोनला आग लागणे किंवा स्फोट होण्याचा मोठा धोका असतो. म्हणूनच ही सवय असल्यास त्वरित बदलणे गरजेचे आहे.

# लज्जतदार क्रिस्पी कॉर्न

**झटपट रेसिपी**

दोस्तांनो, येता-जाता तोंडात टाकण्यासाठी काही तरी लागतं. संध्याकाळी एखादा कुरकुरीत खमंग पदार्थ चहाची लज्जत वाढवतो. अशा वेळी तुम्ही झटपट तयार होणारे क्रिस्पी कॉर्न बनवू शकता.

**सामग्री:** पाणी, एक कप कॉर्न, लाल तिखट, प्रत्येकी एक चमचा जिरे पूड, अर्धा चमचा चाट मसाला, मीठ, दोन ते तीन चमचे कॉर्न फ्लोर, तेल, चिरलेला कांदा आणि कोथिंबिर

**कृती:** एका भांड्यात पाणी उकळून घ्या. त्यात कॉर्न घालून पाच मिनिटे शिजवून घ्या. पाणी काढून कॉर्न थंड करायला ठेवा. थंड झाल्यावर कॉर्नमध्ये कॉर्न फ्लोर आणि मीठ घाला. नीट मिक्स करून घ्या. आता कढईत तेल तापवा. तेल गरम झाल्यावर त्यात कॉर्न घाला. सोनेरी रंगावर तळून घ्या. भांड्यात काढून घ्या. दुसऱ्या भांड्यात



लाल तिखट, जिरेपूड, चाट मसाला आणि थोडं मीठ एकत्र करा. तळलेल्या कॉर्नवर आपल्या चवीनुसार हा मसाला घाला. त्यावर चिरलेला कांदा आणि कोथिंबिर घालून हलवून घ्या. थोडं लिंबू पिळा.

## स्मार्ट टिप्स

### शोधा ई मेलचं लोकेशन

तुम्हाला बरेच मेल्स येत असतील. काही वेळा एखादी मेल कोणत्या ई मेल आयडीवरून आली ते आपल्याला कळत नाही. हे जाणून घेण्यासाठी काही टिप्स आहेत. ई मेलचं लोकेशन जाणून घेण्यासाठी सर्वात आधी तुमचा जी मेल ओपन करा. उजव्या बाजूला तीन डॉट्स दिसतील. त्यावर क्लिक करा. त्यानंतर शो ओरिजनल या पर्यायाची निवड करा. यानंतर तुमच्या स्क्रीनवर नवी विंडो ओपन होईल. इथे तुम्हाला मेलचा आयपी अ‍ॅड्रेस मिळेल. इथे तुम्हाला मेलचं लोकेशन कळेल.



# वर्क प्लस वेकेशन

**भटकंती**

मित्रांनो, आता विश्व हे एक खेडे झाले आहे. तुमच्याकडे लॅपटॉप आणि इंटरनेट असेल तर जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातून काम करता येतं. सहाजिकच आता कार्यस्थळी जाऊन काम करण्याचे कोणतेही बंध उरलेले नाही. मात्र सिमेंटच्या जंगलात, घराच्या चार भिंतीत बसून काम करणं कंटाळवाणं होतं. हेच लक्षात घेऊन पर्यटन क्षेत्रानेही नामी संकल्पना शोधून काढली. निसर्गाच्या सानिध्यात रमून काम करण्याची ही संकल्पना आता चांगलीच लोकप्रिय ठरली आहे. देशातली अनेक राज्यं अशा पद्धतीने पर्यटकांना आकर्षित करण्याच्या प्रयत्नात आहेत. वर्क प्लस वेकेशन म्हणजे वर्केशन ही संकल्पना आता चांगलीच फोफावली आहे.

* निसर्गरम्य हिमाचल प्रदेशातली अनेक ठिकाणं वर्क फ्रॉम होम करणाऱ्यांना खुणावत आहेत. मनाली हे सुद्धा असंच एक ठिकाण. नेहमी पर्यटकांनी गजबजलेलं मनाली वर्षातील काही काळ सुनंसुनं असतं. त्यामुळे त्या काळात जाऊन काम आणि निवांतपणा या दोन्ही गोष्टी साध्य करता येतील. काही दिवस मनालीला जायला हरकत नाही.
* काम करताना काचेच्या भिंतींआड दिसणाऱ्या सिमेंटच्या भिंतींऐवजी हिमालयाची बर्फाच्छादित शिखरं बघायला मिळाली तर... यासाठी तुम्हाला हृषीकेशला जायला हवं. इथल्या थंड आणि रम्य वातावरणात तुम्ही रमून जाल. काम करतानाही ताजंतवानं वाटेल.
* राजस्थानमधलं एकमेव थंड हवेचं ठिकाण म्हणजे माउंट अबू. इथल्या हॉटेल्समध्ये राहूनही निवांत काम करता येईल. शिवाय आसपासचा निसर्गही अनुभवता येईल.
* गोवा हे खरं तर हॉट डेस्टिनेशन. अथांग पसरलेला समुद्र बघत काम करण्याचा आनंद निराळाच. कंटाळा आल्यावर इथल्या नागमोडी रस्त्यांवरून भटकंती करू शकता. बाईकही चालवू शकता.
* लोणावळा हाही खूप चांगला पर्याय आहे. खासकरून पावसाळ्यात लोणावळ्याला जाता येईल. इथले धबधवे, थंड वातावरण तुम्हाला ताजंतवानं करून जाईल.



# खासम खास 'वाह सोमवार'

**फॅशन पॅशन**

'काउंसिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च' (सीएसआयआर) ने 'रिंकल्स आर गूड' या अनोख्या उपक्रमात आपल्या कर्मचाऱ्यांना दर सोमवारी इस्त्री न केलेले कपडे घालण्यास सांगितले आहे. यामुळे सुमारे १,२५,००० किलो कार्बन उत्सर्जनाची बचत होत असल्याचा कंपनीचा दावा आहे. तथापि, सीएसआयआरने स्पष्ट केले की, त्यांच्या मुख्यालयाने प्रयोगशाळांना कोणतेही परिपत्रक किंवा आदेश जारी केलेले नाहीत ज्यात कर्मचाऱ्यांना इस्त्री केलेले कपडे घालणे टाळण्यास सांगितले आहे.


अलिकडेच कंपनीच्या मुख्यालयात हवामानाचे घड्याळ बसवल्यानंतर एका प्राध्यापक महोदयांनी असे विचार मांडले होते. ऊर्जा वाचवणे, पर्यावरणाचे रक्षण करणे आणि हवामान बदलाबाबत जागरूकता पसरवणे, यासंबंधी बोलताना ते म्हणाले की, आपण एक दिवस इस्त्रीचा वापर कमी केला तरी ऊर्जेची मोठ्या प्रमाणावर बचत होऊ शकते. तसेही 'काहीही न करणे' हा हवामान बदलातील धोके कमी करण्याचा सर्वात सोपा उपाय असल्याचे अनेक तज्ज्ञ सांगतात. या पार्श्वभूमीवर 'रिंकल्स आर गुड' मोहिमेला चांगलाच वेग बघायला मिळणे दखलपात्र आहे. यामध्ये लोकांना सोमवारी विना इस्त्री केलेले कपडे घालण्यास सांगितले जात आहेत. कपड्यांच्या जोडीला इस्त्री न केल्यास २०० ग्रॅमपर्यंत कार्बन उत्सर्जन टाळता येईल. असे असताना लाखो लोकांनी हाच ट्रेंड फॉलो केला तर आपण मोठ्या प्रमाणात कार्बन उत्सर्जन वाचवू शकतो. काही काळातच हा एक चांगला ट्रेंड बनू शकेल. सध्या दर सोमवारी ६,२५,००० लोक या उपक्रमात सहभागी होत आहेत. यायोगे ते कार्बन उत्सर्जन टाळत आहेत. तज्ज्ञांना आशा आहे की, या वर्षाच्या अखेरीस एक कोटीहून अधिक लोक या 'वाह सोमवार'च्या मोहिमेत सामील होतील. सीएसआयआर आपल्या सर्व प्रयोगशाळांमध्ये वीज वापर १० टक्क्यांनी कमी करण्याची योजना आखत आहे. या इमारतीच्या शीर्षस्थानी भारतातील सर्वात मोठे हवामान घड्याळ स्थापित केले असून हवामान बदल आणि त्याचे दुष्परिणाम याबद्दल जागरूकता पसरवण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे.



## स्मार्ट ट्रिक्स

### सावध राहणे गरजेचे

डिजिटल युगात, घोटाळेबाज दररोज फसवणूक करण्याच्या नवनवीन पद्धती अवलंबत आहेत. नुकतेच एका सीबीआय अधिकाऱ्याशी संबंधित एक प्रकरण समोर आले आहे. घोटाळेबाजांनी त्या अधिकाऱ्याला दिल्ली क्राइम ब्रँचचा अधिकारी म्हणून फोन केला आणि कॉलमध्येच त्या अधिकाऱ्याचे दोन लाख रुपये गमावले. काही घोटाळेबाज धमकी देतो की त्यांच्या नावावर काही चुकीचे काम केले आहे. हे ऐकून कॉल उचलणाऱ्या व्यक्तीला कदाचित अटक होईल अशी भीती वाटते आणि मागण्या मान्य होतात. मात्र अशा फेक कॉल्सपासून सावध राहणे गरजेचे आहे.



## ॲप वर्ल्ड

### सीसीटीव्ही कॅमेरा बसवताय?

सुरक्षेच्या दृष्टीने सध्या सीसीटीव्ही कॅमेरा बसवून घेतला जातो. तुम्हालाही घरात येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांवर नजर ठेवायची असेल, तर मुख्य गेटच्या प्रवेशद्वाराजवळ काटकोनात कॅमेरा लावा. कॅमेरा बाहेरून येणाऱ्या व्यक्तीचा चेहरा दिसेल अशा कोनात ठेवावा. हॉलमध्ये कॅमेरे लावले असतील तर गोपनीयतेची विशेष काळजी घ्या. अनेक प्रसंगांमध्ये, घराच्या हॉलमध्ये असे काही खाजगी क्षण कॅमेऱ्यात कैद केले जातात, जे कोणत्याही परिस्थितीत लीक होऊ शकत नाहीत. सीसीटीव्ही कॅमेरे लावत असाल तर वॉशरूमचीही काळजी घ्या. बेडरूममध्ये कॅमेराचा कोन प्रवेशद्वाराकडे ठेवा.



# बिनधास्त करा सायकलिंग

**फिटनेस फंडा**

दोस्तांनो, सायकलिंग हा उत्तम व्यायामप्रकार आहे. जीममध्ये जायला आवडत नसेल वा वेळा जुळत नसतील तर चालणं किंवा पळण्यासारखे व्यायाम करता येतात. त्यातही तुमच्याकडे सायकल असेल तर अजून जास्त मजा येऊ शकते. फिटनेस टिकवून ठेवण्यासाठी सायकलिंग करता येईल. अर्थात नेमकं किती वेळ सायकलिंग करायचं, सायकलिंगही नेमकी पद्धत कोणती हे ही जाणून घ्यायला हवं.

* सर्वात आधी तुमचं उद्दिष्ट ठरवा. फिट राहण्यासाठी सायकल चालवायची असेल तर फार अंतर कापण्याची आवश्यकता नाही. मात्र नियमितता असायला हवी.
* १८ ते ६४ या वयोगटातील लोकांनी फिट राहण्यासाठी दर आठवड्याला साधारण अडीच तास मध्यम स्वरूपाचा व्यायाम करायला हवा. पण तुम्ही सायकलिंग करता असाल तर दिवसाला साधारण ३० ते ४५ मिनिटं सायकल चालवायला हवी.
* फिटनेससाठी सायकल चालवणार असाल तर दररोज साधारण तासभर सायकल चालवा. मंद गतीने सायकल चालवा. यामुळे तुम्ही दीर्घ, लयबद्ध आणि नियमित श्वास घेऊ शकाल. अशावेळी शक्यतो सपाट रस्त्यावरून सायकल चालवा. सायकल चालवण्यावर लक्ष केंद्रित करा. अधूनमधून पाणी पिण्यासाठी किंवा खाण्यासाठी ब्रेक घ्या.
* शक्य असेल तर ३० ते ६० मिनिटं चढण असणाऱ्या रस्त्यावरून सायकल चालवा. सुरूवातीला दहा मिनिटं सर्वसाधारण वेगात सायकल चालवा. त्यानंतर पाच मिनिटं वेग वाढवा. या स्थितीत तुम्हाला दीर्घ श्वास घेता यायला हवा. तसंच एक किंवा दोन शब्दच बोलता यायला हवेत. मिनिटभर थांबा आणि पुन्हा सुरू करा. त्यानंतर साधारण २० मिनिटं वेगात सायकल चालवा.
* जास्त कॅलरी खर्च करण्यासाठी तसंच हृदयाला अधिक सक्षम करण्यासाठी वेगात सायकल चालवायला हवी. साधारण ३० ते ६० मिनिटं सायकल चालवा. दरम्याच्या काळात तुम्हाला वेगात सायकल चालवायची असली तरी कमी अंतर कापायचं आहे. सुरूवातीला दहा मिनिटं वॉर्म अप करा. मग पाच मिनिटं वेगात सायकल चालवा. मग तीस सेकंद आराम करा. अशा पद्धतीने सायकल चालवत रहा.



# गारमेंट टेक्नॉलॉजीचं क्रिएटिव्ह क्षेत्र

**वेगळ्या वाटा**



काहीतरी क्रिएटिव्ह करायचं असेल तर तुम्ही गारमेंट टेक्नॉलॉजीचा विचार करू शकता. गारमेंट टेक्नॉलॉजी हे कपड्यांशी संबंधित क्षेत्र आहे, हे नावावरूनच आपल्या लक्षात येतं. कपडे उत्पादनाशी संबंधित विविध तांत्रिक पैलू यात हाताळले जातात. फॅशन डिझायनर ड्रेस डिझाइन करतो तर गारमेंट टेक्नॉलॉजिस्ट या डिझाइनची उपयुक्तता ठरवतो. ड्रेस डिझाइनिंगची सर्वोत्तम पद्धत निवडण्यासोबतच त्यात बदल करण्याचं कामही त्याच्याकडे असतं. यासोबतच कपडा तयार करण्याचं तंत्रज्ञान, मटेरियल कॉम्बिनेशन तसंच त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मटेरियलची निवडही गारमेंट टेक्नॉलॉजिस्टलाच करावी लागते. आवश्यकता भासेल तिथे ही मंडळी फॅशन डिझायनरला सल्लाही देतात. कपड्याच्या निर्मिती खर्चावरही त्याला लक्ष ठेवावं लागतं. एकंदरित गारमेंट टेक्नॉलॉजिस्टचं काम जबाबदारीचं असतं.

गारमेंट टेक्नॉलॉजीची पदवी घेतल्यानंतर तुम्ही फॅशन हाउस किंवा टेक्सटाईल फॅक्टरीमध्ये टेक्निकल ॲडव्हायजर म्हणून काम करू शकता. यासोबतच विविध ब्रँड्सचे सल्लागारही बनू शकता. सरकारी क्षेत्रातही तुम्हाला संधी मिळू शकते.

डिप्लोमा इन कॉश्च्युम डिझाइन अँड गारमेंट टेक्नॉलॉजी, डिप्लोमा इन गारमेंट मॅन्युफॅक्चरिंग टेक्नॉलॉजी, डिप्लोमा इन गारमेंट टेक्नॉलॉजी इंजिनिअरींग हे अभ्यासक्रम तुम्ही निवडू शकता. देशातल्या विविध शैक्षणिक संस्थांमध्ये हे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.



## पंतने चौथ्या कसोटीत खेळूच नये!

"रिषभला क्षेत्ररक्षण करावे लागेल आणि जर त्याने क्षेत्ररक्षण केले, तर त्याची दुखापत आणखी गंभीर होऊ शकते. ग्लोव्ह्ज घालून खेळणार असला तरी त्याला पुन्हा दुखापत होऊ शकते. त्यामुळे दुखापत आणखी गंभीर होईल.अशा परिस्थितीत त्याला खेळत राहावे लागेल आणि फलंदाजी करावी लागेल. तो दोन्हीपैकी एकच गोष्ट करू शकत नाही. त्याचा बोट फ्रॅक्चर असेल तर त्याने विश्रांती घ्यावी आणि ओव्हलसाठी तयार राहावे," पंत सध्या सुरू असलेल्या मालिकेत दमदार फॉर्ममध्ये आहे. लीड्समधील पहिल्या सामन्यात त्याने दोन्ही डावांत शतक झळकावले होते आणि कसोटी सामन्याच्या प्रत्येक डावात शतक झळकावणारा तो इतिहासातील दुसरा यष्टीरक्षक फलंदाज ठरला होता. त्याने १२ चौकार आणि सहा षटकारांसह १३४ (१७८) धावा केल्या आणि त्यानंतर दुसऱ्या डावात १५ चौकार आणि तीन षटकारांसह ११८ (१४०) धावा केल्या.

— रवि शास्त्री

# चंदुकाका जगताप क्रीडा, मिडलाईन व स्वास्तिक संघ विजयी

## कबड्डी महर्षी स्व. शंकरराव ऊर्फ बुवा साळवी चषक निमंत्रित पुरुष व महिला राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुरुष विभागात चंदुकाका जगताप क्रीडा, मिडलाईन व स्वास्तिक संघानी आपआपल्या गटात तर महिला विभागात बारामती स्पोर्टस् व स्वराज्य संघानी आपआपल्या गटात विजयाचे खाते खोलले.

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने व पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या सहकार्याने " सतेज संघ,बाणेर यांच्या वतीने " कबड्डी महर्षी स्व. शंकरराव ऊर्फ बुवा साळवी चषक निमंत्रित पुरुष व महिला राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा - २०२५ व " बाबुराव चांदेरे सोशल फाउंडेशन यांच्या विद्यमाने पुरुष व महिला " पुणे लिग कबड्डी स्पर्धा २०२५ " या स्पर्धेच्या राज्यस्तरीय निमंत्रित स्पर्धेत पुरुष विभागात अत्यंत चुरशिच्या झालेल्या सामन्यात चंदुकाका जगताप क्रीडा संघाने नंदूरबार संघावर ३४-३१ असा विजय मिळविला. मध्यंतराला चंदुकाका जगताप क्रीडा संघ १०-१९ असा पिछाडीवर होता. मध्यंतरानंतर चंदुकाका जगताप संघाने आपली रणनिती बदलत आक्रमक खेळाला सुरवात केली. चंदुकाका जगताप संघाच्या सिध्दार्थ गायकवाड व आकाश दिसले यांनी आक्रमक खेळ करीत नंदुरबारचा बचाव भेदला विजय मिळविला. तुषार आधवडे व अक्षय बोडके यांनी सुरेख पकडी घेतल्या. नंदुरबारच्या ओंकार गाडे व असिम शेख यांनी पहिल्या डावात सुरेख खेळ केला मात्र मध्यंतरानंतर त्यांचा प्रभाव कमी झाला व त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. दादासाहेब आवाड व श्रेयश उंबरदंड यांनी चांगल्या पकडी केल्या.

दुसऱ्या सामन्यात मिडलाईन संघाने भैरवनाथ क्रीडा संस्था संघावर ३७-३५ अशा निसटता विजय मिळविला. मध्यंतराला मिडलाईन संघाकडे २६-२० अशी आघाडी होती. मिडलाईन संघाच्या आर्यन ढवळे याने जोरदार खेळ केला. वैभव मोरे याने पकडी केल्या. भैरवनाथ क्रीडा संस्था संघाच्या आदित्य चौगुले, याने एकाकी प्रतिकार केला. तर कृष्णा शिंदे यांनी पकडी केल्या. उपनगरच्या स्वास्तिक संघाने कोल्हापूरच्या शाहू सडोली संघावर ३४-३० असा विजय मिळविला. मध्यंतराला स्वास्तिक संघाकडे २१-१९ अशी आघाडी होती. स्वास्तिक संघाकडे अमित चव्हाण व अक्षय बरडे यांनी जोरदार खेळ केला. त्यांना अशोक विटकर याने पकडी घेतल्या. शाहू सडोली संघाच्या भूषण पाटील याने सुरेख चढाया केल्या. तर प्रसाद मगदुम यांने पकडी घेतल्या.

महिला विभागात बारामती स्पोर्टस् ॲकॅडमी संघाने मुंबईच्या शिवशक्ती महिला संघावर ३२-२१ अशी मात करीत विजय नोंदविला. मध्यंतराला बारामती स्पोर्टस् संघाकडे १२-१० अशी निसटती आघाडी होती. बारामती स्पोर्टसच्या निकीता खाडे व मिताली बारटक्के यांनी जबरदस्त आक्रमक खेल करीत तुल्यबळ अशा शिवशक्ती महिला संघाला नामोहरम केले. त्यांना सृष्टी मोरे व प्रिया निंबाळकर यांनी पकडी घेत चांगली साथ दिली. शिवशक्ती संघाच्या रक्षा नारकर व आदिती शिंदे यांनी जोरदार प्रतिकार केला. पोर्णिमा जेधे व जयश्री शिंगाडे यांनी पकडी घेतल्या.

महिलांच्या झालेल्या दुसऱ्या सामन्यात उपनगरच्या स्वराज्य संघाने पिंपरी चिंचवडच्या कला क्रीडा विकास प्रकल्प संघावर २३-२२ अशा निसटता विजय मिळविला. स्वराज्य संघाच्या सरीना म्हसकर व यशिका पुजारी यांनी चौफेर चढाया करीत मैदान गाजविले. तर समृध्दी मोहिते व सानिया इंगळे यांनी सुरेख पकडी घेतल्या. कला क्रीडा विकास प्रकल्प संघाच्या किर्ती गडगंजी व रेखा राठोड यांनी विजयासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली, मात्र त्यांना विजय मिळविण्यात यश आले नाही. सिफा वस्ताद व सविता गवळी यांनी चांगल्या पकडी केल्या.

## प्रकाश पवार यांचा जेष्ठ कार्यकर्ता राज्यस्तरीय कबड्डी पुरस्काराने सन्मान



**पुणे :** तब्बल ५० वर्षांपासून महाराष्ट्राच्या कबड्डी क्षेत्रामध्ये विविध भूमिकेत कार्यरत असलेले प्रकाश पवार यांचा कबड्डी क्षेत्रातील 'ज्येष्ठ कार्यकर्ता' हा मानाचा राष्ट्रीय पुरस्कार देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. महाराणा प्रताप क्रीडा मंडळ व साहेबराव सातकर प्रतिष्ठान, राजगुरूनगरचे कार्यवाह/सचिव प्रकाश पवार यांच्या कबड्डी क्षेत्रातील बहुमोल योगदानाची महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनने दखल घेतल्याने सत्कार स्विकारताना ते भारावून गेले होते. पोयनाड (ता. अलिबाग) येथे झालेल्या या कार्यक्रमात राज्य कबड्डी संघटनेचे कार्याध्यक्ष माजी खासदार गजानन कीर्तीकर, संघटनेचे सचिव बाबूराव चांदेरे यांच्या हस्ते प्रकाश पवार यांचा गौरव करण्यात आला. यावेळी राज्य कबड्डी संघटनेचे खजिनदार मंगल पांडे, राज्य संघटनेचे माजी सचिव आस्वाद पाटील, अर्जुन पुरस्कार विजेत्या शकुंतला खटावकर, रायगड जिल्हा असोसिएशनच्या सचिव चित्रा पाटील व्यासपीठावर उपस्थित होते. प्रकाश पवार गेली ४५ वर्षांपासून कबड्डी क्षेत्रात खेळाडू, पंच, पंचप्रमुख, प्रशिक्षक व कबड्डी संघाची स्थापना करण्यासाठी मार्गदर्शकाची भूमिका पार पाडत आहेत. याचबरोबर ते क्रीडा व सहकार क्षेत्रात राज्य स्तरावर प्रशिक्षक पदाधिकारी म्हणून गेल्या ३५ वर्षांपासून कार्यरत आहेत. त्यांच्या या बहुआयामी कार्याची दखल घेत राज्य कबड्डी असोसिएशनने या वर्षीच्या ज्येष्ठ कार्यकर्ता पुरस्कारासाठी प्रकाश पवार यांची निवड करून सन्मानचिन्ह प्रदान करून त्यांच्या कार्याचा गौरव केला. शैक्षणिक, सामाजिक, सहकार व क्रीडा क्षेत्रात संघटक, प्रशिक्षक व मार्गदर्शक म्हणून उल्लेखनिय कार्य करणारे प्रकाश पवार यांनी 'या मानाच्या पुरस्काराने आणखी काम करण्यासाठी नवी उर्जा मिळालीची उत्स्फुर्त प्रतिक्रिया दिली. सध्या सर्वच क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू आहे.

## मेस्सीची विक्रमी मालिका खंडित

**सिनसिनाटी :** इंटर मियामी एफसीला सिनसिनाटीकडून ०-३ असा



पराभव स्वीकारावा लागला. त्यामुळे मेजर लीग सॉकर स्पर्धेत सलग पाच सामन्यांत एकापेक्षा अधिक गोल करण्याची लिओनेल मेस्सीची विक्रमी मालिका संपुष्टात आली. सिनसिनाटीविरुद्ध या सामन्यात मेस्सीला एकही गोल करता आला नाही. पहिल्या सत्रात गेरार्डो व्हॅलेन्झुएलाच्या गोलमुळे सिनसिनाटीने आघाडी घेतली, तर दुसऱ्या सत्रात एव्हांडरच्या दोन गोलांमुळे त्यांनी विजयावर शिक्कामोर्तब केले. या विजयामुळे सिनसिनाटीने ईस्टर्न कॉन्फरन्समध्ये फिलाडेल्फिया युनियनच्या केवळ एका गुणाने मागे राहत आपले दुसरे स्थान कायम राखले. दुसरीकडे, फिलाडेल्फियाने सीएफ मॉन्ट्रियलला २-१ने पराभूत केले. या पराभवामुळे इंटर मियामीची सलग पाच सामन्यांची विजयी मालिका खंडित झाली असून, सध्या संघ पाचव्या क्रमांकावर आहे. अमेरिकेतील या मेजर लीग सॉकर स्पर्धेत सलग पाचपेक्षा अधिक सामन्यांत एकापेक्षा अधिक गोल करण्याचा विक्रम मेस्सीने केला आहे. त्याने १७ सामन्यांतून १६ गोल केले असून, तो लीगमध्ये सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूंमध्ये अग्रस्थानी आहे; मात्र सिनसिनाटीविरुद्ध या सामन्यात तो प्रभाव टाकू शकला नाही.

### अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त

## पुणे ते बारामती सायकल स्पर्धेचे आयोजन

**सासवड :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे तथा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवार, दिनांक १९ जुलै २०२५ रोजी राष्ट्रीय व राज्य स्तरावर पुणे ते बारामती सायकल स्पर्धेचे आयोजन केलेले आहे. स्पर्धेचे हे नववे वर्ष आहे. सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया व सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेने ही क्रीडा स्पर्धा पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येत आहे. सायकल स्पर्धा पुढील विविध गटात होणार आहे.

**सायकल स्पर्धा तपशील**

1. पुणे ते बारामती पुरुषांसाठी राष्ट्रीयस्तर (१२२ कि.मी.) 2. पुणे ते बारामती पुरुषांसाठी राज्यस्तर(१२२ कि.मी.) 3. सासवड ते बारामती MTB सायकलची खुली स्पर्धा पुरुषांसाठी (राज्यस्तर) (८५ कि.मी.) 4. माळेगांव ते बारामती महिलांसाठी राष्ट्रीयस्तर (१५ कि.मी.) 5. सासवड ते बारामती (पोलीस /राज्य शासन कर्मचारी) राज्यस्तरीय स्पर्धा (८५ कि.मी.) 6. माळेगांव ते बारामती पोलीस /राज्य शासन कर्मचारी (महिला) राज्यस्तरीय स्पर्धा (८५ कि.मी.)

या राष्ट्रीय सायकल स्पर्धेमध्ये देशभरातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ४०० ते ४५० खेळाडू / सायकलपटू सहभागी होणार आहेत. तसेच राज्य पातळीवरील स्पर्धेत सुमारे ३०० ते ३५० स्पर्धक सहभागी होणार आहेत. या स्पर्धेत नवी दिल्ली, कर्नाटक, आंध्र प्रदेश, राजस्थान, तामिळनाडू, बिहार, गुजरात, उत्तराखंड अंदमान निकोबार, चंदीगड या राज्यातील तसेच सेनादल, दक्षिण मध्य रेल्वे, उत्तर पूर्व रेल्वे, एअर फोर्स, मध्य रेल्वे या विभागातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू सहभागी होणार आहेत.

## जीओजी एफसी, आयएफा एफसी, डेक्कन इलेव्हन, उत्कर्ष क्रीडा मंच कोथरूड संघांची विजयी कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे जिल्हा फुटबॉल संघटने (पीडीएफए) तर्फे आयोजित 'पीडीएफए लीग २०२५' फुटबॉल स्पर्धेच्या अव्वल श्रेणी गटाच्या सामन्यात जीओजी एफसी, आयएफा एफसी, डेक्कन इलेव्हन, उत्कर्ष क्रीडा मंच कोथरूड आणि परशुरामियन्स् एफसी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली.

बावधन येथील हॉटफुट फुटबॉल मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेच्या अव्वल (सुपर) श्रेणी गटाच्या झालेल्या सामन्यामध्ये जीओजी एफसी संघाने चेतक एफसी संघाचा ३-१ असा सहज पराभव केला. जीओजी संघाकडून सुमित काटे, निखील माळी आणि प्रकाश थोरात यांन प्रत्येकी एकेक गोल करून संघाला विजयी केले. दुसऱ्या सामन्यात आयएफा एफसी संघाने संगम यंग बॉईज संघाचा ६-१ असा सहज पराभव केला. सामन्यात असोद सय्यद याने सर्वाधिक असे चार गोल नोंदविले. रियान यादगिरी आणि ओंकार नाळे यांन प्रत्येकी एक गोल करून संघाची आघाडी फुगवली.

डेक्कन इलेव्हन अ संघाने थंडरकॅटझ् अ संघाचा ६-२ असा सहज पराभव केला.

इशान सुमंत आणि सुर्यन घाटगे यांनी प्रत्येकी दोन गोल तर, राहूल कनग आणि कृष्णा अहीर यांनी प्रत्येकी एकेक गोल रचला. थंडरकॅटझ् अ संघाकडून कबिर मिलींद आणि आरव जोधवानी यांनी गोल केले. आशिष कडारा आणि शिवराज पवार यांनी केलेल्या गोलांच्या जोरावर उत्कर्ष क्रीडा मंच कोथरूड अ संघाने गनर्स एफसी संघाचा २-१ असा पराभव केला. धीरज यद्दुल्ला याने केलेल्या गोलामुळे परशुरामियन्स् एफसी संघाने स्निग्मय एफसी पुणे संघाचा १-० असा पराभव करून विजय नोंदविला.


## उपराजधानीतील रेणू भावंडे गाजविताहेत टेबल टेनिसचे कोर्ट



**नागपूर :** एखाद्या घरात वडील किंवा आई खेळाडू असेल तर साहजिकच मुलांचेही पाय मैदानाकडे वळतात. पुरबसिंग आणि पूर्वीकौर रेणू या बहीण-भावाच्या बाबतीतही हेच घडले. टेबल टेनिसपटू राहिलेल्या वडिलांनी राष्ट्रीय स्तरावर झेप घेतल्यानंतर, त्यांच्या चिमुकल्यांनीही या खेळात नाव कमावून परिवाराचा वारसा पुढे चालवत उपराजधानीच्या लौकिकात भर घातली आहे. छावणी येथील न्यू कॉलनीत राहणारे व सध्या ग्राफिक्स डिझायनिंगचा व्यवसाय करणारे पंकजसिंग रेणू नव्वदच्या दशकात टेबल टेनिस खेळायचे. उमेदीच्या काळात त्यांनी राष्ट्रीय स्पर्धांमध्ये नागपूर व महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. शिवाय जिल्हा व राज्य स्पर्धांमध्येही त्यांनी अनेक पुरस्कार जिंकले. दुर्दैवाने घरून पुरेसे प्रोत्साहन न मिळाल्याने त्यांचे करिअर अर्ध्यातच संपुष्टात आले. अपूर्ण राहिलेल्या इच्छा व स्वप्न मुलांनी पूर्ण करावे, असे त्यांना नेहमी वाटायचे. याच कारणांमुळे त्यांनी फारसा लोकप्रिय खेळ नसूनही मुलगा पुरबसिंग व मुलगी पूर्वीकौरला टेबल टेनिसमध्ये टाकले. या भावंडांनीही अल्पावधीतच असंख्य पदके, ट्रॉफीज व पुरस्कार जिंकून वडिलांचा विश्वास सार्थ ठरविला. आजच्या घडीला नागपुरात अशी एकही सबज्युनिअर स्पर्धा नसते, ज्यात या दोन्ही प्रतिभावान बहीण-भावाची चर्चा होत नसते. त्यांनी एकाच स्पर्धेत दोन-दोन, तीन-तीन टायटल्स जिंकल्याचे क्रीडाप्रेमींनी पाहिले आहे.

## सुक्राती शर्मा हिला दुहेरी मुकुट; संपदा भिवंडीकर व रिगान अलबुकर्क यांनाही विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क






**पुणे :** ठाण्याच्या सुक्राती शर्मा हिने १७ व १९ वर्षाखालील गटात विजेतेपद पटकाविले आणि खार जिमखाना मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य स्तरीय रोख पारितोषिक टेबल टेनिस स्पर्धेत दुहेरी मुकुट पटकाविला. महिलांमध्ये संपदा भिवंडीकर तर पुरुषांमध्ये रिगन अलबुकर्क हे दोन्ही टीएसटी संघाचे खेळाडू विजेतेपदाचे मानकरी ठरले

खार जिमखाना येथील टेबल टेनिस संकुलात महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. शर्मा हिने सतरा वर्षाखालील गटाच्या अंतिम लढतीत आयुषी शिरगावकर (टीएसटी) हिचा ११-६,१२-१०,११-२ असा सरळ तीन गेम्स मध्ये पराभव केला. शर्मा हिने १९ वर्षाखालील गटातील अंतिम लढतीत अर्पिता बोऱ्हाडे (मुंबई महानगर जिल्हा) हिला पराभूत केले. या सामन्यात मात्र शर्मा हिला संघर्ष करावा लागला. हा सामना तिने ११-८,१३-११, ११-७, ६-११,११-५ असा संघर्षपूर्ण लढतीनंतर जिंकला.

पुरुषांच्या अंतिम लढतीत अलबुकर्क याने टीएसटी संघाच्या मंदार हर्डीकर याच्यावर ११-७,११-४, ११-५,११-७ अशी मात केली. उपांत्य फेरीत त्याने झुबिन तारापोरवाला याला पराभूत केले होते तर हर्डीकर याने उपांत्य फेरीत पुण्याच्या शौनक शिंदे याचे आव्हान संपुष्टात आणले होते.

## लक्ष्यसह सात्विक-चिराग यांचेही आव्हान संपुष्टात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**टोकियो :** जपान ओपन बॅडमिंटन स्पर्धेत भारतीयांचे अपयश कायम राहिले. काल पी. व्ही. सिंधूचे आव्हान पहिल्याच फेरीत संपुष्टात आले होते. आज लक्ष्य सेनसह सात्विक आणि चिराग शेट्टी यांना दुहेरीत गाशा गुंडाळावा लागला. जागतिक क्रमवारीत १८ व्या स्थानावर असलेल्या लक्ष्य सेनच्या कामगिरीत सातत्य नसल्याचे आज पुन्हा सिद्ध झाले. जपानाच्या कोदाई नाराओकाविरुद्ध त्याचा १९-२१, ११-२१ असा पराभव झाला. अवघ्या तासाभराच्या लढतीत त्याची हार झाली.

लक्ष्य सेनने सलामीच्या लढतीत चीनच्या वँग झेंग झिंगवर २१-११, २१-१८ असा सहज पराभव केला होता, परंतु हेच सातत्य तो दुसऱ्या फेरीत कायम ठेऊ शकला नाही. पुरुष दुहेरीत सात्विक आणि चिराग शेट्टी यांच्याकडूनही निराशा झाली. जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी राहिलेल्या या जोडीचा चीनच्या पाचव्या मानांकित लियाँग वेई केंग आणि वँग चेंग यांच्याकडून २२-२४, १४-२१ असा पराभव झाला.

### मिलेनियम नॅशनल स्कुल व कुंटे चेस अकादमी आयोजित

## बुद्धिबळ स्पर्धेत एकुण २०० खेळाडू सहभागी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** कुंटे चेस अकादमी यांच्या वतीने व किंडर स्पोर्टस एलएलपी यांच्या संलग्नतेने आयोजित चौथ्या मिलेनियम नॅशनल स्कुल व कुंटे चेस अकादमी विविध वयोगटातील बुद्धिबळ स्पर्धेत जिल्ह्यातून एकुण 200 खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला आहे. हि स्पर्धा मिलेनियम नॅशनल स्कूल, कर्वे रोड येथे 20 जुलै 2025 रोजी होणार आहे.

स्पर्धा संचालिका मृणालिनी कुंटे यांनी सांगितले की, हि स्पर्धा पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल यांच्या मान्यतेखाली होत आहे. शहरांत बुद्धिबळ खेळाचा प्रसार आणखी वाढावा या हेतूने मिलेनियम नॅशनल स्कुलने या स्पर्धेसाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. तसेच, हि स्पर्धा स्विस लीग पद्धतीने सात फेऱ्यांमध्ये खेळविण्यात येणार आहे.

स्पर्धेत 200 खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला आहे. हि स्पर्धा गट अ(9 वर्षाखालील), गट ब(11 वर्षाखालील), गट क(13वर्षाखालील) आणि गट ड(15 वर्षाखालील) अशा एकूण 4 गटात होणार आहे. यामध्ये अथर्व येमुल (1522, 9 वर्षांखालील), रियांश पितळे (1501, 9 वर्षांखालील), क्षितिज प्रसाद (1784, 11 वर्षांखालील), राघव पावडे (1623, 11 वर्षांखालील), वेदांत काळे (1721, 13 वर्षांखालील), स्वराज शंकर (1646, 13 वर्षांखालील), सई पाटील (1617, 15 वर्षांखालील), आरूष बुडजादे(1601, 15वर्षांखालील) यांचा समावेश आहे. स्पर्धेत एकूण 36,000/-रुपयांची पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. स्पर्धेसाठी आयए दिप्ती शिदोरे या चीफ आरबीटर म्हणून काम पाहणार आहेत.

#रा



## POCSO गुन्ह्यातील आरोपीचा जामीन अर्ज मंजूर

बिबवेवाडी पोलिसांनी अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून ८ महिन्यांची गर्भवती बनवल्याच्या आरोपावरून गुन्हा दाखल केला होता.

सदर गुन्ह्यातील आरोपीने पुणे येथील जिल्हा कोर्टात जामीन अर्ज दाखल केला होता.

सदर प्रकरणात आरोपी तर्फे अॅड. जय कोठारी आणि अॅड. अफरोज जहागीरदार यांनी युक्तिवाद केला.वकीलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून सदर आरोपीचा जामीन अर्ज मान्य करण्यात आला.

सदर केसमध्ये अॅड. चिन्मय, अॅड. चेतन माने, अॅड. प्रथमेश, अॅड. अनुश गादिया, अॅड. आशुतोष सावंत यांनी कामकाज पाहिले.